
वृषाली जोशी



# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा

भाग २

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा- भाग २

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१९७४६२४५

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा भाग २


## अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २५ सप्टेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# The Oxford Book Of American Detective Stories

Edited by **Tony Hillerman & Rosemary Herbert**

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा भाग २


संकलक : टोनी हिलरमन व रोझमेरी हर्बर्ट

यातील पहिल्या गोष्टीचा, 'मी थांबलेला असेन' चा लेखक रेमंड चँडलर हा शिकॅगोमध्ये जन्मला व त्याचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. त्याने कविता लिहिल्या व वर्तमानपत्रातही लिखाण केले. पहिल्या महायुद्धात तो केनेडियन सैन्यात दाखल झाला व जखमी होऊन, कॅलिफोर्नियाला परत गेला. एका तेलकंपनीत त्याने दारुबाजपणामुळे डच्चू मिळेपर्यंत काम केले. जगभर त्याच्या पुस्तकांची स्तुती झाली. प्रस्तुत कथाही प्रेमकथा आहे व गुन्हेगारी कथाही आहे. तो वाचकांसाठी भावविश्व निर्माण करून, ते मनात रेंगाळवत ठेवतो.

दुसरी कथा 'कोळी'ची लेखिका मिगनॉन इबेरहार्ट ही नेब्रास्कामध्ये जन्मली. विवाहविच्छेदनानंतर ती लेखनाकडे वळली. तिने कथा लिहील्या. तिच्या पहील्या पाच कादंबऱ्यात मध्यमवयीन नर्स व तिचा पोलीस मित्र हे दिसतात. हॉलीवूडने यावर सिनेमे बनवले. तिने गुप्तहेरकथाही लिहील्या. त्यात विचित्र गुन्ह्यांबरोबर अद्भुतरम्यताही असते. तिचे गुप्तहेर पात्र सुसान डरे ही स्त्री आहे. कोळी या कथेत तिने ताण वाढवण्यासाठी अद्भुतरम्यतेचा वापर केला आहे. काळाच्या मानाने तिची गुप्तहेर स्त्री तिने धाडसी दाखवली आहे.

तिसरी कथा ‘लिपस्टिक’ची लेखिका मेरी राइनहार्ट हिच्या वडिलांनी ती नऊ वर्षांची असतांना आत्महत्या केली. आईने त्यांच्या पिट्सबर्गच्या घरात भाडेकरू ठेऊन, कसाबसा संसार रेटला. पैशांसाठी मेरीने लहानपणीच गोष्टी लिहायला सुरवात केली. तिने नर्सचे प्रशिक्षण घेतले व एका डॉक्टरशी लग्न करुन, तीन मुलांना जन्म दिला. वय वर्षे तीसपर्यंत लेखन केले नाही. नंतर तिने लिहिलेली ‘The man in lower ten’ ही गुप्तहेर असलेली पहीली कादंबरी खूप गाजली. तिने राजकीय व वैद्यकीय क्षेत्रात लिखाण केले. प्रस्तुत कथेत गुन्ह्याचा तपास लावणारी गुप्तहेर स्त्री आहे.

‘मागील खिडकी’चा लेखक कॉर्नेल वूलरीच याने प्रथम विल्यम इरीश या टोपणनावाने कथा लिहील्या. त्याच्या आई वडिलांचा घटस्फोट झाला होता. त्याने दोन अद्भुतरम्य कादंबऱ्या लिहिल्या. मग तो हॉलीवूडला पटकथालेखक म्हणून गेला. त्याच्या आईला त्याच्या आयुष्यात मोठे स्थान होते. ती १९५७ मध्ये वारली. नंतर त्याने कमी लिहिले. तो खूप दारु पिऊ लागला. खालावलेल्या तब्येतीकडे दुर्लक्ष केले. विरोधभासात्मक, पूर्वनियोजित व अटळ नियतीचा मनुष्याच्या अबोध मनातील विचित्रपणा त्याने मानसशास्त्राच्या आधारे त्याच्या गोष्टींमध्ये मांडला. स्वतःवर ओढवून घेतलेल्या दुःखद प्रसंगातून जाणारी हतबल माणसे त्याने त्याच्या कथेत दाखवली. त्याच्या या प्रस्तुत कथेवरून सिनेमा निघाला व गाजला.



# कथानुक्रम

मी थांबलेला असेन

कोळी

लिपस्टिक

मागील खिडकी

I'll Be Waiting

by Chandler

# मी थांबलेला असेन

## चँडलर



पहाटे एक वाजता, रात्रीचा हमाल कार्ल याने विंडरमिअर हॉटेलच्या स्वागतकक्षातील टेबलावरील तीन दिव्यांपैकी शेवटचा दिवा मालवला.

निळा गालीचा अंधारला. भिंती परत एकाकी झाल्या. आरामदायी खुर्च्या सावलीतील लोकांनी भरल्या. कोपऱ्यांमधून कोळीष्ट्कांच्या आठवणी रंगल्या.

टोनी रेसेकने, हॉटेलच्या सुरक्षा विभागाच्या प्रमुखाने, जांभई दिली. त्याने

त्याचे डोके एका बाजूला वळवले आणि स्वागतकक्षापासून लांबवर असलेल्या अंधारी कमानीपलीकडे असलेल्या रेडिओच्या खोलीतून हळू आवाजातील, संगीताचा चिवचिवाट ऐकला. त्याने नापसंतीदर्शक भुवई उंचावली. रात्री एकनंतर तिथे कुणी असणार नव्हते. त्यानंतर ती खोली त्याची असायला हवी होती. पण तिथे असलेली लाल केसांची मुलगी त्याची रात्र खराब करत होती. कारण त्याला तिच्यावर लक्ष ठेवावे लागत होते.

नापसंतीदर्शक भुवई गेली आणि लहानसे हसू ओठांच्या कोपऱ्यात उमटले. तो बुटका, अशक्त, ढेरपोट्या, असलेला मध्यमवयीन माणूस आरामात बसला. त्याच्या लांब/नाजूक बोटांनी तो कलाकुसर म्हणून असलेला मोठ्या हरीणाचा दात [ हा नशीबवान समजला जातो.] त्याच्या घड्याळाच्या साखळीवर घट्ट बसवत होता. चकाकित/ गोल आकार दिलेली टोकेरी नखे असणारा, रुंद पण टोकाला गोल असणाऱ्या बोटांचा असा तो माणूस फसवी कला पेश करणारा होता. सुंदर बोटे! टोनी रेसेकने ती हळूवारपणे चोळली आणि त्याच्या समुद्रासारख्या संथ करड्या डोळयात शांती आली.

पुन्हा नापसंतीदर्शक भुवई दिसली. संगीत त्याला चीड आणत होते. तो चौकस डौलाने, घड्याळावरील त्याच्या घट्ट हातांसकट उठला. एका क्षणी तो आरामात मागे रेलत होता आणि दुसऱ्या क्षणी तो त्याच्या पायांवर तोल सावरून स्तब्धपणे उभा रहात होता. त्यामुळे उभे रहाण्याची हालचाल पूर्णपणे दृष्टीभ्रमासारखी मनावर ठसत होती --- तो लहानशा, चकाकीत बुटांनी नाजूकपणे कमानीखालील निळा गालीचा ओलांडून चालत गेला.

ते संगीत प्रक्षोभक, गडबडीचे, जलद गतीचे, जोशपूर्ण, खूप ताण निर्माण

करणारे, वाद्यांचा काही मेळ नसणारे होते. ते फारच कर्णकर्कश होते. लाल केसांची मुलगी तिथे बसून, शांतपणे मोठ्याने रेडीओ सुरु करत होती जसे काही तिला त्यात हसरा, व्यावसायिक बँड दिसत होता आणि तो वाजवणाऱ्यांच्या पाठीवरून घाम गळत होता. खोलीतील बऱ्याचशा उशा ठेवलेला उतरत्या पृष्ठभागाच्या सजावट केलेल्या टेबलाशी पाय दुमडून ती बसली होती. फुलवाल्याकडील कागदात बांधलेल्या फुलांच्या गुच्छासारखी ती त्यात काळजीपूर्वक बसली होती. तिने तिचे डोके हलवले नाही. तिची लहानशी मूठ तिच्या पिचच्या रंगाच्या गुडघ्यावर ठेऊन, ती वाकली होती. काळ्या कमळकळ्यांनी भरलेला रेशमी जड चुणीदार लांब पायजमा तिने घातला होता.

टोनी रेसेकने विचारले, “मिस क्रेसी, तुला गुडमन आवडतो का?”

मुलीने तिचे डोळे हळू हलवले. त्यातील उजेड मंद होता पण त्यातील किरमिजी रंग दुखावल्यासारखा होता. ते मोठे, खोल, विचाराचा काही मागमूस न दिसणारे डोळे होते. तिचा चेहरा उच्चभ्रू पण भावनारहीत होता.

ती काही बोलली नाही.

टोनी हसला व त्याची बोटे एकेक करून जाणीवपूर्वक त्याच्या बाजूला वळवत परत म्हणाला, “मिस क्रेसी, तुला गुडमन आवडतो का?”

मुलगी भाव न दाखवता म्हणाली, “रडण्यासाठी नाही.”

टोनी त्याच्या टाचांवर मागे फिरला आणि तिच्या डोळ्यात पाहीले. ते मोठे, खोल, रिकामे डोळे होते का?” त्याने खाली वाकून रेडीओ बंद केला.

मुलगी म्हणाली, “माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका. गुडमन पैसे

मिळवतो आणि आजकाल पैसे मिळवणारा कोणीही कायद्याप्रमाणे मान मिळवतो. पण हे जलद संगीत मला सोडा नसलेल्या बिअरप्रमाणे वाटते.”

टोनी बोलला, “कदाचित तुला मोझार्ट आवडत असेल.”

मुलगी म्हणाली, “तुझी चेष्टा चालू दे.”

“मिस क्रेसी, मी चेष्टा करत नव्हतो. मला वाटते आजपर्यंतच्या संगीतकारांमध्ये मोझार्ट सर्वात थोर आहे आणि तो स्कॅनिनी त्याचा संगीताने भारलेला गुरु आहे.”

तिने तिचे डोके परत उशीवर ठेवले आणि त्याच्याकडे बघत म्हटले, “मला वाटले तुम्ही खासगी गुप्तहेर आहात. मला काही मोझार्ट ऐकवा.”

टोनी सुस्कारत म्हणाला, “आता फार उशीर झाला आहे. आता तुला तो ऐकता येणार नाही.”

तिने त्याला कळेल असा, दुसरा मोठा कटाक्ष टाकला. “अरे पोलीसा, माझ्यावर पाळत ठेवतो आहेस का?” ती दबल्यासारखे थोडे हसली. “मी काय चुकीचे केले आहे?”

टोनी त्याचे खेळकर हसू हसला. “मिस क्रेसी, तसे काही नाही. पण तुला ताज्या हवेची गरज आहे. तू पाच दिवस हॉटेलात आहेस आणि कुठे बाहेर गेली नाहीस. शिवाय तू सर्वात वरील मजल्यावर मनोऱ्याच्या खोलीत रहाते आहेस.” [आत्महत्या करायचा तर तुझा विचार नाही ना?]

ती परत हसली. “मला कंटाळा आला आहे. मला काही गोष्ट सांग.”

“एक मुलगी तुझ्या खोलीत रहात होती. ती कुठेही बाहेर न जाता,

हॉटेलात पूर्ण आठवडाभर राहीली. ती क्वचितच कुणाशी बोलली. मग तिने काय केले असेल असे तुला वाटते?"

मुलीने त्याच्याकडे थंडपणे पाहीले. "तिने तिचे बिल बुडवले."

त्याने त्याचा लांब, नाजूक हात बाहेर काढला व जवळजवळ सुस्त लाट फुटावी तशा पद्धतीने बोटे नाचवत, सावकाश वळवला. "ओहो, आहा. तिने तिचे बिल भरले. नंतर तिच्या बॅगेसाठी तिने हॉपला अर्ध्या तासाने बोलावले. मग ती तिच्या गॅलरीत गेली."

मुलगी जराशी पुढे वाकली. तिचे डोळे अजूनही थंडच होते. एक हात तिच्या पीच रंगाच्या गुडघ्यावर होता. "तू तुझे नाव काय म्हणालास?"

"टोनी रेसेक"

"तू हंकीसारखा मोठा, बळकट व आकर्षक वाटतो आहेस."

टोनी म्हणाला, "हो, चकचकीत."

."टोनी, पुढे सांग."

"मिस क्रेसी, मनोऱ्यातील सर्व खोल्यांना खासगी गॅलऱ्या आहेत. रस्त्यावर चौदा मजली इमारतीसाठी त्यांच्या भिंती फारच बुटक्या आहेत." ती आकाशात ढग असलेली अंधारी रात्र होती. त्याने शेवटची हालचाल म्हणून, त्याचा हात निरोप घेण्यासाठी उंचावला. "कुणीच तिला उडी मारतांना पाहीले नाही. पण जेव्हा ती आपटली, तेव्हा मोठ्या बंदुकीची गोळी सुटल्यासारखा आवाज आला."

“टोनी, तू थाप मारत आहेस.” तिचा आवाज म्हणजे स्वच्छ, कोरडी कुजबुज होती.

तो त्याचे खेळातले हसू हसला. त्याचे शांत, समुद्री, करडे डोळे जणू काही तिच्या केसांच्या लांब लाटा शांत करत होते. तो ध्यान करत बोलला, “इव्ह क्रेसी, संध्याकाळ. दिव्यांचा उजेड पडण्यासाठी थांबलेले नाव.”

“टोनी, चांगल्या नसलेल्या, उंच, काळया माणसासाठी मी थांबलेली आहे. असे का, त्याची काळजी तुला नसेल. मी एके काळी त्याच्याशी लग्न केले होते. मी कदाचित परतही त्याच्याशी लग्न करेन. फक्त एकाच जन्मात तुम्ही अनेक चुका करू शकता.”

जितकी ताणता येतील, तितकी बोटे ताणत, तिचा गुडघ्यावरील हात सावकाश खाली आला. मग तो झटपट घट्ट मिटला आणि त्या मंद प्रकाशात बोटांचा तळहाताला जोडणारा भाग छोट्या चकाकीत हाडांसारखा दिसत होता.

मी त्याला एकदा फसवले. मी त्याला वाईट जागी ठेवले --- निरर्थकपणे. तुला त्याचीदेखील काही काळजी नसेल. फक्त मी त्याचे काही देणे लागते.”

तो मृदुपणे वाकला व रेडीओचे बटण लावले. कोमट हवेत हळू आवाजात वाल्ट्झ वाजू लागले. धातूच्या चकाकीत पताकांची सजावट केलेले वाल्ट्झ पण वाल्ट्झच. त्याने आवाज जोरात केला. माईकवरून आवाज सावलीच्या सुरावटीत वाढू लागला. व्हिएन्ना हा नाचाचा प्रकार संपल्यामुळे सर्व वाल्ट्झ झाकोळले होते.

तिचा हात एका बाजूला ठेऊन, ती तीन चार संगीतओळी गुणगुणली. नंतर मुलीने तिचे तोंड घट्ट बंद केले.

ती बोलली, “इव्ह क्रेसी, संध्याकाळ. एका वेळी बम रात्रक्लबमध्ये [जिथे मी नाच करत असे] दिवे उजळलेले होते. एक गचाळ बार. त्यांनी त्या क्लबवर धाड घातली. आणि दिवे गेले.”

तो तिच्याकडे बघून फसवे हसू हसला. “मिस क्रेसी, तू तिथे असतांना, तो बार गचाळ कसा असेल? --- “

जेव्हा हॉटेलच्या दाराशी म्हातारा हमाल वाल्ट्झच्या तालावर वरखाली चालतो, तेव्हा नेहमी ही वाल्ट्झची ही सुरावट वाजवली जाते. त्याच्या छातीवरील पदकांसकट ती फुगते. इमिल जॅनींग्जची भूमिका असलेल्या ‘लास्ट लाफ’ या सिनेमातील गाण्यावर तो नाचत होता.

“मिस क्रेसी, तुला ते आठवत नसेल.”

ती म्हणाली, “त्या गाण्यातील वसंत ऋतु, सुंदर वसंत ऋतु! नाही. मी ते कधीच बघितले नाही.”

तो तिच्यापासून तीन पायऱ्या लांब गेला. “मला वर जाऊन दरवाज्यांची तपासणी करायची आहे. मला अशी आशा आहे, की त्याने तुला त्रास होणार नाही. तुला आता झोपायला गेले पाहीजे. बराच उशीर झाला आहे.”

धातूच्या चकाकीत पताकांची सजावट केलेले वाल्ट्झ थांबले. एक आवाज बोलू लागला.

ती मुलगी बोलत होती. “तुला खरेच --- गॅलरीचा विचार करायचा होता का?” [कठडा बुटका असल्याने तेथून कोणी आत्महत्या तर करणार नाही ना?, असा विचार.]

त्याने मान हलवली. तो नरमाईने म्हणाला, “कदाचित केला असता. पण आता तशी जरुरी वाटत नाही.”

“टोनी, तशी संधीच नाही आहे. ये आणि माझ्याशी अजून काही बोल.” तिचे हसू म्हणजे मरगळलेले, झडलेले पान होते.

“टोनी, [माझ्यासारखी] लाल केसांची डोकी गॅलरीतून उडी मारत नाहीत. ती सुकतात आणि लटकवून घेतात.”

क्षणभर त्याने तिच्याकडे थंडपणे पाहीले आणि मग गालीच्यावरून लांब चालत गेला. हॉटेलच्या स्वागतकक्षाकडे जाणाऱ्या कमानदार रस्त्यावर, हमाल उभा होता. टोनीने अजून त्या रस्त्याकडे पाहिले नव्हते. पण तिथे कुणीतरी आहे, एवढे त्याला माहिती होते. त्याच्याजवळ कुणी असले, तर ते त्याला नेहमी समजत असे. त्याला गवत वाढलेलेदेखील कळत असे. हमालाने त्याच्याकडे बघून, घाईघाईने हनुवटी हलवली. गणवेषाच्या कॉलरवरील त्याचा रुंद चेहरा घामट आणि उद्दीपित झालेला वाटत होता. टोनी त्याच्याजवळ गेला आणि ते दोघे बरोबर कमानीखालून गेले आणि मंद उजेडाच्या स्वागतकक्षाच्या मध्यावर पोचले.

टोनीने दुःखाने विचारले, “काही त्रास?”

“टोनी, तिथे बाहेर तुझ्यासाठी एक उंच माणूस आला आहे. तो आत येत नाही. मी दाराच्या काचा पुसतांना तो माझ्याशेजारी येऊन थांबला. तो म्हणाला, “मला टोनी हवा आहे.”

हमालाच्या फिकट निळया डोळयात बघत, टोनी म्हणाला, “ओहो, तो कोण होता?” तो म्हणाला, तो स्वतःच तो कोण आहे ते सांगेल.”

टोनीचा चेहरा भावरहित झाला. ठीक आहे असे म्हणून तो चालू लागला. हमालाने त्याच्या शर्टाची बाही पकडली. “टोनी, ऐक. तुला कोणी शत्रू आहेत का?” टोनी नम्रपणे हसला, पण त्याचा चेहरा अजूनही भावरहीतच होता.

“फक्त पैशांचे व्यवहार करणारी कंपनी. पण ते जाऊ दे.”

हमालाने परत त्याच्या शर्टाची बाही घट्ट पकडत म्हटले, “खाली चौकात एक मोठी काळी मोटार उभी आहे. तिथे एक पाय मोटारीत ठेऊन एक माणूस उभा आहे. या माझ्याशी बोलणाऱ्या मनुष्याने गडद रंगाची शाल कोटाला लपेटून घेतली होती. त्याचा चेहरा भावरहित होता आणि कॉलर उंच करून त्याने कानावर आणली होती. टोपी खाली घसरली होती. त्याचा चेहरा जवळजवळ दिसतच नव्हता. तो म्हणाला, “मला टोनी हवा आहे.”

तो जरा कडकपणे व सावकाश निळ्या गालीच्यावरून चालत गेला. तीन बुटक्या पायऱ्या चढून स्वागतकक्षाच्या सुरवातीला गेला. तिथे एका बाजूला तीन जिने होते आणि दुसऱ्या बाजूला टेबल होते. एकच स्वयंचलीत जिना चालू अवस्थेत होता. उघड्या दाराशेजारी, रात्रपाळीचा गुरखा शांतपणे हाताची घडी घालून, निळ्या गणवेषात उभा होता. तो गोमेझ नावाचा नम्र, काळा मेक्सिकन होता. तो रात्रपाळीच्या कामावर नवीनच आला होता.

दुसऱ्या बाजूला असलेल्या गुलाबी, संगमरवरी टेबलावर, लालसर केसाळ मिशांचा व गुलाबी गालांचा रात्रीचा कारकून नाजूकपणे वाकून बसला होता. तो छोटासा व्यवस्थित मनुष्य होता. त्याने टोनीकडे रोखून पाहिले आणि त्याच्या मिशात नख घातले.

टोनीने त्याच्याकडे चाफेकळी रोखली. इतर तीन बोटे दुमडली. तळहात घट्ट केला व अंगठा वरखाली हलवला. कारकुनाने त्याच्या मिशांच्या दुसऱ्या बाजूला स्पर्श केला. तो कंटाळलेला वाटत होता. टोनीने चालत जाऊन बातम्यांचा अंधारी स्टँड व औषधांच्या दुकानात शिरण्याचा काचेचा दरवाजा ओलांडला व तो त्याच्या आत उभा राहला. त्याने खोल श्वास घेतला. त्याचे खांदे ताठ केले. दारे उघडली आणि रात्रीच्या थंड, ओलसर हवेत बाहेर पडला.

रस्ता अंधारी व शांत होता. दोन चौक पलीकडे असलेल्या विलशायरवरील वाहतुकीचे आवाज येत होते. तिथे कुणी नव्हते. ते अर्थहीन होते. डावीकडे दोन टॅक्सी उभ्या होत्या. ते दोघे चालक चाकाशेजारील मडगार्डजवळ सिगरेट ओढत उभे होते. टोनी दुसऱ्या रस्त्याने गेला. मोठी काळी मोटार हॉटेलच्या प्रवेशद्वारापासून तिसऱ्या चौकात उभी होती. तिचे दिवे मंद होते व तो त्या गाडीच्या जवळ गेल्यावरच त्याला तिचे इंजिन चालू असल्याचा आवाज आला.

एक उंच आकृती मोटारीतून उतरून, त्याच्याकडे येऊ लागली. तिचे दोन्ही हात काळ्या कोटाच्या खिशात होते. कॉलर उंच केलेली होती. त्या माणसाच्या तोंडातील सिगरेटचे टोक गंजक्या मोत्यासारखे मंदपणे चमकत होते.

ते एकमेकांपासून दोन फूटांवर थांबले.

उंच माणूस म्हणाला, “टोनी, कसे काय? आपण बरेच दिवसांनी भेटलो.”

“हॅलो, कसे काय चालले आहे?”

उंच माणूस कोटाच्या खिशातून त्याचा हात बाहेर काढत व त्यामागून शांतपणे हसत बोलला, “मी तक्रार करू शकत नाही. मी विसरलो. मला वाटते, तुला हातमिळवणी करायची नसेल.”

टोनी म्हणाला, “त्याचा अर्थ असा नाही. हस्तांदोलन माकडेदेखील करू शकतात. तुझ्या मनात काय आहे?”

“टोनी, तू अजून तसाच मजेशीर, छोटासा जाड माणूस आहेस?”

“मला वाटते, हो.” टोनीने एक डोळा मिचकावून दाखवला. त्याला घशात काही अडकल्यासारखे वाटले.

“तुला परत तुझे तेथील काम आवडते आहे का?”

“ते काम आहे.”

उंच माणूस परत शांतपणे हसला. “तू ते मनावर घेत नाहीस. टोनी, मी ते घाईने घेईन. म्हणजे ते काम आहे आणि ते तुला करत रहायचे आहे. ठीक आहे. तिथे तुझ्या हॉटेलात बागडणारी एक इव्ह क्रेसी नावाची मुलगी आहे. तिला बाहेर काढ. लवकर आणि आताच्या आता.”

“का? तिचा काय त्रास आहे?”

उंच माणसाने रस्त्यावर वरखाली पाहीले. मोटारीतील दुसरा माणूस थोडे खोकला.

“तिच्याविरुद्ध खासगी असे काही नाही, पण ती तिच्यापासून लांब रहावे, अशी आहे. ती तुला नक्कीच त्रास देईल. टोनी, तिला बाहेर काढ. तुझ्याकडे एक तास आहे.”

टोनी काही न समजता, भरकटत म्हणाला, “नक्की.”

त्या उंच माणसाने त्याचा हात खिशाबाहेर काढला आणि टोनीच्या छातीच्या दिशेने पसरला. त्याने त्याला हळूच ढकलले. “मी तुला हे काही उगीच सांगत नाही. छोट्या, जाड भावा, तिला हाकल.”

टोनी थंडपणे बोलला, “ठीक आहे.”

उंच माणसाने त्याचा हात काढून घेतला व मोटारीच्या दाराशी गेला. त्याने दार उघडले व एखाद्या वाकलेल्या काळ्या सावलीसारखा आत बसला.

मग तो थांबला व मोटारीतील माणसाला काही सांगून परत बाहेर पडला. जिथे टोनी शांतपणे उभा होता, तिथे तो आला. त्याचे मलूल डोळे रस्त्यावरील मंद उजेड शोषून घेत होते.

“टोनी, ऐक. तू कधी स्वतःला त्रास करून घेत नाहीस. तू एक चांगला माणूस आहेस.” टोनी काही बोलला नाही. मोठी अधीर सावली पाडत, त्याची कॉलर जवळजवळ टोनीच्या कानाशी लावत, उंच माणूस वाकला. “टोनी, हे करणे त्रासदायक आहे. त्या माणसांना ते आवडणार नाही, पण तरीही मी तुला तेच सांगेन. या क्रेसीने जॉनी रेल्स नावाच्या माणसाशी लग्न केले होते. रेल्सने दोन तीन दिवसांपूर्वी वा आठवड्यापूर्वी त्याचे नाव गमावले आहे. त्याच्या हातून एका माणसाची कत्तल झाल्याचा संशय आहे. मुलीने त्याला तिथे ठेवले आहे. तो प्यायलेला असतांना, त्याने एका म्हाताऱ्या माणसाला उडवले आणि त्याच्याबरोबर ती होती. तो थांबला नाही. पळून गेला. तिने त्याला जाऊन गुन्हा कबूल करायला सांगितले किंवा नाही. त्यामुळे जोन्स त्यासाठी आला आहे.

टोनी बोलला, “हे फारच वाईट झाले. हे खाद्यगृह आहे, बाळा. इथे काही धोका असेल, तर तो जाणून घेणे, हे माझे काम आहे. तो रेल्स सांगत होता, की तो तुरुंगाबाहेर पडला, तेव्हा कशी ती मुलगी त्याच्यासाठी थांबली होती. सगळे विसरून तिला त्याला क्षमा करायची आहे. तो सरळ तिच्याकडे जाणार आहे.”

टोनी बोलला, “तो तुझा कोण आहे?” त्याचा आवाज जाड कागदासारखा कोरडा व कडक होऊन, फुटत होता.

उंच मनुष्य हसला. “त्रासलेल्या माणसांना तिला भेटायचे आहे. तो त्या ठिकाणी लास वेगासच्या झगमगीत रस्त्यावर एक टेबल चालवतो आणि त्याने एक योजना तयार केली आहे. त्याने व अजून एकाने पन्नास हजार डॉलरला एक घर घेतले आहे.” दुसरा मनुष्य खोकला व बोलला, “पण आम्हाला अजून जॉनीच्या पंचवीस हजार डॉलरची गरज आहे. त्रासलेल्या माणसांना विसरण्यासाठी पगार दिला जात नाही.”

टोनीने अंधारी रस्त्यावर वरखाली पाहीले. एका टॅक्सीचालकाने, दुसऱ्या टॅक्सीच्या कमानदार टपावर सिगरेटची राख टाकली. टोनीने ती पडतांना पाहीली व ठिणगीही पाहीली. त्याने त्या मोठ्या मोटारीच्या इंजिनचा शांत आवाज ऐकला.

“मला तिचे कुठलेही आस्तित्व इथे नको आहे. मी तिला बाहेर काढतो.”

उंच माणूस मान हलवत, त्याच्यापासून दूर गेला. “शहाणा मुलगा! आजकाल आई कशी आहे?”

टोनी म्हणाला, “ठीक आहे.”

“मी तिला विचारले होते, म्हणून सांग.”

टोनी म्हणाला, “तिला विचारणे म्हणजे काही विशेष नाही.”

उंच माणूस एकदम वळला व गाडीत बसला. गाडी हळूहळू वळली व कोपऱ्याशी गेली. तिचे दिवे लागून, भिंतीवर उजेड पडला. तिच्या धुराचा वास टोनीच्या नाकात गेला. तो परत हॉटेलात, रेडिओच्या खोलीत गेला. त्याच्या समोरील सजवलेल्या टेबलावरून मुलगी बाहेर गेली होती आणि रेडिओची गुणगुण चालू होती. तिने दाबलेल्या उशा पोकळ झाल्या होत्या. टोनीने त्यांना हात लावला. त्याला त्या अजून कोमट असल्यासारखे वाटले. त्याने रेडिओ बंद केला व पोटावर हात ठेऊन, अंगठा सावकाशीने त्याच्यासमोर आणून, तो तिथे उभा राहीला. मग तो स्वागतकक्षातून लिफ्टकडे गेला व पांढरी वाळू भरलेल्या मातीच्या रांजणाशी उभा राहिला. टेबलाच्या एका बाजूकडील, छोटे गोल दगड दिसणाऱ्या काचेच्या पडद्यामागे कारकून रागावून बसलेला होता. हवा अगदी पडली होती.

लिफ्टची बटणे अंधारात होती. टोनीने मधल्या गाडीच्या पाटीकडे बघितले. आणि त्यावर १४ क्रमांक लिहिलेला होता.

तो हळू आवाजात बोलला, “ती झोपायला गेली आहे.”

लिफ्टशेजारील हमालाच्या खोलीचे दार उघडून तो छोटा रात्रपाळीचा मेक्सिकन गुरखा रस्त्यावरील कपड्यात बाहेर आला. त्याने त्याच्या सुक्या चेस्टनटच्या रंगाच्या डोळयांच्या कडेने टोनीकडे पाहीले.

तो बोलला, “साहेब, शुभ रात्र.”

टोनी बेसावधपणे बोलला, “हो.”

त्याने एक ठिपकेवाली सिगरेट त्याच्या खिशातून बाहेर काढली व तिचा वास घेऊन सावकाश बोटे हलवून तिची तपासणी केली. त्याची कडा थोडीशी फाटलेली होती. ते बघून त्याने भुवई चढवली व ती बाजूला ठेवली.

लांबून काही आवाज आला व लिफ्टच्या ब्रॉन्झच्या बटणावरील त्याचा हात फिरू लागला. तो भाग चमकून उठला. पण मोटारीपासून सरळ रस्ता अंधारात बुडालेला होता. मोटार थांबली. दरवाजे उघडले. त्यातून कार्ल उतरला. त्याची व टोनीची नजरानजर झाली व डोके एका बाजूला वळवून, तो त्याच्याकडे गेला. त्याच्या वरच्या गुलाबी ओठांवर थोडी चकाकी होती.

“टोनी, ऐक.”

टोनीने झटपट स्वतःच्या कडक हाताने त्याचा दंड धरला व त्याला भरभर वळवले. त्याने त्याला जोराने, तरीही सावकाशीने पायऱ्यांवरून मंद उजेडाच्या स्वागतकक्षात एका कोपऱ्यात ढकलले व त्याचा दंड सोडून दिला. त्याबद्दल काही कारण नसतांना, त्याला त्याच्या घशांत परत काही अडकल्यासारखे वाटले.

अंधारात तो म्हणाला, “काय ऐकू?”

हमालाने खिशात हात घालून, डॉलरची नोट बाहेर काढली. तो हलकेच बोलला, “त्याने ही दिली होती. त्याचे चमकणारे डोळे टोनीच्या खांद्यावरून कशाकडेच बघत नव्हते. त्याने डोळे उघडमिट केले. “सोडा व आले घातलेले पेय.”

टोनी गुरगुरला, “काहीही सांगू नकोस.”

हमाल बोलला, “१४, ब मधील माणूस.”

हमाल त्याच्यापुढे आज्ञाधारकपणे वाकला. .

”मला तुझ्या श्वासाचा वास घेऊ दे.” टोनी कडकपणे म्हणाला. “दारू?”

“त्याने मला ते पेय दिले.”

टोनीने डॉलरच्या नोटेकडे बघितले आणि तो म्हणाला, ”१४, ब मध्ये कुणी नाही. माझ्याकडील यादीत तरी नाही.”

हमाल त्याचे ओठ चाटत व बऱ्याच वेळा डोळे उघडमिट करत बोलला, “हो, आहे. उंच, काळा माणूस.”

टोनी चिडून बोलला, “ठीक आहे. ठीक आहे. १४, ब मध्ये उंच, काळा माणूस आहे आणि त्याने तुला एक डॉलरची नोट व पेय दिले. मग काय?”

त्याने एक ठिपकेवाली सिगरेट त्याच्या खिशातून बाहेर काढली व तिचा वास घेऊन सावकाश बोटे हलवून तिची तपासणी केली. त्याची कडा थोडीशी फाटलेली होती. ते बघून त्याने डोळे मिचकावले. कार्ल बोलला, “त्याच्या काखेखाली पिस्तुल होते.”

टोनी हसला पण त्याचे डोळे बर्फासारखे थंड होते. “तू मिस क्रेसीला तिच्या खोलीपर्यंत नेलेस?”

कार्लने डोके हलवले व बोलला, “नाही, मी तिला वर जातांना पाहीले.”

टोनी म्हणाला, “माझ्यापासून दूर जा आणि यापुढे कुठल्या पाहुण्यांकडून पेय स्वीकारू नकोस.”

कार्ल लिफ्टने त्याच्या खोलीत जाउन दार लावेपर्यंत तो हलला नाही. मग शांतपणे तीन पायऱ्या चढून, टेबलासमोर गुलाबी संगमरवराकडे, रंगीत

पेनांच्या संचाकडे व चामड्याच्या चौकटीतील नव्या नावनोंदणीच्या कार्डाकडे बघत उभा राहिला. त्याने हात उचलला व जोराने संगमरवरावर आपटला. बिळातून बाहेर येणाऱ्या खारीसारखे कारकुनाने काचेच्या पडद्याआडून डोकावून पाहिले.

टोनीने त्याच्या छातीवरील खिशातून, एक तकलादू कागद काढला व टेबलावर पसरला. "तो कटू आवाजात बोलला, "यावर १४, ब लिहिलेले नाही."

कारकून नम्रपणे त्याच्या मिशा कुरवाळत बोलला, "मला माफ करा. तो आला, तेव्हा तुम्ही जेवणासाठी बाहेर गेलेले असणार."

"कोण?"

कारकून जांभई देत बोलला, "सॅन डिएगोचा जेम्स वॅटरसन असे नाव लिहिलेला."

"त्याने कुणाची चौकशी केली का?"

मध्येच थांबत व टोनीच्या डोक्यावर पहात तो म्हणाला, "हो. त्याने झुलणाऱ्या बँडची मागणी केली आहे. का?"

टोनी म्हणाला, "चटपटीत, मजेशीर आणि वेगवान. जर तसे असल्यामुळे तुला तो आवडत असेल तर ---" त्याने कार्डावर त्याचे नाव लिहून, ते परत त्याच्या खिशात ठेवले.

"मी वर चाललो आहे आणि दरवाज्यांची तपासणी करणार आहे. तुम्ही अजून भाड्याने न दिलेली चौथी मनोरा खोली आहे. बाळा, तू घसरतो आहेस,

धीराने घे.” कारकून मंदपणे सावकाश बोलला, “मी ठरवले आहे. घाई करा. मला माहिती नाही, की मी ही वेळ कशी निभावून नेईन.”

“तू तुझ्या ओठांवरील ते गुलाबीसर केस काढ.” टोनी बोलला व लिफ्ट ओलांडून गेला.

त्याने अंधारमय लिफ्ट उजळवली व १४ क्रमांकाकडे निघाला. त्याने परत अंधार केला व बाहेर पडला. दार लावले. फक्त त्याच्याखालील सोडून, ही वाट इतर कुठल्याही वाटेपेक्षा अरुंद होती. तिथे लिफ्टची बाजू सोडून प्रत्येक बाजूला एक निळ्या रंगाचे दार होते. प्रत्येक दारावर सोनेरी क्रमांक व सोनेरी अक्षर लिहिलेले होते. टोनी १४, ब कडे चालत गेला आणि दाराला कान लावला. त्याला काही ऐकू आले नाही. इव्ह क्रेसी बहुधा झोपली असावी, बाथरूममध्ये असावी, गॅलरीत असावी किंवा दरवाज्यापासून काही अंतरावर, भिंतीकडे बघत, खोलीत बसलेली असावी. त्याने परत दाराला कान लावला. हे काही वेगळे होते. तिथे काही आवाज होता आणि सोनेरी चौकटीत एक पत्र होते. टोनी परत १४, ब कडे चालत गेला आणि दाराला कान लावला. त्याला काही ऐकू आले. एक मनुष्य खोकला. पण तो जरासा एकाकी खोकला वाटत होता. तिथे बाकी आवाज नव्हते.

टोनीने दाराशेजारील मोठे मोत्यासारखे बटण दाबले.

सावकाशीने टाकलेल्या पाऊलांचा आवाज आला व पाठोपाठ जाड आवाजात एक प्रश्न आला. टोनीने काही उत्तर दिले नाही. काही आवाज केला नाही. जाड आवाजाने परत हलकेच पण वाईट हेतूने प्रश्न परत विचारला. टोनीने परत घंटी वाजवली. सॅन डिएगोचा मिस्टर जेम्स वॅटरसन आता दार उघडेल व

रागावून काही बडबड करेल, असे वाटत होते. त्याने तसे केले नाही. बर्फशिखरावरील शांततेसारखी शांतता दारावर पसरली. परत एकदा टोनीने दाराला कान लावला. पूर्ण शांतता.

त्याने साखळीतील मास्टर किल्ली काढली आणि दाराच्या भोकात नाजूकपणे घालून फिरवली. दार आत लोटले व किल्ली काढून घेतली. मग तो थांबला.

आवाज कठोरपणे बोलला, “ठीक आहे. आत या.”

टोनीने दार पूर्ण उघडले आणि स्वागतकक्षातून येणाऱ्या उजेडात तो तिथे स्तब्ध उभा राहीला. तो मनुष्य काळ्या केसांचा, उंच व टोकेरी गोऱ्या चेहऱ्याचा होता. त्याच्या हातात बंदूक होती. त्याने ती त्याला सराव असल्यासारखी धरली होती.

तो आळशीपणे, सावकाश बोलला, “सरळ आत या.”

टोनी दारातून आत गेला आणि खांद्याने दार लावले. त्याने त्याचे हात बाजूंपासून थोडे लांब ठेवले. हुशार बोटे दुमडलेली व सैल ठेवली. तो त्याचे शांत, छोटेसे हसू हसला.

“मिस्टर वॅटरसन?

“आणि त्यानंतर काय?”

“मी येथील खोल्यांची सुरक्षा बघणारा गुप्तहेर आहे.”

“हे मला रक्तपात करून मारते आहे.”

उंच, गोरा आणि जरासा सुंदर, जरासा सुंदर नाही असा माणूस सावकाश मागे चालत, खोलीत आला. ती दोन्ही बाजूंना गॅलरी असलेली मोठी खोली होती.

प्रत्येक मनोरा खोलीत छोट्या, उघड्या खासगी गॅलऱ्या होत्या. आता या खोलीच्या गॅलऱ्यांची फ्रेंच दारे उघडली. सजवलेल्या, आनंदी टेबलासमोरील लाकडाचा ओंडका घातलेली शेकोटी पेटलेली होती. आरामशीर, खोल खुर्चीच्या बाजूला हॉटेलच्या ट्रेमध्ये, एक उंच, धुरकट पेला ठेवलेला होता. मोठी, चकाकणारी बंदूक जमिनीकडे रोखलेल्या दिशेने वळलेली दिसत होती.

तो बोलला, "ती मला मारते आहे. मी अडचणीत सापडलो आहे. आणि पोलीस मला पकडायला बघतो आहे. ठीक आहे असे कर, सामान ठेवायच्या कोनाड्यासारख्या खोलीत व बाथरूममध्ये बघ. पण ती आताच गेली."

टोनी म्हणाला, "अजून तू तिला पाहिले नाहीस."

माणसाचा पांढरा चेहरा अनपेक्षित सुरकुत्यांनी भरून गेला. त्याचा जाड आवाज, दात दाखवत जोराने भुंकणाऱ्या कुत्र्यासारखा वाटत होता. "कोणाला मी अजून बघितले नाही?"

"इव्ह क्रेसी नावाच्या मुलीला."

मनुष्याने आवंढा गिळला. त्याने त्याची बंदुक टेबलावर ट्रेशेजारी ठेवली. पाठीचा खालील भाग दुखणाऱ्या माणसासारखा, तो कडकपणे आरामखुर्चीत रेलून बसला. मग पुढे होऊन, त्याने त्याचे हात गुडघ्यांच्या पट्टीवर ठेवले व त्याचे चकाकीत दात दाखवत हसला. "म्हणजे ती इथे आली तर? मी अजून तिच्याबद्दल विचारले नाही. मी काळजी घेणारा मनुष्य आहे. मी अजून विचारले नाही."

टोनी बोलला, “ती इथे पाच दिवस तुझ्यासाठी थांबलेली आहे. तिने एक मिनिटही हॉटेल सोडले नाही.”

त्या माणसाचे तोंड थोडे हलले. त्याच्या हसण्यात थोडी माहितीची हालचाल होती. “मी उत्तरेकडून येतांना थोडा उशीरा आलो. ते कसे आहे ते, तुला माहिती आहे. जुन्या मित्रांना भेटणे. अरे पोलीसा, तुला माझ्या व्यवसायासंबंधी बरेच काही माहिती आहे.”

“ते बरोबर आहे, मिस्टर रेल्स.” तो मनुष्य निरखून बघत, टेबलावरील बंदूक हातात घेऊन उठून उभा राहिला. “बायका फार बोलतात.” तो त्याच्या दातात काही मऊ धरल्यासारखे, बोबडे बोलला. “ओहो, बोल, बोल. पोलीसा, मी काही ऐकत नाही आहे.”

“मिस्टर रेल्स, बायका नव्हे, बंदुकधारी पुरुष.”

परत त्यांच्यात पूर्ण शांतता पसरली. तो मनुष्य सावकाश सरळ झाला. त्याचा चेहरा निर्विकार होता. पण त्याचे डोळे खुनशी होते. जाड, बुटका अशक्त, मैत्रीपूर्ण चेहऱ्याचा व जंगलातील पाण्यासारखे साधे डोळे असलेला टोनी त्याच्यापुढे वाकला.

जॉनी रेल्स म्हणाला, “ती माणसे, कधीच स्वस्थ बसत नाहीत.” व ओठावरून जीभ फिरवली. लवकर आणि उशीरा ते काम करतात. जुनी संस्था कधी झोपत नाही.”

टोनी मवाळपणे बोलला, “ ती माणसे कोण आहेत, ते तुला माहिती आहे का?”

“मी नऊ तर्क करू शकतो. त्यातील बारा बरोबर असतील.”

टोनी कचकड्याचे हसू हसला, “ती त्रासदायक माणसे.” जॉनी रेल्स म्हणाला, “ती कुठे आहे?” “अगदी तुमच्याशेजारील खोलीत.”

तो मनुष्य भिंतीजवळ चालत गेला आणि बंदूक टेबलावर ठेवली. तो भिंतीचे निरीक्षण करत तिथे उभा राहिला. त्याने गॅलरीत जाऊन कठड्याचे निरीक्षण केले. जेव्हा तो वळला, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील काही रेषा नाहीशा झाल्या. त्याच्या डोळयात खूप शांत चमक होती. तो मागे झाला व टोनीजवळ उभा राहिला.

तो बोलला, “मी तिच्यात गुंतलेलो आहे. इव्हने मला काही माहिती पाठवली आहे. उत्तरेकडे मी त्यापासून काही बनवले आहे. म्हणजे मी केस तयार केली आहे, असे मला म्हणायचे आहे. त्रास देणारी माणसे पंचवीस हजार डॉलर बद्दल बोलतात." तो वेडावाकडा हसला. मी पाच गोष्टी मोजू शकतो. [चारित्र्य, क्षमता, मुद्दल, गहाणवट व अटी] ते बनवतांना मला फार मजा आली.

टोनीने दुर्लक्ष करत विचारले, “तू पैशांचे काय केलेस?”

“अरे पोलीसा, माझ्याकडे ते कधीच नव्हते. ते सोडून दे. मी त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या जगातील माणूस आहे. त्यांच्याशी माझा लहानसा करार होता."

टोनी म्हणाला, “मी यावर विश्वास ठेवतो.”

“ते नेहमी ठार करत नाहीत. पण ते भीतीदायक असू शकतात.”

टोनी अचानक कटूपणे रागावून बोलला, “बंदुकधारी माणसे म्हणजे लुटारुच.”

जॉनी रेल्स त्याच्या पेल्याशी पोचला व तो घटाघट रिकामा केला.

त्याने तो खाली ठेवल्यावर, त्यातील बर्फाचे खडे हेंदकाळत होते. त्याने त्याची बंदूक उचलली. तळहातावर ती नाचवली. मग ती मिटवून, छातीवरील आतल्या खिशात ठेऊन दिली. तो गालीच्यावरून चालू लागला.

“अरे पोलीसा, तू मला हे कसे काय सांगतो आहेस,?

“मला वाटले, तू तिला काही संधी देणार आहेस.”

“आणि मी दिली नाही तर?”

टोनी बोलला, “मला वाटते, तू देशील.”

जॉनी रेल्सने शांतपणे मान हलवली. “मी येथून बाहेर जाऊ शकतो का?”

“तू लिफ्टने गॅरेजपर्यंत जाऊ शकतोस. तू गाडी भाड्याने घेऊ शकतोस. मी तुला गॅरेजच्या माणसासाठी कार्ड देऊ शकतो.”

जॉनी रेल्स बोलला, “तू मजेशीर छोटा माणूस आहेस.”

टोनीने शहामृगाच्या कातडीचे झिजलेले पाकीट काढले व त्यातून एक छापलेले कार्ड काढून रेल्सला दिले. जॉनी रेल्सने ते वाचले व अंगठ्याच्या नखावर ते वाजवले. तो डोळे बारीक करून बोलला, “मी तिला माझ्याबरोबर नेऊ शकतो.”

टोनी म्हणाला, “तू सामान न्यायच्या लिफ्टमधून काही सामान टोपलीतून नेण्याचे ढोंग करू शकतोस. ती इथे गेले पाच दिवस आहे, हे मी तुला मगाशी सांगितले. तिला शोधून काढले गेले आहे. एका माणसाने मला बोलावून तिला इथून हाकलून द्यायला सांगितले आहे. ते कशाबद्दल आहे, ते सर्व काही त्याने मला सांगितले. त्यामुळे तिच्याऐवजी, मी तुला बाहेर काढतो आहे.”

जॉनी रेल्स बोलला, “त्यांना सर्वांना ते आवडेल. ते तुला शुभेच्छा पाठवतील.”

“माझ्या सुट्टीच्या दिवशी, मी त्याबद्दल शोक करेन.”

जॉनी रेल्सने त्याचा हात हलवला आणि तळहात निरखू लागला.

“तसेही इथून गायब होण्यापूर्वी मी तिला बघू शकतो. ती शेजारील खोलीतच आहे, तू म्हणालास. मी तिला भेटू शकतो.”

टोनीने दाराकडे जाण्यासाठी पाय वळवले. तो म्हणाला, अरे देखण्या माणसा, फार वेळ लाऊ नकोस. माझा विचार बदलू शकेल.”

तो मनुष्य सभ्यपणे बोलला, “मला माहिती आहे, त्याप्रमाणे तू मला आता पकडत आहेस.”

टोनी वळला नाही. “तुला ही संधी घ्यायला पाहिजे.”

तो दारातून खोलीबाहेर पडला. त्याने ती शांतपणे काळजीपूर्वक बंद केली. एकदा १४ अ चे दार पाहीले व अंधारी लिफ्टमध्ये शिरला. तो खाली सेवा देणारी लिफ्ट जिथे थांबली होती त्या मजल्यावर गेला. जॉनी रेल्सला लागणारे सामान एका टोपलीत घेऊन निघाला. दार शांतपणे बंद झाले. त्याने ते आवाज करणार नाही, अशा रीतीने धरून ठेवले. खाली गुरख्याच्या खोलीतून पॅसेजमध्ये उजेड पडत होता. टोनी परत लिफ्ट घेऊन, खाली स्वागतकक्षापर्यंत गेला.

छोटे गोल दगड भरलेल्या काचेच्या पडद्यामागे, छोटा कारकून हिशेब करतांना दिसेनासा झाला. टोनी मुख्य स्वागतकक्षातून गेला आणि रेडीओच्या खोलीत शिरला. परत रेडीओ हळू आवाजात चालूच होता. तिथे ती होती.

सजावट केलेल्या लिहिण्याच्या टेबलावर, वाकून बसली होती. रेडीओचा हळू आवाज तिच्यावर आदळत होता. तो इतका हळू होता, की फक्त काही गुणगुण ऐकू येत होती. तिने डोके वळवले व त्याच्याकडे बघून हसली.

"वर जाऊन दरवाज्यांची तपासणी करुन झाली? मला जराही झोप आली नाही. म्हणून मी परत खाली आले."

"ठीक आहे?"

तो हसला व मान हलवली. तो हिरव्या खुर्चीत बसला आणि खुर्चीच्या भरतकाम केलेल्या पोकळ कापडी हातावर थोपटले. "मिस क्रेसी, नक्की. थांबणे हे सर्वात कठीण काम आहे, नाही का? मला वाटते, तू त्या रेडीओशी बोलायला हवे होतेस."

टोनीला त्याचे आवडते काहीच मिळाले नाही, म्हणून तो अस्वस्थ झाला. तो होता, तिथेच राहीला. तो भरपूर बिअर प्यायला.

ती परत त्याच्याकडे बघून हसली.

"मिस क्रेसी, मी इथे असल्याने तुला काही त्रास होत नाही ना?"

"मला ते आवडते. टोनी, तू तर छोटासा गोड माणूस आहेस."

त्याने कडकपणे मजल्यावर पाहीले. त्याच्या कण्यातून एक लहर दौडत गेली. तो ती निघून जाण्यासाठी थांबला. हळूहळू ती गेली. मग तो परत आरामशीर बसला. त्याची छान बोटे मोठ्या हरीणासारख्या नशीबवान दातावरून फिरू लागली. तो रेडीओ नव्हे तर --- दूरदूरच्या काही ठराविक नसलेल्या त्रासदायक

गोष्टी ऐकू लागला. आणि कदाचित विचित्र रात्रीत सुरक्षितपणे गरगर फिरणाऱ्या चाकाचा आवाज.

तो मोठ्याने म्हणाला, "कोणीच सर्वथा वाईट नसते. मला दोन तीन चुकीचे लोक भेटले आहेत."

मुलगी त्याच्याकडे आळशीपणे पहात होती. त्याने मान हलवली. त्याने चांगल्या मनाने कबूल केले. "मला वाटते, त्यापैकी ते असावेत."

मुलीने जांभई दिली, तिचे खोल किरमिजी डोळे अर्धवट मिटले व उशीत डोके खुपसले. "टोनी, तिथे जरा वेळ बस. कदाचित, मला एक डुलकी काढायची आहे."

"नक्की. मला करायला काहीच नाही. मला समजत नाही, की ते मला पगार का देतात."

ती पूर्ण शांतपणे एखाद्या मुलासारखी लगेच झोपली. टोनीने कसाबसा दहा मिनिटे श्वास घेतला. तो तोंड थोडेसे उघडे टाकून, तिचे निरीक्षण करत होता. चर्चमधील पाव आणि वाइन ठेवायच्या वेदीवर बघत असल्यासारखे, त्याच्या पारदर्शक डोळ्यात, शांत कुतूहल होते.

मग  स्वागतकक्षात शिरण्यासाठी अतिशय काळजी घेऊन कमानीखाली उभा राहिला. टेबलाशी तो काही काळ ऐकत उभा राहीला. त्याला दिसत नसलेले पेन कागदावर उठतानाचा आवाज आला. तो कोपऱ्याशी फिरला. खोलीमधील फोनचे संपर्कस्थान असणाऱ्या काचेच्या जागेशी गेला. त्यापैकी एक फोन उचलून, त्याने रात्रीच्या माणसाला गॅरेजला फोन जोडून द्यायला सांगितले.

तो तीन चार वेळा वाजला. मग एक पोरकट आवाज उत्तरला, “विंडरमिअर हॉटेल. गॅरेजमधून बोलतो आहे.”

“मी टोनी रीसेक आहे. त्या वॉटरसन नावाच्या माणसाला मी कार्ड दिले. तो गेला का?”

“नक्कीच गेला, टोनी. अर्ध्या तासापूर्वी. तो तुझा माणूस आहे का?"

टोनी बोलला, “हो. माझा माणूस. आभारी आहे. तुला भेटतो.”

तो तिथे मान खाजवत थांबला. मग परत टेबलाशी जाऊन त्याने त्यावर हात आपटला. कारकून त्याच्या जागी सुहास्य मुद्रेने बसला होता.

टोनीला बघितल्यावर ते हास्य लोपले.

तो कुरकुरत बोलला, “हा माणूस त्याच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाही का? १४ ब चे भाडे काय आहे?”

वाईट मनस्थितीत कारकुनाने रोखून बघितले. “मनोऱ्याच्या खोलीत व्यावसायिक दर नाहीत.”

“मग तसे लावा. तेथील माणूस आधीच सोडून गेला आहे. तो तिथे फक्त एक तास होता.”

कारकून गंभीरपणे न घेता म्हणाला, “ठीक आहे. ठीक आहे. म्हणजे आपण आज रात्री त्याला नाराज केले नाही. तो गुप्त, अयोग्य पद्धतीने गेला. आपण त्याला गुप्त, अयोग्य पद्धतीने बाहेर काढले."

“पाच डॉलरमध्ये तुझे समाधान होईल का?

“तुमचे मित्र?”

‘नाही. फक्त प्यायलेला, चुकीची श्रद्धा असणारा व रुबाबदार आणि काही बेत नसणारा."

“टोनी, तर्क कर. आपल्याला हे प्रकरण असेच तरंगत ठेवले पाहिजे. तो बाहेर कसा गेला?”

“मी त्याला लिफ्टने खाली आणले. तुम्ही झोपला होतात. “पाच डॉलरमध्ये तुझे समाधान होईल का?”

टोनीने शहामृगाच्या कातडीचे झिजलेले पाकीट काढले आणि पाच डॉलर संगमरवरावरून घसरले. टोनी सैलपणे बोलला, “मी एवढे देऊ शकतो.”

कारकुनाने ते घेतले आणि तो गोंधळलेला दिसला. तो शहारून

म्हणाला, “तुम्ही बॉस आहात. टेबलावरील फोन उच्च रवात खणखणत होता. त्याकडे तो पोचला. त्याने तो कानाला लाऊन ऐकला आणि मग टोनीला देत म्हणाला, “तुमच्यासाठी.”

टोनीने फोन घेतला व प्रेमाने छातीशी धरला. त्यात तोंड घातले. तो गोंधळलेला दिसत होता. तो आवाज त्याच्यासाठी विचित्रपणे परका होता. तो धातूसारखा आवाज होता. शब्दोच्चार नेमके व कुणा बिनमाहितीच्या व्यक्तीचे होते.

“टोनी? टोनी रीसेक?”

“बोलतो आहे.”

“अ १ सा --- ठी निरोप. गोळी झाडायची?”

टोनीने कारकुनाकडे पाहीले. तो फोनवर म्हणाला, “आधी जवळचा मित्र बनल्याचे नाटक कर.” कारकून त्याच्याकडे बघून थोडे हसला व निघून गेला. “मग गोळी झाड.” टोनी फोनवर बोलला. “तुझ्या हॉटेलमध्ये उतरलेल्या माणसाकडे माझे थोडे काम आहे. झटपट जाऊन, त्याला पकड. त्याला भीती आहे, की तू त्याला वाकायला लावून हाकलून देशील. त्याला पकडून बेड्या घाल. हे इतके चांगले नाही. पण त्याला फसवून ठार मार.” टोनीने कानशीलाजवळ फोन घट्ट धरला होता. हवेतील पाण्याच्या वाफेने, तो निथळत होता. “जा. मला वाटते, तिथे अजून काही आहे.”

“थोडेसे.” लहानाने मोठ्याला थंडपणे थांबवले. “मला त्याने तुझा निरोप घ्यायला सांगितले आहे.”

टोनी टेबलावर कडकपणे वाकला. तो बोलला नाही पण तोंडाने काही आवाज काढला.

धातूसारखा व कंटाळलेला आवाज अधीरपणे म्हणाला, “समजले? या माणसाकडे एक सळई आहे. त्याने ती वापरली आहे. तो आता कुणाला फोन करत नाही.”

टोनीने फोन धरुन वेडीवाकडी हालचाल केली आणि त्यामुळे गुलाबी संगमरवर हलले. त्याचे तोंड कोरड्या, कडक गाठीसारखे झाले होते.

आवाज बोलला, “अरे गाढवा, आपण एवढ्या मर्यादेपर्यंत जाऊ शकतो. शुभ रात्र.” भिंतीवर दगड मारावा, तसा फोन वाजला.

परत असा आवाज येऊ नये म्हणून, टोनीने काळजीपूर्वक फोन खाली जागेवर ठेवला. त्याने त्याच्या घट्ट बंद केलेल्या डाव्या हाताच्या मुठीकडे बघितले.

त्याने हातरुमाल बाहेर काढून, हळूवारपणे तळवा पुसला व दुसऱ्या हाताची बोटे सरळ केली. मग कपाळ पुसले. पडद्यामागून कारकून आला व चमकदार डोळयांनी त्याच्याकडे बघू लागला.

"शुक्रवारी मी सुट्टीवर असतो. तो फोन क्रमांक मला देण्याविषयी काय?"

टोनीने कारकुनाकडे बघून, मान हलवली व मिनिटभर नाजूकपणे हसला. त्याने रुमाल बाजूला केला व खिशात ठेवला. तो वळून टेबलापासून बाजूला गेला. स्वागतकक्ष ओलांडला. मुख्य स्वागतकक्षातील तीन लहान सावलीच्या पायऱ्या उतरला व कमानीखालून परत रेडीओच्या खोलीत आला. खोलीत कुणी आजारी असल्यासारखा चोरट्या पाऊलांनी चालला. तो पूर्वी बसलेल्या खुर्चीत बसला आणि इंचाइंचाने स्वतःला खाली आणले. मुलगी सर्व मांजरांसारखी व काही बायकांच्या गोल गोल बेफिकीरीने स्वस्थ झोपली होती. रेडीओच्या फुकटच्या गुणगुणण्याच्या आवाजापुढे तिच्या श्वासाचा जराही आवाज येत नव्हता.

टोनी रीसेक खुर्चीत रेलून बसला. त्याच्या मोठ्या हरीणासारख्या, नशीबवान दातावर हात गुंफून ठेवले आणि शांतपणे डोळे मिटले.

# Spider

By

M G Eberhart

# कोळी



टेलीफोन पकडत सुसान डरे म्हणाली, “पण हे छान आहे. तुम्ही नुसतेच मी घाबरते, असे म्हणू शकत नाही. तुम्हाला कशाला तरी घाबरले पाहिजे.” ती थांबली, पण उत्तर मिळाले नाही.

आता ती शांत, स्तब्ध आवाजात बोलली, “म्हणजे तुला म्हणायचे आहे की, मी या पूर्णपणे विचित्र घरात एका पूर्णपणे विचित्र बाईची पाहुणी बनून जावे --- “

“मी मला नाही, तुला सांगतो आहे. पण तू तर म्हणतेस, तू तिला कधीच पाहिले नाहीस.” जिम बायरन कडकपणे बोलला, “वेड्यासारखे बोलू नकोस. अर्थात मीदेखील तिला कधीच पाहिलेले नाही. सुसान, आता हे सरळपणे घे. ही बाई कॅरोलीन वरे आहे. वरेंपैकी एक.”

सुसान म्हणाली, “नीट समजले. म्हणून मी तिच्या घरी जाऊन, तिला नसांचे दुखणे का झाले आहे, ते बघू आणि बॅग भरून घेऊन, पुढील काही दिवस मी तिची पाहुणी बनून राहू? जिम, मला माफ कर. मी कामात व्यग्र आहे. मला या आठवड्यात एका खुनाची गोष्ट तयार करायची आहे आणि --- “

जिम बोलला, “सुसान, मी गंभीरपणे बोलतो आहे.”

सुसान मध्येच थांबली. तो गंभीर होता.

“सुसान, मला माहिती नाही, की मी हे कसे स्पष्ट करू? हे फक्त --- म्हणजे मी आयरिश असल्याचे तुला माहिती आहे. आणि मी गूढ आहे. --- हसू नकोस.”

सुसान म्हणाली, “मी हसत नाही आहे. मला स्पष्टपणे सांग, की तुला मी काय करायला हवे आहे.”

“फक्त --- निरीक्षण कर. तिथे काही धोका नसणार आहे.”

सुसान समजून चुकली, की ती जात आहे. “तिथे किती वरेज आहेत? आणि तुला काय वाटते, तिथे काय होणार आहे?”

“तुला तिथे धोका असेल, असे कसे होईल? धोका आणि तुला?”

“तिथे चार वरेज आहेत. पण कॅरोलीनने घाबरावे, असे तिथे काय चालले आहे, ते मला माहिती नाही. -- तिच्या आवाजात मला भीती जाणवली --- त्यामुळे मी तुला बोलावले.”

सुसानने विचारले, “त्या घराचा क्रमांक काय आहे?”

त्याने सांगितले, “ते बरेच उत्तरेला आहे. जुन्या घरांपैकी एक ---

म्हातारा एफीनस वरे मेल्यापासून न बदललेले --- अरुंद व उंच. तुला माहिती आहे, तो माझ्या वडीलांचा जवळचा मित्र होता. कॅरोलीनने मला का बोलावले, ते मला माहिती नाही. माझी अशी पुसट धारणा आहे की, तिला वाटले असेल, की वर्तमानपत्रातील माणसाला माहिती असेल, की काय करायचे. आता मी कॅरोलीनविषयी सांगतो. ती एफीनस वरेची मुलगी आहे. डेव्हिड हा त्याचा नातू आहे आणि घरातील देखरेख करणारा नोकर सोडून, घरात पुरुष माणूस फक्त तिचा हा भाचा आहे. मला वाटते, तो तरुण असून, विशीतला आहे. तो लहान असतांना त्याचे आईवडील वारले.”

“तिथे तीन बायका आहेत, असे तुला म्हणायचे आहे?”

“अर्थात. तिथे म्हाताऱ्या वरेने दत्तक घेतलेली मेरी आहे, ती वरे नाही. पण इतरांपेक्षा, ती बरीचशी त्याच्यासारखी आहे. आणि कॅरोलीनची चुलत बहीण जेसिका आहे. तिचे वडील लवकर वारल्यामुळे, ती कायम तिच्या वरेकाकांबरोबर राहिलेली आहे. लोकांना वाटते, की या तिघी बहीणी आहेत. खरे तर त्या बहिणी नाहीत. पण म्हाताऱ्या एफीनस वरेने त्याची संपत्ती या तिघींमध्ये सारखी वाटली आहे.”

“आणि त्या तिघी एकत्र रहातात?

“हो, डेव्हिडने लग्न केलेले नाही.”

त्याचे सांगून संपलेले बघून, सुसान म्हणाली, “तुला त्यांच्याबद्दल एवढीच माहिती आहे का?”

“मला सर्वच माहिती आहे. पण तुला तिथे जाण्यासाठी एवढी माहिती पुरेशी असावी, नाही का?

जिम बायरन पूर्णपणे शुद्धीत, पूर्ण स्पष्टीकरण देऊन म्हणाला, “ती फारच घाबरली होती. म्हणजे वयस्क कॅरोलीन.”

सुसानने पुन्हा एकदा पत्ता समजून घेत विचारले, “तिला कसली भीती वाटत होती?”

जिम बायरन म्हणाला, “मला माहिती नाही. हे विचित्र आहे, मला वाटते, तिलाही ते माहिती नाही.”

पाच वाजायला आले होते. हिवाळ्यातील लवकर होणाऱ्या संधीप्रकाशाबरोबर तळयाच्या बाजूने धुके पसरत चालले होते, तेव्हा सुसानने त्या मोठ्या, जुन्या घराची घंटी वाजवली व ती थांबली. रस्त्यावरचे दिवे लागले होते. पण घरात अंधार होता. खिडक्यांना पडदे होते. दार जड आणि गुप्त भासत होते. पण ते तिची अपेक्षा करत होते, निदान कॅरोलीन वरे तरी. हे सर्व फोनवर ठरले होते. सुसानला नवल वाटत होते, की जिम बायरनने कॅरोलीनला तिच्याबद्दल काय सांगितले होते.

*छोट्या जॉनीला त्याच्या बहीणीची उणीव भासली. त्याना तिची उणीव भासण्यापूर्वी ती वारली होती. फक्त सहा वर्षांचा जॉनी खूप छान व मिस्कील होता*

या एका प्रसिद्ध गाण्याच्या धूनवर घंटा वाजून, तिला भूल घालत होती व ती अधीरपणे सतत दगडावर ठेका धरत होती. मग दरवाज्यावरील दिवा चमकू लागला. सुसानने ओलसर हवेचा एक खोल श्वास घेतला. अचानक तिला तिच्या नसा घट्ट झाल्यासारख्या वाटल्या. दार उघडणार होते. दाराला मोठी फट पडली आणि उष्ण हवेचा झोत सुसानच्या गालांवर आला. पलीकडे थोडासा उजेड असलेला हॉल होता आणि उंच, अंगाबरोबर कपडे घातलेली, लांब स्कर्टमधील एका बाईची आकृती दिसू लागली.

तिने जोरात विचारले, “काय हवे आहे?”

सुसान म्हणाली, “मी सुसान डरे आहे.”

ती आकृती बाजूला झाली व दार पूर्ण उघडत म्हणाली, “ओहो, हो. मिस डरे, आत या. आम्ही तुमचीच वाट बघत होतो.”

तिच्यामागे दार पूर्णपणे लागल्यावर व ती बाई वळल्यावर, सुसानला तिचे अंधारात चलबिचल करणे आठवले.

ती बोलली, “मी मिस जेसिका वरे आहे.”

‘जेसिका, म्हणजे ही चुलत बहीण आहे, तर.’

ती उंच, मोठ्या हाडापेराची, जड, काळ्या चेहऱ्याची, काळे/करडे केस उंच बांधलेली व लांब, दणकट हातांची बाई होती. तिच्या अंगावर इतक्या जुन्या फॅशनचे कपडे होते, की सुसानला ते किती जुन्या काळातील होते, ते कळेना.

ती बोलली, “आम्ही तुमची वाट बघत होतो. पण कॅरोलीन बाहेर गेली आहे. ती दिव्याखाली, एका लांब आरशाशेजारी उभी राहिली. त्या क्षणी

सुसानच्या मनात, त्या जुन्या, गर्दीच्या पण डौलदार घराबद्दल गोंधळलेले भाव निर्माण झाले. आरसा हलत होता आणि रुंद सोनेरी चौकटीत बसवलेला होता. मोठ्या संगमरवरी फुलदाणीत नेच्याचा गुच्छ ठेवलेला होता. तिथे संगमरवरी पुतळे होते.

जेसिका म्हणाली, “आपण वर तुमच्या खोलीत जाऊ. तुम्ही आता शिकॅगोमध्ये खूप दिवस असाल. इकडून या. तुमच्या बॅगा इथे ठेवा. जेम्स त्या नंतर वर आणेल. आता तो बाहेर गेलेला आहे.”

सुसानने तिची लहानशी बॅग खाली ठेवली आणि जेसिकाच्या मागोमाग गेली. उंच खांबाभोवती जिन्याच्या कोरलेल्या, पायऱ्या होत्या. त्या जाड गालीच्याने झाकलेल्या होत्या. घर एकदम स्तब्ध होते. तो शांत जिना चढू लागल्यावर, जास्तच गरम होऊन, उकडू लागले.

जिन्याच्या वरच्या टोकाशी मजबूत शरीराची जेसिका ताठ राहून वळली. ती म्हणाली, “तुम्ही इथे एक मिनिट थांबाल का? मला खात्री नाही, कुठली खोली --- “

सुसानने काही होकारार्थी हावभाव केले, आणि जेसिका घराच्या मागील बाजूकडे जाणाऱ्या पॅसेजच्या बाजूला वळली.

घर फारच गरम होते. तिथे जुन्या, भावनामय फर्निचरची गर्दी होती. फारच शांत!

सुसान अस्वस्थपणे थोडी हलली. तसे पाहिले, तर ते एक आल्हादक घर होते. पण कॅरोलीनला कसली तरी भीती होती --- फक्त शांततेची, गंभीरतेची व उष्णतेची नव्हे, तर गुप्त भासणाऱ्या जुन्या भिंतींचीही. तिने हॉलच्या लांबीकडे

नजर टाकली व परत तिच्या शेजारील जिन्याच्या मधल्या खांबावर हात ठेवण्यासाठी ती हलली.

तिच्या हाताच्या दाबाने वरील कोरीव छत थोडे हलल्यासारखे वाटले. या घरातील जीवन विचित्र असल्याची तिची भावना बळकट झाली.

मग ती तिच्यापुढे असलेल्या सरळ, उघड्या झगमगीत दाराकडे जायच्या वाटेवर निरखत बसली. त्यापलीकडे एक मोठी खोली होती, अर्धी झोपायची खोली आणि अर्धी उठाबसायची खोली. टेबलावरील दिवा उजेडाचा गोल पाडत होता आणि टेबलाशेजारी, मांडीवर पुस्तक असलेली एक स्त्री कडेने दिसत होती.

ती नक्कीच मेरी वरे होती --- मोठी बहीण, दत्तक घेतलेली वरे. ती इतर कुणाहीपेक्षा, म्हाताऱ्या एफीनस वरेसारखी होती. तिचा चेहरा अंधारात होता. त्यामुळे सुसानला ढोबळ मानाने मासल, गोरा चेहरा दिसत होता व काळ्या चकाकीत केसांची गाठ छातीवरील काळ्या रेशमी वस्त्रावर दिसत होती. त्या मांसल, ताणरहित आकृतीला एक प्रकारची आरामशीर सहनशीलता होती. सावलीतील जाळ्यात एक मोठी मादी कोळी दबा धरून होती. पण कशावर दबा धरून होती?"

तिला सुसान तिथे आलेली मात्र कळले नाही, कारण ती वळली नाही.

सुसानच्या नसांवरील वाढता ताण घालवण्याचे कुणी मनावर घेत नव्हते. उकाड्याने ती झोपाळू व कल्पनेत रमणारी झाली होती. मेरीने काळा रेशमी ड्रेस केलेला असल्याने केवळ त्या त्रासिक नसलेल्या म्हाताऱ्या बाईला काळी कोळीण म्हटले जात होते. सुसानला दिसत होते, तोपर्यंत तरी मेरी तिच्याकडे बघत नव्हती,

पण अचानक टेबलावर काही हालचाल झाली. सुसानने तिकडे पाहिले आणि अवाक होऊन तिचा श्वास रोधला गेला.

तिथे टेबलावर बरोबर दिव्याखाली लांब शेपटीवाला, एक छोटा करडा प्राणी होता. तो दक्ष होऊन एका खोक्यावरील झाकण काढत होता आणि त्याचे छोटे हात खोक्यात घालत होता.

सुसानने अंगात आल्यासारखा विचार केला, ‘हे माकड आहे --- कोळी माकड आहे का? ते त्याचा लहानसा चेहरा धक्का देऊन खोलीभर फिरवत होते व तेजस्वी, भेदक डोळयांनी इकडे तिकडे बघत होते. ते खोक्यातील पदार्थ मग्न होऊन, रागारागाने खात होते. त्यांनीही, कसे कोणास ठाऊक, पण सुसानला पाहिले नाही. किंवा कदाचित, ती त्याने तिच्यात रस घ्यायला फार लांब असेल. अचानक ते दृष्य चौकसपणे बदलले.

सुसानने त्या नवलपूर्ण घरातील दाहकता सोडून विचार केला आणि ती पॅसेजमधून तिच्याकडे येणाऱ्या स्कर्टच्या सळसळीकडे वळली. ती जेसिका होती. तिने सुसानकडे पाहिले आणि मग उघड्या दाराच्या पार बघून थंडपणे हसली.

ती म्हणाली, ‘मेरी बहिरी आहे. मला वाटते, तुम्ही इथे असल्याचे तिला समजले नाही.”

सुसान बोलली, “नाही.”

तिने तिच्या लांब हाताने कडकपणे हावभाव केले आणि उघड्या दारातून खोलीत शिरण्यासाठी वळली. तिचे हिरवे रेशमी कपडे सळसळल्याने छोट्या माकडाने इकडे तिकडे हालचाल केली व तिच्याकडे भेदक, काळा कटाक्ष

टाकला. ते टेबलापासून लांब गेले. झरकन करडी पलटी मारली. ते खोलीतून पळून जातांना, जुन्या सोफ्याखाली जाऊन बसले.

पण जेसिका त्याला ओरडली. ती जोराने म्हणाली, “मेरी”

मग तिथे ती थबकली. तिच्या उडणाऱ्या, करड्या स्कर्टची सावली टेबलावरील दिव्याच्या प्रकाशात, पडलेली पाहून माकड नकळत त्याचा पंजा चाटू लागले.

पूर्णपणे बहिऱ्या असणाऱ्या मेरीने भावना न दाखवता म्हटले, “काय जेसिका.”

“कॅरोलीनच्या मैत्रिणीची मुलगी असलेली --- सुसान डरे इथे आली आहे. तुला तिला भेटायचे आहे का?”

“भेटायचे आहे का? नाही. नाही. आता नाही. नंतर.”

“ठीक आहे. तुला काही हवे आहे?”

“नाही.”

“तुझ्या उशा?”

तिची कडक पाठ वाकवून, जेसिकाने मेरीच्या मागे नीटपणे उशी लावली. मग ती परत सुसानकडे वळली. जेसिकाने तिची कडक पाठ खोलीकडे वळवली, तेव्हा माकड सोफ्याखालून बाहेर आले व टेबलाच्या व खोक्यातील पदार्थाच्या दिशेने खोलीतून धाऊ लागले. तेव्हा सुसानला विचित्रपणे काहीसे भारावल्यासारखे व थोडेसे धक्का बसल्यासारखे झाले.

सुसानने विचार केला, की ते माकड आजारी असावे.

घर इतके तापलेले असले, तरी सुसानच्या अंगावर किंचित शहारा आला. लोक माकडे का पाळतात?

“इकडून ये.” जेसिकाच्या पाठोपाठ ती खाली गेली आणि तिला अपेक्षित असलेल्या अशा झोपायच्या खोलीत शिरली, ती ठामपणे बोलली, “अशा तऱ्हेने, पण व्हिक्टोरियन काळातील जशाच्या तशा असणाऱ्या खोलीचे निरीक्षण करण्यासाठी, जेसिका तिला एकटीला सोडायला तयार नव्हती. सुन्न करणाऱ्या काहीशा अंधारी नजरेने सुसानने तिची लहानशी, वाकडी टोपी परत तिच्या हलक्या केसांवर बसवली आणि कोट खुर्चीच्या पाठीला लाऊन ठेवला. लगेच जेसिकाने तो उचलून मोठ्या, अंधारी कपाटात ठेवला. जेसिका म्हणाली, की नोकर व दुसरी मुलगी बाहेर गेले आहेत. कारण आज त्यांचा बाहेर जायचा अर्धा दिवस आहे. त्यांची कामे स्वयंपाकी करत होता.

ती अचानक सुसानला म्हणाली, “मला वाटले होते, त्यापेक्षा तू तरुण आहेस. आता आपण खाली जायचे का?” त्या जशा जिना उतरून, खालील हॉलमध्ये जाऊ लागल्या, तसे कुठले तरी घड्याळ लांब, थरथरणारे टोले देऊ लागले.

जेसिका म्हणाली, “पाच. आता लवकरच कॅरोलीन व डेव्हिड परत येतील. तो सहसा पाचनंतर थोड्याच वेळात घरी परततो. म्हणजे पाऊस पडत नसेल, तर. रस्त्यावरील गर्दीमुळे, त्याला कधीकधी उशीर होतो. पण आज पाऊस पडत नाही आहे.”

सुसान बोलली, “आज धुके आहे.” ती जेसिकाचा लांब हात धरून, खुर्चीकडे गेली. पण ती आरामदायी खुर्ची नव्हती. जेसिका तिच्यासमोरील रेशमी

खुर्चीत मांडीवर तिचे हात दुमडून, ताठ बसली होती. विचार करून, एखाददोन वेळा सुसानने बोलायला सुरवात केली, पण ती गप्प झाली. तिच्या अचानक लक्षात आले, की ती ते दृष्य, आवाज आणि भावना जाणून घ्यायला खूप उत्सुक आहे. हे काही फार आनंदी वाटणे नव्हते.

जे आणि जसे आयुष्य ते जगत होते, ते तिच्यावर लादत असल्याची विचित्र भावना तिला होत होती ---जसे काही लांब शब्द आणि गुदमरलेली कुजबुज, त्या उष्ण हवेत भरून राहिली होती.

ती चुळबुळ करत व मेरी वरेचा विचार न करण्याचा प्रयत्न करत बसली. एकदा मेरीला बघितल्यावर व तिचे बोलणे ऐकल्यावर, त्या मनाच्या लहरीनुसार जगणाऱ्या व स्वतःच्या सावलीच्या कोशात थांबून राहिलेल्या तिच्याविषयी विचार न करणे, किती अवघड होते!

जुन्या घरात रहाणाऱ्या, तीन म्हाताऱ्या. त्यापैकी दोघींना तिने पाहिले व ऐकले होते आणि तिला माहिती होते, तेवढे सोडून, तिला त्यांच्याबद्दल काहीच माहिती नव्हते. कॅरोलीनचे काय? ती घाबरणारी कॅरोलीन! ती पुन्हा शहारली. जेसिका निरीक्षण करत होती. जरी घराच्या मागील भागात घंटा वाजली, तरी त्यांनी ती ऐकली. जेसिका समाधानी दिसत होती. ती उठली.

ती म्हणाली, “हा डेव्हिड आहे.” हॉलच्या दारात उभी राहून, ती वेगळ्या आवाजात बोलली, “आणि मला वाटते, कॅरोलीन सुद्धा.”

सुसानला जाणवत होते, की तिला ताण आला आहे. हो, त्या घरात तिच्यासाठी घाबरण्यासारखे काहीच नव्हते --- सुसान डरेला --- भीती वाटण्यासारखे! भीती कॅरोलीनला वाटत होती.

मग दारात एक वेगळीच बाई उभी राहिली. नक्कीच कॅरोलीन. उंच, शेलाटी बाई. सोनेरी केसांची, थोडी थरथरणारी, हलका संशय असलेली. ती काही बोलली नाही. तिचे मोठे डोळे निळे असून ताप आल्यासारखे होते. तिच्या रोडावलेल्या गालांवर दोन तेजस्वी, गुलाबी डाग दिसत होते. आणि तिचे रिकामे बारीक हात हलत होते. सुसान उठून तिच्याजवळ गेली व तिचे हात हातात घेतले.

कॅरोलीन बोलली, “तू तर इतकी तरुण आहेस.” तिच्या आवाजात वैषम्य जाणवत होते.

सुसान म्हणाली, “नाही, खरे तर एवढी नाही.”

कॅरोलीन बोलली, “आणि एवढी लहान --- “

सुसान एखाद्या उदास मुलाशी बोलावे, तसे सावकाश म्हणाली, “पण त्याचे एवढे काही नाही.”

हॉलमधून आवाज येत होते. पण तिचे मुख्य लक्ष कॅरोलीनकडेच होते. कॅरोलीन सुसानच्या डोळ्यात बघत म्हणाली, “नाही, मला नाही असे वाटत.”

चौकस दिसायचा प्रयत्न करत, घाबरलेला जिम काही बोलला.

कॅरोलीनचे डोळे सुसानकडे लागले होते आणि ती काहीतरी बोलणार होती, तेव्हा दारात काही सळसळ झाली. अवाक होऊन, कॅरोलीनचे खात्री नसलेले ओठ बंद झाले आणि जेसिका खोलीत आली.

सुसानने विचार केला, ‘पण तिला कसली भीती वाटते, हे मला कळायला हवे. मला जेसिकापासून दूर --- तिच्याशी एकटीशी बोलायला हवे.”

जेसिका म्हणाली, “कॅरोलीन, तुझा कोट काढ. तिकडे उभी राहू नकोस.

तू सुसान डरेशी बोल. तुझी टोपी व कोट वर ठेव आणि मग परत खाली ये.”

जेसिकाचा आवाज नुसता कडक नव्हे, तर आक्रमक होता. “जा.”

कॅरोलीन बोलली, “हो, जेसिका.”

जेसिका म्हणाली, “मेरी वाचते आहे. तिची इच्छा असल्याशिवाय तिच्याशी आता बोलू नको. तू सुसान डरेला नंतर तिला भेटायला घेऊन जा.”

“हो, जेसिका.”

कॅरोलीन निघून गेली आणि तिच्या जागी एक मनुष्य उभा राहिला. जेसिकाच्या अमूल्य ओळख करून देण्याबद्दल, सुसान काही शब्द पुटपुटत होती.

डेव्हीडचे केस सोनेरी आणि डोळे गडद निळे होते. तो बारीक आणि चांगला उंच होता. त्याचा चेहरा चांगला व भावनाशील होता. कानशीले आणि डोळयांजवळचा त्याचा भाग --- सुसान त्यासाठी शब्द शोधत होती, आणि तो मिळाला --- तिथे पश्चात्तापदग्धता होती. तो बळकट आणि उत्साह असलेला होता. घरातील एकमेव तरुण --- पण तो आनंदी नव्हता, हे सुसानला लगेच समजले. तो म्हणाला, “मिस डरे, काय कसे काय?”

कमी कडक आवाजात जेसिका बोलली, “डेव्हिड, वर जाऊ नकोस. तू विश्रांती घ्यायला हवीस.” ती त्याच्याकडे रस घेऊन बघत होती.

“जेसिका मावशी, आता नाही. मिस डरे, मी तुम्हाला नंतर भेटतो.”

तो निघून गेला. जिन्याशी जातांना त्याने विचारले, “मेरीमावशी ठीक आहे?”

परत कडक आवाजात जेसिका म्हणाली, “उत्तम. ती वाचते आहे.”

नंतर सुसानने तिला डेव्हिडच्या पाऊलांचा जिन्यावर आवाज येतो का, हे आठवायचा प्रयत्न केला. किंवा तिच्या नकळत, ती त्याला जिना चढायला किती वेळ लागतो, तो कदाचित हॉलमध्ये फेऱ्या मारत असेल का किंवा खोलीत शिरत असेल का, हे बघायचा प्रयत्न करत होती. तिची खात्री होती, की जेसिका बोलणार नाही. ती फक्त तिथे बसेल.

जेव्हा डेव्हिड मेरीबद्दल बोलला, तेव्हा जेसिका परत कडक आणि कठोर का झाली? का?''

मोठ्या, भीतीदायक, काही फुटल्याच्या आवाजाने घरातील शांततेचा भंग केला. तो आवाज सुसानवर चालून आला. ती त्यात बुडाली. त्यात सगळे घर बुडाले आणि त्याच्या नाशकारक व असह्य लाटा हळूहळू ओसरल्या.

सुसानच्या लक्षात आले, की ती उठून उभी राहिली आहे व जिन्याच्या दिशेने जाऊ बघत आहे. तिचे तोंड करडे झाले असून, जेसिकाने तिच्या हाताला धरले आहे. जेसिका सहज समजेल अशा तऱ्हेने बोलली, ‘‘ओहो, देवा रे, डेव्हिड --- ‘‘

सुसानने तिला तिच्यापासून दूर ढकलून दिले.

ती जिन्याशी पोचली. तिच्याशेजारी जेसिका होती आणि जिन्याच्या वरील टोकाशी दोन आकृत्या चिकटून उभ्या असून, वरील हॉलमध्ये भांडत होत्या.

जेसिका किंचाळली, ‘‘कॅरोलीन, तू काय करते आहेस? मेरी कुठे आहे? कुठे --- ‘‘

डेव्हिड त्याच्याभोवतालचे कॅरोलीनचे कृश हात बाजूला करत होता. “मला जाऊ दे, कॅरोलीन. मी तुला सांगतो. काहीतरी भयंकर झाले आहे. तू मला --- “

जेसिका त्यांच्या जवळून आणि नंतर मेरीच्या खोलीत गेली.

ती कठोर स्वरात बोलली, *“ही मेरी आहे. तिच्यावर कोणी गोळी झाडली?”*

सुसानला कॅरोलीनचे हुंदके देणारे श्वास व डेव्हिडचे खांदे तिच्या खांद्यांवर दाबणे पुसटसे ऐकू येत होते. कसेतरी ते सर्वजण उघड्या दाराशी जमा झाले व तिथे गर्दी करून उभे राहिले.

ती मेरी होती. थोड्या वेळापूर्वी सुसानने तिला ज्या खुर्चीत बसलेले पाहिले होते, त्याच खुर्चीत ती बसलेली होती. पण तिचे डोके पुढे लटकत होते. तिचे सबंध शरीर कुरूपपणे काळ्या रेशमी चुण्यांमध्ये वेडेवाकडे पसरले होते.

त्या खोलीत शिरणारी जेसिका पहिली होती. मग डेव्हिड. मग आजारल्यासारखे व धक्का बसल्यासारखे वाटणारी सुसान होती. दारात फक्त तिच्या कृश हातांनी जिन्याचा आधार घेतलेली कॅरोलीन राहिली होती. तिचा चेहरा पांढरा फटक व ओठ निळे पडले होते.

जेसिका म्हणाली, “तिला सरळ हृदयात गोळी लागली आहे.” मग तिने डेव्हिडकडे पाहिले.

“डेव्हिड, कॅरोलीनने तिला गोळी मारली का?”

तो ओरडला, “कॅरोलीनने मेरीला मारले? असे का विचारते आहेस?

कॅरोलीन कुणाला मारू शकत नाही!”

जेसिका बोलली, “मग तिला कुणी मारले? तुला कळते आहे की नाही, ती मेली आहे?”

तिची गडद नजर खोल गेली आणि दुःखी व कठोर आवाजात तिने विचारले, “डेव्हिड, तू तिला मारलेस का?”

डेव्हिड ओरडला, “नाही. नाही.”

“जेसिका म्हणाली, “ती मेली आहे.”

सुसान ठाम आवाजात बोलली, “तुम्ही डॉक्टरला का बोलावत नाही?”

जेसिकाचे रेशमी वस्त्र सळसळले. तिने वळून सुसानकडे थंड नजरेने पाहिले. “डॉक्टरला बोलावण्याची गरज नाही. ती नक्कीच मेली आहे.”

सुसान नरमाईने बोलली, “मग पोलीस तरी नक्कीच. कारण तिचा खून झाला आहे.”

जेसिका ताठ्याने बोलली, “माझ्या स्वतःच्या बहिणीवर व भाच्यावर मी पोलीस घालू? हे बघण्यासाठी पोलिसांना बोलवायचे? कधीच नाही.”

सुसान मऊपणे म्हणाली, “मी बोलावते.” आणि मृत व्यक्तीजवळ त्याना सोडून, ती गेली.

शांत जिन्याकडे जातांना, तिचे गुडघे थरथरू लागले.

म्हणजे घर हे होण्यासाठी थांबले होते. खून! आणि म्हणून कॅरोलीन घाबरलेली होती.

म्हणजे तिला काय माहिती होते?”

मेरीला ज्या पिस्तुलाने मारले गेले, ते कुठे आहे? तसे काही खोलीत दिसत नव्हते.

हवा गरम होती --- घर प्रकर्षाने शांत होते --- आणि ती, सुसान डरे फोन शोधत होती. एक क्रमांक फिरवत होती --- एकंदरीत, चांगल्याच शहाणपणे बोलत होती आणि जेव्हा तिला जिम बायरन फोनवर भेटला, तेव्हाही सर्व वेळ तिची सहज अशी प्रतिक्रिया होती.

ती म्हणाली, “मी इकडे आहे. वरेज घरी. मेरीचा खून झाला आहे.”

जिम बोलला, “अरे देवा!” आणि फोन ठेवला.

घर इतके गरम होते. सुसान अशक्तपणे खालील पायरीवर बसली आणि जिन्याच्या खांबाला धरले. तिला आजारी असल्यासारखे वाटत होते. जर ती खरेच गुप्तहेर असती, तर ती सरळ वरती गेली असती आणि तेथील सगळ्या गोंधळलेल्या व घाबरलेल्याना हटवून, त्याना तिथे काही बदल करायला संधी दिली नसती. पण ती काही गुप्तहेर नव्हती व होण्याची तिची इच्छाही नव्हती. तिला आता काय हवे होते, तर तिथून काढता पाय घेणे. जिन्याखाली काही सावली हलली. सुसानने तिचे हात घशाशी नेले व ती किंचाळली. छोटे माकड गोलगोल उड्या मारत बाहेर आले व काळजीने डोकावू लागले. मग खिडकीचा पडदा पकडून काळजी न करता, जड लाकडी दांड्यावर बसले.

सुसानचा कोट व टोपी वरच्या मजल्यावर होते. त्यशिवाय ती धुक्यात व थंडीत बाहेर जाऊ शकत नव्हती. ते आणेपर्यंत, तिने दम धरला असता.

डेव्हिड जिना उतरत होता. तो ठाम आवाजात बोलला, “ती म्हणते आहे, की पोलिसांना बोलावणे उचित ठरेल. मी त्यांना बोलावले आहे.”

त्याने तिच्याकडे पाहिले आणि अचानक तिच्याशेजारी पायरीवर बसला.

तो साधेपणे बोलला, “हे काय होऊन बसले! मला खून होईल, असे वाटले नव्हते.” तो कुठेच बघत नव्हता. त्याच्या तरुण चेहऱ्यावरील, भीती तिला सहन होईना. समजत असल्याची इच्छा धरून, ती म्हणाली, ‘मला समजते आहे.”

तो म्हणाला, “मला नाही. अगदी अलीकडेपर्यंत. ओहो, मला माहिती आहे, मी लहान मुलगा असल्यापासून, मला माहिती असावेच लागले -- “

सुसान म्हणाली, “काय माहिती असावेच लागले?” तो परत लाजला.

“हे सांगणे पशुतुल्य होईल. तुला माहिती आहे, मी एकुलता एक मुलगा होतो. मी असे माहिती होऊन वाढलो, की मला कोणी आवडते माणूस नव्हते. जर आम्ही अजून भावंडे असतो तर, किंवा मावशांनी लग्न करून, त्याना मुले झाली असती तर --- पण मला समजत नाही, कसे काय एवढे रक्तरंजित --- तुला कळते आहे ना?” त्याच्या घशात शब्द अडकले. तो खोकला व परत चालू केले, “त्याना किती बळकटपणे वाटते --- “

“कोणाला?”

“कोणाला म्हणजे? अर्थात जेसिकामावशीला, मेरी मावशीला आणि कॅरोलीनमावशीला.”

सुसान कोरडेपणे बोलली, “खूप मावशा, त्या कशाबद्दल एवढ्या आक्रमकपणे बोलत होत्या?”

“घराबद्दल व एकमेकींबद्दल आणि --- इतर कशाबद्दलदेखील. ओहो, मला नेहमी माहिती होते. पण सगळे छुपे होते. वरवर सगळे ठीक दिसत होते.”

सुसान धुक्याला हाताने स्पर्श करून चाचपडू लागली. तो म्हणाला, की पृष्ठभाग ठीक होता. पण धुके आजारल्यासारखे पसरून, तिला त्याखाली कुरूप विवरांचा आभास होत होता.

सुसानने विचारले, “कॅरोलीन का घाबरत होती?”

तिच्याकडे निरखून बघत, तो म्हणाला, “कॅरोलीन? घाबरत होती?”

त्याचे निळे डोळे काळजीने व उत्तेजनेमुळे प्रकाशमान झाले होते.

तो म्हणाला, “इकडे बघ. जर तुला असे वाटत असेल, की कॅरोलीनने मेरीला मारले, तर ते तसे नाही. म्हण --- जे --- म --- ला म्हणायचे आहे, कॅरोलीन माशीला देखील मारू शकत नाही. तिला ते शक्य नाही. तिचे कधीच तेवढे धाडस होणार नाही. म्हणजे --- आणि तिने मेरीला कुठल्याच बाबतीत विरोध केला नसता.”

“तुला माहिती नाही, की मेरी --- कशी आहे.”

“वरील हॉलमध्ये नक्की कायकाय झाले?

“म्हणजे जेव्हा गोळी मारली गेली, तेव्हा?”

“हो.”

“का, मी --- मी तर खोलीत होतो --- नाही, अगदी तसेच नाही. मी दरवाज्याजवळ होतो आणि मी आवाज ऐकला.

सुसान धुक्याला हाताने स्पर्श करून चाचपडू लागली. तो म्हणाला,

“हे विचित्र आहे, पण माझा विश्वास आहे --- मला माहिती आहे, की तो पिस्तुलाचा आवाज होता. त्याची जणू काही मी अपेक्षा करत होतो --- “

त्याने स्वतःला तपासले. "पण मी अपेक्षा करत नव्हतो --- मी -- " तो थांबला. निराश होऊन, त्याने हाताच्या मुठी करून खिशात टाकल्या. अचानक स्वतःला ठामपणे सावरले. "पण याची खरेच अपेक्षा केली नव्हती, "समजले का?"

"मला वाटते, जेव्हा तू आवाज ऐकलास, तेव्हा तू वळलास आणि पाहिलेस."

"हो. हो. मला असे वाटते. तसेही कॅरोलीन हॉलमध्ये होती. मला वाटते, ती किंचाळत होती. आम्ही दोघे धावत होतो. मला माहिती नाही का, पण मी मेरीचा विचार केला. कॅरोलीनने मला घट्ट धरले. तिला मी मेरीच्या खोलीत जायला नको होते. ती खूप घाबरली होती. आणि मग मला वाटते, तू आणि जेसिका तिथे होतात, नाही का?"

"हो. आणि हॉलमध्ये कुणीच नव्हते? मेरीच्या खोलीतून कुणी आले नाही."

त्याचा चेहरा गोंधळलेला होता. फार गोंधळलेला होता.

"कुणीही नाही."

"फक्त --- कॅरोलीन?"

"पण मी तुला सांगितले, की ती कॅरोलीन असू शकत नव्हती."

दाराची घंटी वाजू लागली --- किंचाळल्यासारखा आणि सावल्यांमध्ये व घराच्या जाड आवरणावर काही खुपसल्यासारखा कठोर आवाज आला.

जोराने श्वास रोधत, सुसानला वाटले, ‘हे पोलीस असणार. तिच्या शेजारील मुलगा एकदम ताठ झाला व उघड्या असणाऱ्या दाराकडे निरखून बघू लागला. त्यांच्या मागे गालीचा घातलेल्या जिन्यावर काही सळसळले. जेसिका कडकपणे बोलली, “हे पोलीस आहेत. त्यांना आत येऊ दे.”

सुसानला वाटले नव्हते, की ते एवढेजण येतील किंवा ते एवढे काही करतील. किंवा चौकशी एवढी लांबेल. त्यांचे फोटो घेणे, बोटांचे ठसे घेणे, भरभर, कुशलतेने चाललेले तपासकाम, बघून तिला फार नवल वाटले. तिला थोडा धक्का बसला व खून झाल्यामुळे, त्यांनी साक्षी पुराव्यापासून नेमके कायकाय केले, हे स्वतःच्या डोळयांनी बघून, ती आश्चर्यचकित झाली.

तरी तिची स्वतःची लेफ्टनंट मोहर्व याने घेतलेली मुलाखत तितकी अवघड नव्हती. तो झटपट बोलणारा, तरुण दयाळू होता आणि तिथे ती का होती याचे स्पष्टीकरण देण्यासाठी जिम बायरन होता. पोलीस तिथे यायच्या वेळेस तिथे आलेल्या जिम बायरनचे तिला आभार मानावेसे वाटले.

तो म्हणाला होता, “तुला जे जे माहिती आहे, ते सगळे सांग.”

“पण मला काहीच माहिती नाही.”

लेफ्टनंट मोहर्वने कसे का होईना, पण सुसानला या सगळ्या प्रकरणाच्या मध्यभागी आणले.

पण ते नंतर झाले --- खूपच नंतर. अथक चौकशीनंतर, असीम संशोधनानंतर, असीम वेळा परत तेच तेच करून व असीम सभा घेऊन.

मृत माणसांची चित्रे असलेल्या व ते सर्व वरेज पोलिसांना निरखून बघत असलेल्या अंधाऱ्या जेवायच्या खोलीत खूप वेळ थांबून, सुसानवर व साक्ष

देणाऱ्या नोकरांवर नजर ठेऊन, ते झाले. जिमने तिला लगेच कळवले होते व पूर्णपणे स्थिरस्थावर केले होते.

दुपारी एक वाजता जिम पुन्हा तिच्याकडे आला. तो बोलला, "असे बघ, तू भुतासारखी दिसते आहेस. तू काही खाल्लेस का?"

सुसान म्हणाली, "नाही."

पुढच्याच क्षणी ती स्वयंपाकघरात होती व जिमने बर्फाच्या पेटीतून आणलेले कोरडे पदार्थ खात होती.

ती म्हणाली, "तू सगळ्या गोष्टींकडे जातीने लक्ष देतोस. मला वाटले वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना इथे प्रवेश नसेल."

"ओहो, पोलीस चालतात. ते जबानी देण्यासाठी, ते आपल्या सर्वांना नीट वागवतात, हे तुला माहिती आहे. अजून केक? आणि विसरू नकोस, मी पण या केसमध्ये आहे. कॅरोलीन कशाला घाबरत होती, ते तुला सापडले, की नाही?"

"नाही. मला तिच्याशी बोलायची संधी मिळाली नाही." तो आनंद न दाखवणारे हसू हसला.

"तू मला हे विचारतो आहेस. त्यांनी मुख्यतः तीन गोष्टी सांगितल्या. नोकर निर्दोष आहेत. घरात जेसिका, डेव्हिड व कॅरोलीनशिवाय कोणी नव्हते." थोडी शहारून सुसान बोलली,

"आणि मेरी?

जिमने शांतपणे कबूल केले, "आणि तू. तिसरे म्हणजे, त्यांना पिस्तुल मिळाले नाही. जेसिका आणि तू एकमेकींना पुरावा ठरलात. मग डेव्हिड आणि

कॅरोलीन राहिले. ठीक आहे त्यांच्यापैकी कुणी हे केले? आणि का?"

ती म्हणाली, "मला माहिती नाही, पण जिम, मी घाबरले आहे."

"*घाबरलीस*? पोलीस घरात असतांना? का?"

सुसान म्हणाली, "माहिती नाही का. मी काही स्पष्ट करू शकत नाही. एक प्रकारचा धोका. घरात कुठेतरी --- कसला तरी --- धोका आहे. तो समुद्राच्या ताऱ्यासारखा आहे. फक्त समुद्राचा तारा मेला आहे आणि हा जिवंत आहे. भयंकर रीत्या जिवंत आहे."

सुसानला माहिती होते, की ती तर्काधिष्टीत बोलत नाही आहे आणि जिम तिच्याकडे काळजीने बघतो आहे. अचानक तिच्यामागील अर्धवट उघडे दार उघडले व पोलीस काही बोलण्यापूर्वी, तिच्या घशात आवंढा आला व हृदय धडधडू लागले. तो म्हणाला, "लेफ्टनंटने तुम्हाला दोघांना बोलावले आहे."

जसे ते हॉलमधून पार झाले, तसा घड्याळात एक टोला पडला. तो खूप वेळ वाजत राहिला. मग ती त्या रुंद दारातून आत गेल्याला व जेसिकाला भेटल्याला आठ तास आणि जास्त झाले.

आता सगळीकडचे दिवे लागले होते. आणि तिथे पोलीस होते. जुन्या पद्धतीची हॉल आणि ड्रॉइंगरूम यांच्यामधील सरकणारी दारे बंद होती. ती बंद होतांना मोठा आवाज येत असे. एक पोलीस "तिथे" असे म्हणाला व त्यापैकी एक दार उघडले. वरील झुंबर विचित्र व भीतीदायक पद्धतीने चमकले.

खिडक्यांवरील फिकट तपकिरी मखमली पडद्यांवर रेषा दिसत होत्या. आणि शेकोटीवरील आरशात, नागमोडी रेषा दिसत होत्या. जुन्या टर्किश रगावर विरलेल्या जागा दिसत होत्या. जेसिकाच्या चेहऱ्यावरील प्रत्येक करडी सावली

अंधारी होती आणि कॅरोलीनचे तोंड व झपाटलेले डोळे खूप स्पष्ट दिसत होते. डेव्हिडच्या गालांवर चकचकीत शेंदरी डाग होते. लेफ्टनंट मोहर्व यांचे तरुण व ताजेतवाने दिसणे संपले होते. तो दमलेला व करड्या चाळीशीचा दिसत होता. साध्या कपड्यातील गुप्तहेर मागे ढकलल्या जाणाऱ्या घसरड्या खुर्चीत पाठ टेकून बसला होता. त्यांच्यामागे दार परत लागले. जेसिका त्यांच्याकडे वळून बघत होती, तरी अजून कोणी बोलत नव्हते. सुसानला वेगळे असे काही वाटले, की त्या घरातील प्रत्येकजण बदलला आहे. तरीही जेसिका खरे तर बदलली नव्हती. तिची व सुसानची नजरानजर झाली. सुसानचे डोळे तसेच थंड व लांबून दिलेल्या आज्ञेसारखे होते. मग वेगळे काय होते?

कॅरोलीन व सुसान यांचे डोळे एका बारीक, वाकलेल्या व करूण रीत्या खुर्चीत पोक आल्यासारखे बसलेल्या आकृतीकडे वळले. तिच्या छान केसांच्या लहान बटा तिच्या चेहऱ्याभोवती पसरल्या होत्या व तोंड जरासे थरथरत होते का, अर्थात हा काही बदल नव्हता. तर सुसान व कॅरोलीन दोघीनाही कशाने तरी ताण आला होता. त्या दोघी जास्त ठळकपणे उठून दिसत होत्या. त्यांच्या सावल्या जाड व त्याच्या रेषा जास्त काळ्या झाल्या होत्या.

लेफ्टनंट मोहर्व कॅरोलीनकडे वळला. “मिस कॅरोलीन, तुम्ही म्हणत होतात, ती तरुण स्त्री ही का?”

कॅरोलीनचे डोळे जेसिकाला टाळून, सुसानकडे भिरभिरले आणि पुन्हा भारावून, लेफ्टनंट मोहर्वकडे वळले. “हो. हो.”

डेव्हिड खिडकीपासून चालत येऊन, कॅरोलीनसमोर उभा राहिला. “कॅरोलीनमावशी, इकडे बघ. तुझ्या हे लक्षात आले आहे का, की तू जे मिस

डरेला सांगशील, ते ती पोलिसांना सांगणार ना? ते सर्व तेच असेल --- हे तुला माहिती आहे, नाही का?"

"हो, बरोबर , डेव्हिड. तेच तर" --- लेफ्टनंट मोहर्व --- म्हणाला.

लेफ्टनंट मोहर्वने अचानक व थोड्या अस्वस्थतेने घसा साफ केला.

"तिला ते समजते आहे, वरे. मला कळत नाही, तिने मला सांगितले का नाही. पण तिने नाही सांगितले. ती म्हणाली, की ती मिस डरेशी बोलेल."

जेसिका बोलली, "कॅरोलीन मूर्ख आहे." ती कडकपणे कॅरोलीनकडे बघण्यासाठी वळली. पण कॅरोलीनने तिची नजर टाळली. जेसिका म्हणाली, "तुला कळेल, की कॅरोलीनकडे सांगण्यासारखे काहीच नव्हते."

कॅरोलीनचे डोळे रागाने जमिनीकडे, पडद्यांकडे, डेव्हिडकडे वळले. आणि तिचे दोन्ही हात तिच्या थरथरणाऱ्या तोंडाकडे गेले.

ती म्हणाली, "मी सुसानशी बोलेन."

जेसिका म्हणाली, "कॅरोलीन, तू अविचारीपणे वागत आहेस. अनेक दिवस तुझे हे चालू आहे."

"तू हिला --- सुसान डरेला घरी आणलेस. तू तिच्याबद्दल मला खोटे सांगितलेस --- तू म्हणालीस, की ती तुझ्या शाळेतील मैत्रिणीची मुलगी आहे. मला माहिती पाहिजे होते, की तुला इतकी जवळची मैत्रिण नाहीच आहे!" तिने सुसानकडे व नंतर कॅरोलीनकडे रागाने पाहिले. आता तू पोलिसांना सांगितलेस, की तू घाबरली होतीस आणि तू एका परक्या माणसाला फोन केलास. "

कॅरोलीन म्हणाली, "जिम बायरन याचे व माझे वडील --- "

जेसिका कठोरपणे बोलली, “त्याचे एवढे काही नाही. माझ्या मध्येमध्ये बोलू नकोस. आणि मग ही तरुण स्त्री आपल्या घरी आली. का? कॅरोलीन, याचे उत्तर दे.”

“मी --- घाबरले --- होते.”

“कशाला?”

कॅरोलीन उभी राहून भावनातिरेकाने हात हलवत म्हणाली, “मी --- मी --- मी सांगते. मी मिस डरेला सांगते. तिला काय करायचे, ते माहिती आहे.”

लेफ्टनंट मोहर्व शांतपणे बोलला, “अशी परिस्थिती आहे. मिस कॅरोलीनने कबूल केले आहे, की तिला काहीतरी वाईट होण्याची व तुम्ही इथे का येणार, याची चाहूल लागली होती. तिने हे सुद्धा सांगितले आहे, की घरात भांडणे होण्याची काही तातडीची छळीक समस्या होती. तुम्हाला दिसते आहे, की ती अतिशय दमली आहे --- कदाचित थोडी उदासही आहे. ती म्हणते आहे, की ती सांगायला तयार आहे, पण तिला सुसानला काय ते सांगायचे आहे.” तो दमून हसला. “काही झाले तरी, तुमचा यात मोठा सहभाग असणार आहे, पण तुम्ही ती सांगेल ते ऐकून घ्यायला तयार आहात का? ते अर्थात काही अचानक सुचलेले असेल.” त्याने कॅरोलीनकडे मित्रत्वाने व दयाळूपणे पाहीले. “पण आम्ही तिची चेष्टा करू. तिला समजेल --- “

कॅरोलीन काही निर्णय घेत म्हणाली, “मला समजले. पण मला सुसान डरेशिवाय इथे कोणी नको आहे.”

जेसिका बोलली, “कॅरोलीनने काय थेर चालवले आहेत! मला ऐकण्याचा हक्क आहे व डेव्हिडलाही.”

कॅरोलीनचे डोळे जेसिकाला टाळत, इकडे तिकडे फिरत, खरे तर जेसिकाच्या नजरेला भिडले आणि ताणाला विरोध करण्यात ती लगेच यशस्वी झाली नाही.

ती आज्ञाधारकपणे बोलली, “हो, जेसिका.”

ठीक तर मग. आम्ही बाहेर जात आहोत, मिस कॅरोलीन. तुम्हाला जे सांगायचे आहे, ते तुम्ही सांगू शकता. लक्षात ठेवा, आम्ही इथे फक्त तुम्हाला मदत करण्यासाठीच आहोत.” लेफ्टनंट मोहर्व सरकत्या दाराशी थांबला. सुसानने त्याला व जिम बायरनला एकमेकांना नजरेने काही खूण करतांना पाहिले. तिने जिम बायरनचा हात खिशाकडे गेलेला पाहिला व त्याने लेफ्टनंटला बघून, मान हलवल्याचे ही पाहीले. जिमने विचारले, ”मिस जेसिका, मी जर खोलीत पण मला काही ऐकू येणार नाही अशा ठिकाणी राहिलो, तर तुम्हाला चालेल का?”

जेसिका कशीबशी तयार होत म्हणाली, “नाही.”

लेफ्टनंट मोहर्व जिमला म्हणाला, “आम्ही थोडेसेच बाहेर असू.” तो पुढे बोलला, “तुम्ही कुठल्याही प्रकारचा त्रास सहन करायला तयार आहात.”

जिमने तिच्याकडे व नंतर लेफ्टनंटकडे पाहीले, तेव्हा तिला त्याच्या डोळ्यात जे दिसले, त्याचा अर्थ व त्याचे खिशात हात घालणे तिला लगेच समजले. त्याच्याकडे खिशात पिस्तुल होते आणि लेफ्टनंट संरक्षणाची हमी देत होता. पण म्हणजे ते तिला वरेज बरोबर एकटे सोडणार होते. त्यातला एक खुनी असणाऱ्या तीन लोकांबरोबर एकटे रहायचे! पण ती पूर्णपणे एकटी नव्हती. लांबच्या कोपऱ्यात, जिम बायरन होता. त्याची नजर वरेंवर होती. तो दक्ष होता आणि त्याचे हसू काही लागते नसल्यासारखे होते.

जेसिका म्हणाली, “कॅरोलीन, आता तुझे चालू दे. आम्हाला तुझी मूल्यवान गोष्ट ऐकू दे.”

कॅरोलीनने सुसानकडे बघत, पण तिच्या नजरेपासून दिशा बदलत, सुरवात केली, “हे घरासंबंधी आहे. पोलिसांनी हे माझ्यातून ओढून काढले --- “

जेसिका जोरात हसली आणि अडथळा आणला.

“म्हणजे हा तुझा महत्वाचा पुरावा आहे, हे मी कमी मूर्खपणाने सांगू शकेन. हे साधे असे आहे, की आपल्याकडे हे घर विकत घेण्यासाठी पुरेसे पैसे आहेत. आपल्या चौघांच्या ताब्यात हे घर आहे. सगळ्यांना यात सारखाच रस आहे. त्यामुळे आपल्यासाठी हे गरजेचे आहे, की आपण हे घर विकण्यापूर्वी किंवा नाहीसे करण्यापूर्वी, आपापसात मतैक्य करायला पाहिजे. हे एवढेच आहे. कॅरोलीन व डेव्हिड यांना हे विकायचे असले, तरी मला काही पर्वा नाही.

कॅरोलीन ओरडली, ”पण मेरीला ते विकायचे नाही आणि आपणा सर्वांपेक्षा मेरी जास्त वजन असलेली आहे.”

सुसान मऊपणे म्हणाली, “तू घाबरत का होतीस?” तिथे एकदोन क्षण शांतता पसरली.

मग फार वाईट रीत्या, कॅरोलीन तिच्या खुर्चीत कोसळली. तिने हात तिच्या तोंडावर ठेवले होते व ती कण्हत होती. पण जेसिका बोलायला तयार होती.

“तिला घाबरायचे काही कारण नाही. ती फक्त नाराज झाली आहे --- फार नाराज. कॅरोलीन, मला माहिती आहे, तुझ्या मूर्ख हातात पैसा पडला की त्यातील प्रत्येक सेंटचे तू काय करणार आहेस. पण मी त्याबद्दल काही करणार नाही आहे.”

जेसिकाला टाळायचे सर्व प्रयत्न कॅरोलीनने थांबवले. ती घाबरलेल्या, धापा टाकणाऱ्या पक्ष्यासारखे तिच्याकडे निरखून बघत बसली.

श्वास रोधून, बारीक, उच्च रवात ती म्हणाली, "तुला --- माहिती आहे"

"अर्थात, मला माहिती आहे. कॅरोलीन, तुझ्याकडे आतबाहेर असे काही नसते. मला माहिती आहे, की तू तुझा वारसा जुगारात उडवणार. किंवा निदान --- तू ज्याला स्पर्श करू शकशील, ते --- "

डेव्हिड ओरडला, "जुगारात! म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?"

जेसिका कठोरपणे म्हणाली, "शेअर्स. विशिष्ट गुंतवणूक. त्याचे तिला वेड आहे. कॅरोलीन नेहमीच हे कबूल करेल. कॅरोलीन, त्यामुळे तुझ्याकडे काहीही पैसा उरलेला नाही. म्हणूनच तू घर विकण्यासाठी, एवढी उत्सुक झाली होतीस का? पण तू ते अगदी काठावरच्या किमतीला विकण्याइतकी मूर्ख नव्हतीस."

कॅरोलीनचे थरथरणारे ओठ जे बोलू शकत नव्हते, ते तिचे दुःखी हात कबूल करत होते.

अचानक डेव्हिड तिच्या शेजारी त्याचा हात तिच्या अशक्त खांद्यावर ठेऊन उभा राहिला.

"कॅरीमावशी, काही काळजी करू नकोस. सर्व काही ठीक होईल. तुझी स्वतःची काळजी घ्यायला, तुझा तुझ्यावर पुरेसा विश्वास आहे."

कॅरोलीनच्या डोक्यावरून तो जेसिकाकडे बघत होता. कॅरोलीनशी बोलतानाची त्याची नजर किंवा आवाजातील मृदुता, जेसिकाला भडकवत होती.

तिच्या रेशमी वस्त्रांची सळसळ करत, उंच आणि ठाम अशी ती तिथे

त्याच्यासमोर उभी होती.

ती चिडचिड्या आवाजात म्हणाली, “तू स्वतः तिची काळजी का घेत नाहीस?”

डेव्हिड पांढरा पडला. त्याचे हुशार डोळे दुःखी झाले, पण तो स्वतःला सावरून बोलला, “जेसिकामावशी, तुला माहिती आहे. तुला माहिती आहे, की ती शेअर्समध्ये पैसे का गुंतवते. आम्ही दोघेही पुरेसे पैसे साठवून, येथून निघून जायचा विचार करत होतो. या घरापासून दूर! --- घरापासून दूर --- “ तो थांबला.

जेसिका म्हणाली, “डेव्हिड, कशापासून दूर?”

डेव्हिड हतबल होऊन बोलला, “मेरीपासून व तुझ्यापासून.”

जेसिका हलली नाही. तिचा चेहरा बदलला नाही. फक्त तिच्या डोळ्यात एक विचित्र चकाकी तरळली. एका भयंकर विश्रांतीनंतर, ती बोलली, “मेरीपेक्षा जास्त प्रेम, मी तुझ्यावर केले. डेव्हिड, तुला तिची भीती वाटायची. तू माझ्याकडे आलास, तेव्हा मी तुला पैसे देणार होते. तुला माझ्याकडे यावेच लागले असते. तुला मदतीसाठी माझी --- या जेसिकाची --- विनवणी करायला लागली असती. तू किंवा कॅरोलीनने मेरीला ठार का केले? कारण तिने घर विकायला नकार दिला, म्हणून? तिने तसे का केले, मला माहिती आहे. तिने असे ढोंग केले, की घरात तिच्या भावना गुंतलेल्या आहेत. ती --- दत्तक मुलगी --- ही आपल्यापेक्षा जास्त वरे कुटुंबातील शोभत होती. पण ते खरे नव्हते. ती आपला द्वेष करत असे. आपल्याला घर विकायचे होते. म्हणजे तुला आणि कॅरोलीनला स्वतःच्या मतलबाचा स्वार्थी वाटा विकायचा होता. मला --- मला त्याने काही फरक पडला नसता.”

कॅरोलीन हुंदके देत, गदगदून रडली.

तिच्या विचित्रपणे अविश्वसनीय रडक्या आवाजात, ती म्हणाली, “जेसिका पण तू काळजी घेतली होतीस. तुला पैसा हवा होता. तू --- पैशांवर प्रेम करतेस. पैसा. पैसा! पण काही गोष्टी पैशाने विकत घेता येणार नाहीत, जसे की स्वातंत्र्य! जेसिका, पैसा, रोखे, गहाण वस्तू, सोने, या सर्वांवर तुझे पहिले प्रेम आहे आणि नंतर स्वतःवर.”

जेसिका भयंकर आवाजात बोलली, “कॅरोलीन”

कॅरोलीन शांतपणे मुसमुसत मूर्खासारखे बोलत राहिली.

“कॅरोलीन, तू जबाबदारीने बोलणारी स्त्री नाही आहेस. तू विसरते आहेस, की इथे परके लोक आहेत. मेरीचा खून झाला आहे. स्वतःला सावर. त्वरा कर. तू नकोसे प्रदर्शन करते आहेस.”

ते तिघे सुसानकडे पाहू लागले.

ते जितके एकमेकांपासून दूर होते, तितकेच एकत्र येऊन सुसानविरुद्ध उभे ठाकले. ती परकी होती. पोलिसांच्या बाजूची होती. इथे ती कायद्याप्रमाणे, पुरावा शोधायला आलेली होती.

त्यांचे डोळे आनंदी नव्हते.

सुसानने तिचे केस मागे केले व तिच्या नसांमधून जोराने वाहणाऱ्या तंबी देणाऱ्या संदेशाबद्दल ती जागरूक होती. त्यांच्यापैकी एकीचा खून झाला होता. ती कॅरोलीनकडे वळली.

तिने सभ्यपणे विचारले, “म्हणजे तू तुझ्या पैशांचे काय करत आहेस, हे

मेरीला समजेल, म्हणून तू घाबरत होतीस?”

कॅरोलीनने डोळे मिचकावले व ती लगेच उत्तर द्यायला तयार झाली. तिचे सुसानविरुद्धचे क्षणिक वाटणे सुसानच्या लहानशा दयाळू स्पर्शाने नाहीसे झाले.

ती ठामपणे म्हणाली, “नाही, मला त्याची भीती वाटत नव्हती.”

“मग घरात वेगळे, तुला त्रासदायक असे काही झाले होते का?”

कॅरोलीन म्हणाली, “ओहो, हो, हो.”

श्वास अडकला जाऊन, सुसान म्हणाली, “ते काय होते? फक्त जेसिकाने क्षणभर गप्प बसायला हवे होते.

पण कॅरोलीन परत अडखळत होती. “मला माहिती नाही. मला माहिती नाही. असे बघ, तर सगळे इतके विचित्र होते. आमच्या सगळयांच्या विरुद्ध असलेली मेरी. आणि आम्ही सगळे --- फक्त जेसिका कधीकधी मेरीचे ऐके. आम्ही नेहमीच मेरीचे ऐकत असू. घरातील प्रत्येकजण तेच करत असे. कोळी --- माकड, तुला माहिती आहे.”

सुसानने जेसिकाकडे बघून, डोळ्यांची फडफड केली. ती न हलता, डेव्हिडकडे बघत राहीली.

सुसानला त्या काळया नजरेचा अर्थ समजेना व तिने प्रयत्नही केला नाही. त्याऐवजी ती कॅरोलीनकडे झुकली. तिचे अस्थिर, परिणाम न करणारे हात हातात घेऊन हळूवारपणे म्हणाली, “तू जिम बायरनला फोन नक्की का केलास, ते

सांग. त्या सकाळी, किंवा आदल्या रात्री तुला भीती वाटण्यासारखे, काय झाले होते?"

कॅरोलीनने विचारले, "तुला हे कसे कळले? ते त्या रात्री झाले."

सुसान कुजबुजत्या स्वरात म्हणाली, "ते काय होते?

पण कॅरोलीनने अचानक पलटी मारली. ती म्हणाली, "मी मेरीला घाबरत नव्हते. पण प्रत्येकजण मेरीचे ऐके. घरही जास्त करून तिचेच वाटे. जेसिकापेक्षा. पण मी मेरीला मारले नाही."

सुसान परत बोलली, "काल रात्री विचित्र असे काय झाले?"

जेसिका जणू तंद्रीतून जागी झाल्यासारखी, पण कडकपणे म्हणाली, "कॅरोलीन, तू पुरेसे सांगितलेस."

सुसानने तिच्याकडे दुर्लक्ष करत कॅरोलीनच्या गरम, तेजस्वी डोळ्यांकडे नजर भिडवत म्हटले, "*मला सांग* --- "

खोल श्वास घेत कॅरोलीन म्हणाली, "*ती --- मेरी --- होती.*"

सुसान म्हणाली, "मेरी? तिने काय केले?"

कॅरोलीन बोलली, "तिने काही केले नाही. ती जे म्हणाली, ते --- नाही, खरे तर नेमके तसेही नाही. ते असे होते --- "

जेसिका थंडपणे म्हणाली, "कॅरोलीन, तू बोलणार असशील, तर निदान शहाणपणे बोलायचा प्रयत्न कर."

सुसानने विचार केला, 'तिला जेसिकाला खोलीबाहेर काढणे शक्य होते का? बहुधा नाही. आणि हे अगदी नक्की होते, की ती तिथेच उभी होती आणि ती

कॅरोलीनला तेवढाच वेळ बोलू देणार होती, जेवढा वेळ ती सांगेल.

सुसान शांतपणे म्हणाली, “तू मेरीला बोलतांना ऐकलेस?”

कॅरोलीन उत्सुकतेने म्हणाली, हो, ते असे होते आणि खूप विचित्र होते. म्हणजे अर्थात आम्ही --- म्हणजे मी --- नेहमी असा विचार करत असे, की मेरी सोंग करते, त्यापेक्षा घरासाठी तिला माहिती असलेल्या सर्व गोष्टी माहिती करून घेण्यासाठी, ती नक्कीच काही जास्त होती. म्हणजे तिला नेहमी घरात घडणारे सगळे माहिती असे. हे कधीकधी विचित्र वाटे. कारण ते जादूसारखे किंवा काही शांत असे भासे.” कॅरोलीन तिचे शब्दात भरभरून वर्णन करत बोलली, जसे काही तिला तारे व शरीर यांचा संबंध समजला होता. तिच्या खोलीत मेरी बसलेली असतांना तिच्या डोक्यातील ज्योतिषशास्त्र घराभोवती फिरत असे.”

जेसिका मुद्दाम म्हणाली, “ज्योतिषशास्त्र! कॅरोलीन लाजली आणि जेसिका हात हवेत उडवत, बोलू लागली, “ती कुठल्या अवस्थेत आहे, हे तुझे तूच बघ.”

ती जुनी खोली परत शांत झाली. सुसानचे हृदय धकधक करत होते. तिच्या नेणीवेत लहानशी तंबी मिळाल्याचा सूर उमटला. त्या सर्व शक्ती शांतपणे अदृष्यपणे, वाईट परिणाम कमी करायचा प्रयत्न करण्यासाठी आपापसात लढत होत्या. कुठेतरी मध्येच ते खऱ्याला स्पर्शून जात होते.

कॅरोलीन अचानक शांतपणे बोलली, “पण तारे बोलू शकले नसणार.”

आणि मी मेरीला बोलतांना ऐकले. ती जेसिकाच्या खोलीत होती आणि दार बंद होते. मी तिचे जेसिकाशी चाललेले बोलणे ऐकले. आणि मग --- ते

विचित्र होते. मी सरळ दार उघडून, मेरीच्या खोलीत गेले. तिथे मेरी बसली होती. हे विचित्र नव्हते का?"

"तू का घाबरलीस?"

"कारण --- कारण --- कॅरोलीनचे हात एकमेकात गुंफले गेले. मला माहिती नाही का, पण मला काही विचित्र भावना झाली, एवढेच."

जेसिका हसून बोलली, "मूर्ख!" परत तिच्या सावलीतील डोळ्यांवर प्रकाश तरळला. ती नेहमीपेक्षा भरभर बोलली, "सुसान डरे, हे बघ. हे सगळे किती वेड्यासारखे चालले आहे! किती उत्तम चालले आहे!"

कॅरोलीन बोलली, "तिथे मेरी होती. ती तुझ्याशी बोलत होती."

जेसिकाचे रेशमी कपडे सळसळले. ती कडकपणे व झटपट कॅरोलीनकडे गेली आणि वाकून, तिने कॅरोलीनचा खांदा पकडला आणि तिला स्वतःकडे बघायला लावले. डेव्हिडने मध्ये यायचा प्रयत्न केला. पण तिने त्याला बाजूला केले आणि घोगऱ्या आवाजात म्हणाली, "कॅरोलीन, गरीब बिचाऱ्या छोट्याशा स्त्रिये, तुला असे वाटते आहे, की या तरुण स्त्रीला इथे बोलावून, गुन्ह्यातील तुझी निरागसता तू तिला सांगू शकशील. तुझे हे सर्व बोलणे, निव्वळ बाष्कळ बडबड आहे. तू मूर्खपणाचा आव आणून लबाडी करते आहेस. कॅरोलीन, मला असे सांग --- " श्वास घेण्यासाठी, ती खूप वेळ थांबली. मग सुसानने तिला पाहीले होते, त्यापेक्षा जास्त शक्तिमान व पराभव करण्यास जास्त कठीण होऊन, ती म्हणाली, "मला सांग, गोळी चालवली गेली, तेव्हा डेव्हिड कुठे होता?"

कॅरोलीन मागे मागे चालली होती. डेव्हिड पटकन म्हणाला, "मला वाचवण्यासाठी ती काहीही सांगेल आणि तू --- "

“डेव्हिड तू गप्प बस. कॅरोलीन, तू मला उत्तर दे.”

कॅरोलीन म्हणाली, “तो त्याच्या खोलीच्या दाराशी उभा होता.”

जेसिका बराच वेळ गप्प राहिली. मग मुद्दाम तिने तिची पकड ढिली केली व सरळ होऊन, एकाकडून दुसऱ्याकडे बघू लागली. ती म्हणाली, “कॅरी, तू जवळजवळ कबूल केले आहेस, की तिथे दुसरे कोणी नव्हते. तू कबूल केले आहेस, की तो डेव्हिड नव्हता. कॅरी, तू तिला का मारलेस?”

डेव्हिड दोन बायकांच्या मध्ये येऊन बोलला, “तिने मारले नाही.” त्याचा चेहरा पांढरा पडला होता आणि डोळे आग ओकत होते. “ती तू होतीस, जेसिका, तू --- “

“डेव्हिड, गप्प बस.” हे शब्द म्हणजे जणू फटकारा मारल्यासारखे होते. ”जेव्हा गोळी चालली, तेव्हा मी या खोलीत होते. मी मेरीला मारले नाही. मी तिला मारू शकलेच नसते. ते तुला माहिती आहे. ये, कॅरोलीन.”

सुसानने तिचा करडा हात कॅरोलीनच्या खांद्यावर ठेवला. कॅरोलीन त्या स्पर्शाने मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणे, उठली आणि जेसिका वळून, दाराकडे गेली. दोन बायकांनी खोली ओलांडली, तरी कुणीही हलले नाही.

जिम बायरनने सुसानकडे पहायचे नसतांना पाहीले आणि नंतर जेसिकाच्या उद्धट हावभावांकडे बघत, दार उघडले. सुसान थोडीशी भानावर होती, की बाहेर हॉलमध्ये माणसे आहेत. पण असामान्य दृष्य बघून, ती जादूने खिळल्यासारखी झाली होती.

कोणी हलले नाही. तिथे जेसिकाच्या रेशमी कपड्यांची सळसळ सोडून काही आवाज नव्हता. तिने कॅरोलीनला जिन्याकडे नेले. तळाच्या पायरीशी जेसिका वळली आणि तिचा चेहरा कमी कठोर झाला. क्षणभर तो प्रेमळ झाला.

तिथे तिच्या कॅरोलीनच्या आखडलेल्या खांद्यावर दाब देणाऱ्या करड्या हातात काही विचित्र प्रकारची कोवळीक दिसली.

तो हात काही जोर करत नव्हता.

ती सर्वांना ऐकू येईल, अशा आवाजात कॅरोलीनला म्हणाली, “वरच्या मजल्यावर जा. वर जा आणि काय जरुरीचे आहे, ते कर. माझ्या कपड्यांच्या कपाटात, झोप येणारे पुरेसे सोडियम सॉल्ट असेल. आम्ही तुला वेळ देतो.”

जणू जिन्यापासून माघारी जायचा रस्ता तिच्या कडक शरीराने अडवण्यासाठी ती वळली. तिने विरोध व अवज्ञा करण्याच्या धैर्याने आजूबाजूला पाहीले. *“मी त्यांना तुला वेळ द्यायला लावेन. कॅरी,चल.”*

तिथे भीतीदायकपणे पूर्ण शांतता होती. त्या शांततेत काही करडे, छोटे झटकन पडद्यातून खाली आले व जिन्यात गेले.

कुणीतरी किंचाळले, “आई ग, ते काय आहे?”

डेव्हिडने पुढे उडी मारली. “तुला ते करता येणार नाही. तू ते करु नकोस. कॅरोलीन, हलू नकोस --- “ सुसानला माहिती होते, की तो स्वतःला जेसिका आणि कॅरोलीन यांच्यामध्ये उभा करत होता. तिथे एकाएकी गोंधळ झाला. परंतु तिच्या मनात काही उमटल्याने, ती दक्ष झाली. कशीतरी ती गोंधळातून बाहेर पडली व हॉलमध्ये लेफ्टनंट मोहर्वच्या जवळ आली. आणि जिम बायरन तिच्या

बाजूला उभा होता. ती काय बोलली, ते दोघांनी ऐकले. लेफ्टनंट मोहर्व भरभर जिना चढून गेला आणि जिम बायरन जेवायच्या खोलीत नाहीसा झाला.

पहिल्यांदा जिम परत आला. त्याने सुसानला एका बाजूला खेचले. तो म्हणाला, "तुझे बरोबर आहे. स्वयंपाकी आणि घरगडी दोघांनी म्ह्टले आहे, की मेरी माकडाच्या बाबतीत फार कडक होती आणि माकड तिचे नेहमी ऐके. पण याचा अर्थ काय?"

"माझी खात्री नाही. जिम, पण मी आताच लेफ्टनंटला सांगितले, की वरच्या मजल्यावर कुठेतरी पिस्तुलातील गोळीने पडलेले भोक असेल. ते दुसऱ्या गोळीने पाडले गेले असणार. ते कदाचित छतात असेल किंवा भिंतीत. मला वाटते, ते जेसिकाच्या खोलीत असेल.

लेफ्टनंट मोहर्व जिना उतरून येत होता.

तो जिन्याच्या तळाशी पोचला. त्याने दुःखाने उदास होऊन, तेथील गटाकडे पाहीले. कॅरोलीन भिंतीवर आपटली. डेव्हिड गोरामोरा होऊन, खिळल्यासारखा झाला होता. जेसिका द्वेषाची घट्ट पुतळी झाली होती.

मग त्याने सुस्कारा टाकला आणि त्याच्याजवळील पोलिसाकडे बघून मान डोलावली.

त्याने सुसानला विचारले, "तुम्ही कृपया ड्रॉइंग रुममध्ये जाल का? आणि जिम तुम्हीदेखील."

दारे एकत्र सरकली. अजूनही दुःखाने लेफ्टनंट मोहर्वने त्याच्या खिशातून एक पिस्तुल, लांब दोरी, कापूस व लहान गजराचे घड्याळ काढले.

ते जिन्याच्या मुख्य खांबाजवळ लपवलेले होते. "तुम्हाला आठवत असेल तर मिस डरे, जिन्याचा वरील कोरीव काम केलेला भाग थोडा सैल होता. तुम्हाला ते आठवत असेल आणि तिथे पिस्तुलाच्या दोन गोळया गेलेल्या होत्या. त्या जिन्याच्या मध्यभागी असलेल्या खांबात लपलेल्या होत्या. आणि गोळीचे एक भोक जेसिकाच्या झोपायच्या खोलीच्या भिंतीत होते.

मिस डरे, ती जेसिका असल्याचे तुम्हाला कसे समजले?"

सुसान बोलली, "माकडामुळे" तिच्या स्वतःच्या कानात, तिचा आवाज कृत्रिम, खूप दमलेला व खूप दुःखी वाटत होता. "सर्व वेळी ते माकडच होते. तुम्ही बघा, ते तिथे बसले होते. ते मेरीच्या शेजारी बसून, खोक्यातील पदार्थावर ताव मारत होते. जर ती मेली असल्याचे त्याला कळले असते, तर ते हे करायला घाबरले असते. जेसिका खोलीत आल्यावर, ते पळून गेले. जेव्हा मी याबद्दल विचार केला, तेव्हा मला सर्व गोष्ट समजून चुकली. गरम घरामुळे मेरीचे शरीर, कोमट राहीले होते. त्यामुळे मृत्यूची वेळ कळायला गोंधळ होत होता. घराबाहेरील प्रत्येकाने जेसिकाला खुनी ठरवले. आणि मग तुम्हाला ही गोष्ट सापडली --- "

लेफ्टनंट मोहर्व बोलला, "अर्थात, हे अगदी साधे आहे. गजराची लिव्हर आणि पिस्तुलाचा चाप याला घट्ट दोरी बांधली गेली आणि थोडा कापूस गजराला गुंडाळला गेला. घड्याळ पाच वाजून दहा मिनिटांसाठी तयार करून ठेवले गेले.

"ते तिने जिन्याच्या खांबात कधी लपवले?"

"मला वाटते, जेव्हा मी पोलिसांना फोन करायला खाली गेले. डेव्हिड व कॅरोलीन मेरीच्या खोलीत होते --- सुसान दुःखाने म्हणाली --- "मला घरी जायचे आहे."

जिम बायरन बोलला, “इकडे बघ सुसान, हे ठीक वाटते. पण लक्षात ठेव, मग मेरी मेली नसती. तू तिचे बोलणे ऐकलेस.“

मी तिचे बोलणे, पूर्वी कधीच ऐकले नव्हते. मी एका व्यक्तीचा पूर्णपणे मृतप्राय आवाज ऐकला. खरे तर कॅरोलीनने हे गूढ उकलले आणि जेसिकाला ते माहिती होते. तिला ते माहिती असूनही तिने कॅरोलीनवर आळ घेण्याचा प्रयत्न केला. तिला आत्महत्येचा दिशेने नेले.”

“कॅरोलीन काय म्हणाली?” लेफ्टनंट मोहर्व शांत होता.

ती म्हणाली, की तिने बंद दारामागे, जेसिकाच्या खोलीत, मेरीला जेसिकाशी बोलतांना ऐकले. आणि ती सरळ दार ओलांडून, मेरीच्या खोलीत गेली आणि तिने मेरीला तिथे बसलेले पाहीले.

कॅरोलीन गोंधळून गेली, घाबरली, आकाशस्थ ताऱ्यांबद्दल बोलू लागली. नैसर्गिकपणे आपल्याला माहिती होते, की जेसिका मेरीच्या बोलण्याच्या नकलेचा सराव करत होती.”

जिम म्हणाला, “हा बेत तिने आधीच ठरवला होता. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत कायकाय करायचे हे सगळे ठरवले होते. आणि तुझ्या येण्याने तिला फक्त संधी मिळाली. सुसान, तू पुरावा पुरवलास.

सुसान शहारली.

“तोच त्रास होता. जेव्हा वरच्या मजल्यावर गोळी सुटली, तेव्हा ती बरोबर माझ्यासमोर बसली होती.

तरी ती मेरीचा पुरेसा द्वेष करणारी एकमेव व्यक्ती होती --- तिचा खून करेल अशी. हे पैशांसाठी नव्हते. हा द्वेष होता. या भयंकर घरात अनेक वर्षे एकत्र रहाणे, डेव्हिडबद्दल असूया असणे, हे सर्व टोकाला जाऊन, अटळ असे झाले.”

सुसानने तिचे केस सारखे केले “कृपया, मी जाऊ शकते का?”

“म्हणजे तू जेव्हा घरात शिरलीस, तेव्हाच मेरी मृत होती का?”

“हो. तिला उशा लाऊन, बसल्यासारखे केले होते. तुला माहिती आहे, मी --- मी ती सगळी गोष्ट पाहिली होती. जेसिकाला तिच्याजवळ जाऊन बोलतांना पाहिले. मेरीचे उत्तरही ऐकले. मेरीच्या आवाजात जेसिका बोलत होती, हे मला कसे माहिती असणार?

मग जेसिकाने वाकून तिच्या उशांना काही केले. त्या ओढल्या. मला वाटते, त्यामुळे शरीर ताठ राहिले नाही. मग जेसिका लगेच वळली. माझ्या आणि मेरीच्या मध्ये उभी राहिली, जेणेकरून, मी दरवाज्याशी जाईपर्यंत मला मेरी दिसू नये. [मला मेरी कधीच नीट दिसली नाही कारण ती सावलीत होती.] जेव्हा डेव्हिड आणि कॅरोलीन वरच्या मजल्यावर आले, तेव्हा जेसिकाने त्या दोघांना ठणकावून सांगितले, की मेरी वाचते आहे. मला वाटते, तिला माहिती होते की मेरीशी बोलायची गरज नसल्याचे समजल्यावर, त्यांनी सुटकेचा निश्वासच सोडला असेल.”

सुसान परत शहारली आणि तिने तिचे केस सारखे केले. तिला या भयंकर प्रकाराने रडावेसे वाटत होते. “हे भयानक घर आहे.” ती काही निष्कर्ष न काढता बोलली. जिम बायरन घाईने बोलला, “ती आता जाऊ शकते, नाही का? तिला परत त्यांना भेटायची जरुरी नाही.”

हवा ताजी आणि गार होती. पहाटेपूर्वी आकाश खूप काळे होते आणि फूटपाथ चमकत होते.

ते दिशा बदलून, गाडी आत आणायच्या रस्त्यावर आले आणि लाल दिव्यासाठी थांबले. जिम तिच्याकडे वळला. गाडीमधील संधीप्रकाशाच्या अंधारात, तिला त्याची निरीक्षण करणारी नजर जाणवत होती.

तो थंडपणे बोलला, “मला असे काही होणे, अपेक्षित नव्हते. तू मला क्षमा करशील का?”

सुसान लहानशा पण स्पष्ट आवाजात बोलली, “पुढच्या वेळी मी घाबरणार नाही.”

जिम तिची हेटाळणी करत म्हणाला, “पुढच्या वेळी! पुढची वेळ येणार नाही. खरे तर मी घाबरलो होतो. तू त्यांच्याशी बोलत असतांना, सर्व वेळ माझे बोट पिस्तुलाच्या चापावर होते. जर माझ्या हातात असेल, तर खरेच, अशी वेळ परत येणार नाही.”

# The Lipstick

by

Mary Roberts Rinehart

# लिपस्टिक





वकिलाच्या चौकशीनंतर मी घरी परतले. एलीनॉरच्या मृत्युपासून आई जरा आजारी दिसत होती. ती गाडीत बसून गेली. ती एलीनॉरची फार पर्वा करत होती, असे नाही. तिने तिच्या आयुष्यात लोकांचे दोन भाग पाडले होते, धार्मिक वा चालीरीतीला धरून वागणारे आणि अधार्मिक/ बेमुर्वतखोर. धार्मिक वा चालीरीतीला धरून वागणारे लोक महिन्याच्या पहिल्या तारखेला त्यांची बिले भरत असत, चर्चमध्ये जात असत. त्यांचे नाव कधीही काही आगळीक केल्याबद्दल वर्तमानपत्रात छापून येत नसे आणि वीस वर्षावरील मुलीसाठी लग्न ही एक अनिवार्य गोष्ट असल्याचे मानत असत.

माझी चुलत बहीण, एलीनॉर हॅमॉन्डने हे सर्व धुडकावून लावले होते. आजचा दिवस जास्तीत जास्त आनंदात कसा घालवता येईल, अशा विचाराने ती रोज जागी होत असे व आयुष्य मजेने घालवत असे. माझ्या आईने रेशमी कापडाचा कितीही दुस्वास केला तरी, एलीनॉर गरीब बिचाऱ्या फ्रेडला तिच्या कपड्यांच्या खोलीत बोलावून, तिचे सुंदर, उंच शरीर रेशमी कपड्यात लपेटत असे.

“फ्रेड, आपण काही लोकांना आपल्याकडे पेयपानासाठी बोलावू.”

“प्रिये, तू म्हणशील तसे.”

नेहमी असेच चाले. एलीनॉर म्हणेल ते, फ्रेडच्या दृष्टीने योग्य असे. तो तिची पूजा करत असे. मी त्या दिवशी घरी आले, तेव्हा मी त्याचा चौकशीच्या वेळेचा चेहरा आठवत होते.

तो घाबरून, नीट विचार करू शकत नव्हता.

“तुला माहिती आहे का, तुझ्या --- मिसेस हॅमॉन्डला स्वतःचा जीव घ्यायचे काय कारण होते?”

“काहीच नव्हते.”

“तिच्या तब्येतीत काळजी करण्यासारखे काहीच नव्हते.”

“काहीच नव्हते. तिची तब्येत उत्तम होती.”

“ती डॉक्टर बर्कलेंचा सल्ला घेत होती.”

तो दुःखाने म्हणाला, “ती दमली होती. ती फार काम करत होती.”

तर असे झाले, की एलीनॉर डॉक्टर बर्कलेंच्या दहाव्या मजल्याच्या

खिडकीतून पडली किंवा तिने उडी मारली. वकिलाचे म्हणणे होते, की तिने नक्की उडी मारली. डॉक्टरने तिला त्या दिवशी अजिबात पाहिले नव्हते. ती फक्त परिचारिकेला भेटली होती. परिचारिकेने सांगितले,

"आजारी लोकांसाठी डॉक्टरांची वाट बघत बसायच्या हॉलमध्ये तिच्याशिवाय कुणीच नव्हते. डॉक्टर आत एका रुग्णाबरोबर होते. मिसेस हॅमॉन्ड बसली. तिची टोपी काढली. मग तिने एक मासिक उचलले. मी माझ्या कामाच्या खोलीत जाऊन काही कागदांची प्रत काढली. मी नंतर तिला पाहिले नाही, जोपर्यंत --- "

ती परिचारिका एक लहानशी चांगली मुलगी होती. ती अशक्त दिसत होती. वकील सभ्यपणे बोलला, "पुढे काय झाले, ते सांग."

"मी दुसऱ्या एका रुग्णाला पाच मिनिटांनी जातांना ऐकले. ती डॉक्टरांच्या सल्ला देण्याच्या खोलीतून बाहेर पडली. हॉलमध्ये एक दार आहे. जेव्हा डॉक्टरांनी पुढच्या रुग्णाला आत पाठवण्यासाठी घंटी वाजवली, तेव्हा मी मिसेस हॅमॉन्डला बघायला गेले. पण ती तिथे नव्हती. मला तिची टोपी दिसली, पण बॅग गेलेली होती. मग --- मी रस्त्यावरील लोकांना ओरडताना ऐकले व मी खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले."

वकिलाने विचारले, "मिस कमिंग, तिची मनस्थिती त्या दिवशी कशी होती? ती उदास होती का?"

परिचारिका म्हणाली, "मला वाटले, ती चांगली आनंदी होती."

"तिच्या शेजारील खिडकी उघडी होती?"

"हो, माझा विश्वासच बसेना, जोपर्यंत मी --- "

वकिलाने तिला प्रश्न विचारणे थांबवले. हे स्पष्ट होते, की तिने तिला माहिती असलेले सर्व सांगितले होते.

जेव्हा डॉक्टर बर्कलेंना बोलावले गेले, तेव्हा मी आश्चर्यचकित झाले. मला एक मोठा माणूस दिसणे अपेक्षित होते. पण ते तर दिसायला चांगले व सरत्या तिशीतले होते. एलीनॉर कशी होती, हे मला माहिती असल्याने, मला नवल वाटले. फ्रेड तर काही दिसायला चांगला नव्हता. त्यामुळे बहुधा तिला देखण्या माणसांचे आकर्षण होते.

माझ्याशिवाय आईनेही सभ्य स्त्रीसारखा रागाने खरखरीत आवाज काढला. ती बोलली, "हे असे आहे तर! मला तिसऱ्या पायाची जेवढी गरज आहे, तेवढीच तिला मानसोपचारतज्ञाची गरज होती."

पण आम्हाला आधी जे माहिती होते, त्यात डॉक्टर बर्कलेंनी भर घातली. त्यांनी त्या सकाळी एलीनॉरला अजिबात पाहिले नव्हते. जेव्हा त्यांनी घंटी वाजवून कुणी आले नाही, तेव्हा ते बाहेरील खोलीत आले. मिसेस कनिंग खिडकीतून बाहेर डोकावत होती. एकाएकी ती किंचाळू लागली. नशीबाने, मिसेस थॉम्पसन वेळेवर आली आणि तिचा ताबा घेतला. डॉक्टर खाली रस्त्यावर गेले, पण रुग्णवाहिका आधीच आली होती.

त्या वेळेपर्यंत डॉक्टर मोकळेपणे बोलत होते. मिसेस एलीनॉर त्याला भेटायला कशासाठी आली होती, असे विचारताच ते सावध झाले. "माझ्याकडे मिसेस हॅमॉन्डसारखे खूप रुग्ण येतात. सदैव काळजी करण्याचा स्वभाव असलेल्या बायका असतात. मिसेस हॅमॉन्ड खूप वर्षे अशी आहे."

"एवढेच? तिने काही विशिष्ट त्रास सांगितला नाही का?"

ते मंदसे हसू हसले. ते म्हणाले, आपल्या सर्वांना त्रास असतात. काहींची आपण कल्पना करतो, काही वाढवतो, तर काही खरे असतात. पण मी असे म्हणेन की, मिसेस हॅमॉन्ड अगदी धडधाकट व सर्वसामान्य बाई होती. मी तिला विश्रांती घेण्यास सुचवले होते. मला वाटते, तिने ती घ्यायचे ठरवले होते."

त्यांचा आवाज व्यावसायिक आणि तुटक होता. जर एलीनॉर त्याच्याकडे आकर्षित झाली असेल, तर ते एकतर्फी प्रकरण होते.

"तर मग तिने खूप विचार करून आत्महत्या केली असेल, असे तुम्हाला वाटत नाही का?"

"नाही, कधीच नाही."

एवढेच त्यांच्याकडून समजले. एलीनॉरने काही कल्पना केली असेल किंवा काही वाढवून बघितले असेल, असेच म्हणत, ते आत्महत्येची बाब टाळत राहीले. ते म्हणाले, त्यांचे त्यांच्या रुग्णांबरोबरचे संबंध गुप्त प्रकारचे होते. जर त्यांना काही मौल्यवान असे आढळले, तर ते ते सांगतील, पण त्यांनी काही सांगितले नाही.

त्यांचे संपल्यावर आईने मला कोपराने ढोसून माझे लक्ष वेधून घेतले. "बहुधा तो तिच्या प्रेमात असावा. त्याला धक्का बसला, हे नक्की."

ते आमच्या शेजारी बसले. मी त्यांचे निरीक्षण केले. पुढील साक्षीदाराला, आईसारख्या दिसणाऱ्या, परिचारिकेला सावरणाऱ्या मिसेस थॉम्पसनला, बोलावले गेले, तेव्हा ते भानावर आले.

तिने लगेच सांगितले, "मी रुग्ण नव्हते. मी डॉक्टरांचा दवाखाना

आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करते. त्या दिवशी मला थोडे पैसे अंगावर हवे होते, म्हणून मी आले होते.”

ती दवाखान्यात एकदम शिरली नाही. तिने शिरल्यावर, एलीनॉरकडे पाहिले. ती हॉलमध्ये थांबली. तिने शेवटची रुग्ण स्त्री डॉक्टरांच्या सल्ला द्यायच्या खोलीतून बाहेर पडून, लिफ्टने खाली जातांना पाहिली. त्यानंतर मिनिटाभराने तिने परिचारिकेला किंचाळतांना ऐकले.

ती खिडकीतून बाहेर डोकावत, जोराने रडत होती. मग डॉक्टर धावत आले व तिला कोचावर झोपवले. ती म्हणाली, कोणीतरी खिडकीतून बाहेर पडले. पण ते कोण होते, ते तिला माहिती नव्हते.”

ती हॉलमध्ये किती वेळ होती, असे विचारल्यावर तिने पंधरा मिनिटे विचार केला. तिची खात्री होती, की त्या वेळी दुसरे कुठलेही रुग्ण हॉलमध्ये आलेले नव्हते. जर कोणी आले असते, तर ते तिला दिसले असते.

तुला मिसेस हॅमॉन्डची काही वस्तू तिथे पडलेली दिसली नाही का?”

“हो, तिची बॅग.”

तर असे सर्व घडले होते, की उडी मारण्यापूर्वी, तिची टोपी एलीनॉरने टेबलावर ठेवली. बॅग खिडकीसमोर, उष्णता उत्सर्जित करणाऱ्या यंत्रामागे ठेवली होती. पण मला त्याचा अर्थ कळत नव्हता.

ताळ्यावर नसलेल्या मनाने आत्महत्या केली असल्याचा, तो पुरावा होता. खिडकी तपासली गेली. पण खिडकीसमोर उष्णता उत्सर्जित करणारे यंत्र होते. सर्वसामान्य मत असे होते, की ती पडण्याची काहीच शक्यता नव्हती. पण

कोणी खून झाल्याचे म्हणत नव्हते. मिसेस थॉम्पसनच्या म्हणण्याप्रमाणे, ते अशक्य दिसत होते.

फ्रेडने कोऱ्या डोळ्यांनी साक्ष ऐकून घेतली. त्याची बहीण, शोकप्रदर्शन करणारे कपडे केलेली मार्गारेट, त्याच्याशेजारी बसली होती, ती उठली. डॉक्टर बर्कले सरळ पुढे गेले, जसे काही त्यांनी काही ऐकलेच नाही. मग ते उठून बाहेर गेले. मी आईला गाडीत बसवल्यावर, त्याना अजूनही चेहऱ्यावरील विचित्र ठराविक भावांसकट गाडीतून निघून जातांना पाहीले.

मी घरी पोचले, तेव्हा मी रागाने धुमसत होते. जरी तिने माझ्या नाकावर टिच्चून फ्रेडला माझ्यापासून पळवले होते, तरी मला नेहमी एलीनॉर आवडत होती. आई मला टोमणा मारत खरेखुरे म्हणाली होती, की फ्रेडला हॅमॉन्ड भेटल्यावर त्याने माझ्याकडे कधी पाहिलेच नाही. पहिल्यापासून तो तिची पूजा करत असे. चौकशीमध्ये त्याचा पांढरा फटक पडलेला चेहरा, गूढ अजूनच वाढवत होता.

मी विचार केला, ‘मूर्ख! एलीनॉरला काही त्रास झाला असता, तरी तिने खिडकीबाहेर उडी मारली असती. लोक काय म्हणतील, याची तिने कधीच पर्वा केली नाही. मी तिला मागील वेळी भेटले, त्याची मला आठवण झाली. कोणीतरी दबल्या गेलेल्या इच्छेसाठी मेजवानी दिली होती. तेव्हा एलीनॉर पांढऱ्या शुभ्र सॅटीनच्या ड्रेसवर मोठा शेंदरी A असलेले कपडे घालून आली होती.

ते बघून आईला तर चक्करच आली. ती म्हणाली, “एलीनॉर, तुझ्या लैंगिक चाळयांमधून जो अर्थ प्रतीत होतो, तो खरा नसावा.”

एलीनॉर हसली व आईला म्हणाली, “एमा काकू, तुला काय वाटते? तुझ्या आयुष्यात तू कधीच --- “

आई म्हणाली, “एलीनॉर, तू कसलेही कपडे घाल, ते चालेल.”

त्या रात्री एलीनॉर फार आनंदात होती. आईबरोबर तिने लहानसहान गोष्टीत आनंद घेतला. मला ती आवडायचे ते एक कारण होते. ती आईला सहन करू शके. सतत तिच्या भीतीच्या छायेत घरी रहाणारी ती काही एकुलती एक मुलगी नव्हती. माझ्या लहानशा जगात तिने हास्य व आनंद आणला होता.

मी घरी पोचले, तेव्हा आई चहा घेत होती. ती चहाच्या टेबलाशी बसून मला कडकपणे तपासत होती. “लुइस, मला कळत नाही, यामुळे तू का काळजी करतेस? जे काही झाले, ते झाले. शेवटी तिने फ्रेडला दयनीय आयुष्य दिले.”

मी म्हणाले, “तिने त्याला सुखी बनवले आणि आता ती मेली आहे. शिवाय मला असे वाटत नाही, की तिने खिडकीतून उडी मारली असेल.”

“मग ती काय पडली?”

“माझा त्यावरही विश्वास नाही.”

“अग मग तुझा विश्वास तरी कशावर आहे?”

मला हे संभाषण अती झाले. मी वर माझ्या खोलीत निघून गेले. माझ्या मनात तीच गोष्ट गोल गोल फिरत बसली होती.

कोणीतरी एलीनॉरला मारले आणि पळून गेला. तो कोण होता, तो तिचा द्वेष करत असणार. हेवा करणारी बायको? हे शक्य आहे.

मला माझ्या खिडकीतून हॅमॉन्ड मंडळींचे घर दिसत असे आणि तिथे

बसून फ्रेडचा विचार करणे, मला सहन होत नव्हते. आईला जरी तसे वाटत असले, तरी मी त्याच्यावर कधी प्रेम केले होते, असे नाही.

मी कपडे करून खाली जेवायला गेले. पण मला जेवण जाईना. त्यातल्या त्यात चांगले म्हणजे ती आईची ब्रिज खेळायची रात्र होती. ती आणि तिच्या तीन मैत्रिणी टेबलाशी बसून खेळात गुंग झाल्यावर, मी तिथून स्वयंपाकघरातून निसटले.

स्वयंपाकीण, ॲनी सॅन्डविचेस बनवत होती व केक कापत होती. कुणी विचारल्यास, मी झोपायला गेल्याचे सांग, असे मी तिला सांगितले व निघून गेले.

फ्रेडचे घर जवळच होते व आमच्यासारखेच होते. मी गाडी आत नेण्याच्या वाटेवर एका माणसाला तिथे उभे राहून, निरीक्षण करतांना पाहिले. त्याला मी तिथे आल्याचे आश्चर्य वाटले असणार, कारण त्याने वळून माझ्याकडे पाहिले. तो डॉक्टर बर्कले होता.

त्याने मला ओळखले नाही. त्याने त्याच्या टोपीला हात लावला व तो मोटारीच्या रस्त्यावर गेला. मी त्याने गाडी सुरु केलेली ऐकली.

पण तो जर घरात येऊन गेला असेल, तर फ्रेड तसे काही बोलला नाही. मी घंटी वाजवली व त्याने दार उघडले. मला बघितल्यावर त्याला सुटका झाल्यासारखे वाटले. तो बोलला, “मला वाटले, परत ते मूर्ख पोलीस आले, की काय! ये. मी नोकरांना झोपायला पाठवून दिले आहे.”

आम्ही वाचनालयात गेलो. तिथे महिन्याभरात तरी कुणी झाडले नसावे. एलीनॉरचे घर नेहमी अस्वच्छ दिसत असे. लोकांची गर्दी, सिगरेटचा धूर आणि मेजवानीच्या वेळेचे मोठे पेले तिथे नेहमी पडलेले असत. पण ते निदान जिवंत

दिसत असे. आता --- ठीक आहे, तसे दिसत नव्हते. पण तिची बॅग टेबलावर पडलेली पाहून, मला नवल वाटले.

फ्रेडने मला तिकडे बघतांना पाहिले. तो म्हणाला, “पोलिसांनी ती परत केली.”

“फ्रेड, मी ती उघडून पाहू का?”

तो रुचीहीनतेने म्हणाला, तू जर चिठ्ठी बघायचा विचार करत असशील, तर ती त्यात नाही.“

मी बॅग उघडली. ती नेहमीप्रमाणे खचून भरलेली होती. पावडर, लाली, नाण्यांचे पाकीट, काही बिले, स्मरणवही, लिपस्टिकचे डाग पडलेला रुमाल, छोटीशी सेंटची बाटली आणि एका कार्डाला टोचलेले काही कपड्याच्या तुकड्यांचे नमुने! त्या कार्डावर लिहिले होते, याच्याशी जुळणाऱ्या रंगाच्या स्लीपर्स.

फ्रेड माझ्याकडे बघत होता. त्याचे डोळे लाल व सुजलेले होते. “मी तुला म्हणालो होतो, की त्यात काही सापडणार नाही.”

मी बॅग परत तपासली, पण मला वाटत होते, ती वस्तू तिथे नव्हती. मी बॅग बंद केली व परत टेबलावर ठेऊन दिली.

चांदीच्या फ्रेममधील एलीनॉरच्या फोटोकडे तो बघत होता. “हे सर्व पोलीसंनी परत केले. ते तिला विश्रांती का घेऊन देत नाहीत? ती खूप सुंदर होती नाही का, लुई?”

मी म्हणाले, “खरेच ती तशी होती.”

“लोक काहीही बोलतात. मार्गारिटला वाटते, ती मूर्ख व उधळी होती. त्याने टेबलाकडे नजर टाकली. तिथे न उघडलेल्या बिलांचा ढीग पडला होता. मी विचार केला, ‘कदाचित ती तिची असतील, पण मी का म्हणून त्यांची काळजी करू?’

त्याने काही शेरेबाजी करायची अपेक्षा होती, म्हणून मी बोलले, “फ्रेड, तुला तिला विकत घ्यायची गरज नव्हती. ती कायम तुझीच होती. ती तुझ्याशी एकनिष्ठ होती.”

तो घाबरलेल्या, समजूत घातलेल्या लहान मुलासारखे, फिकट हसू हसला. “ती तशी होती. मी तिचा फक्त नवरा नव्हतो मी तिचे वडीलही होतो. ती मला सर्व काही सांगत असे. तिला त्या मूर्ख डॉक्टरकडे का जावे लागले --- “

“फ्रेड, तुला हे माहिती होते का?”

तो गंभीरपणे म्हणाला, “त्याच्याकडून आलेले बिल बघेपर्यंत नाही. तासन तास त्या तरुण कुत्र्याकडे बसण्यापेक्षा, मीदेखील तिच्यासाठी विश्रांती घेणे, हा उपाय सांगितला असता. पण मी असे म्हटल्यावर, ती फक्त हसे.”

कोणीतरी श्रोता मिळाल्याने जणू आनंदित होऊन, तो बोलत राहीला. त्याने तिला आनंदी बनवले. कधीकधी ती तिच्या रस्त्याने जायची. पण ती नेहमी त्याच्याकडे परत यायची. तो वकिलाचा पुरावा म्हणजे रागाची प्रतिक्रिया समजायचा. “ती पडली. ती उंचीच्या बाबतीत नेहमी धसमुसळी असे.” त्याने काही बेत केले नाहीत. फक्त त्याने जागा बंद करेपर्यंत मार्गारिट रहायला येत असे. जणू काही नुसता तिचा उल्लेख केला, की ती त्या मिनिटाला येऊन हजर होई.

मला मार्गारेट हॅमॉन्ड कधीच आवडत नसे. ती उंच, टोकेरी बाई होती. फ्रेडपेक्षा मोठी होती. ती माझ्याकडे बघून नुसती मान हलवत असे.

ती म्हणे, "मी आज रात्री यायचे ठरवले आहे. मला तू एकटा राहिलेले आवडत नाही आणि उद्या मी घर तपासणार आहे. फ्रेड, मला वडिलांचे चित्र मिळाले, तर हवे आहे."

तो काही दुखल्यासारखी शरीराची हालचाल करे. फ्रेडच्या लग्नापासून, म्हाताऱ्या जो हॅमॉन्डच्या चित्रावरून, नेहमीच भांडणे होत. एलीनॉर पण त्याची काही पर्वा करत नसे. पण मार्गारेटला ते हवे असल्याने, ती त्याचा हेका धरून बसे. कदाचित ती एलीनॉरची सर्वात जवळची खरी शत्रू होती. ती या लग्नाचा द्वेष करे. ती एलीनॉरच्या सहजपणे उधळपट्टी करणाऱ्या आयुष्याचा राग करे. आता सुद्धा टेबलावरील बिलांचा ढीग पाहून, तिने नाक मुरडले.

ती म्हणे, "फ्रेड, मी याबद्दल तुला सरळ करेन. आपण बघू, तू हे कसे काय सहन करतोस."

"मला माहिती आहे, मी हे कसे सहन करतो. तो उठला आणि ते एकमेकांशी वाद घालू लागले. फ्रेड टेबलाकडे पाठ करून उभा होता. जणू काही तो एलीनॉरला मार्गारेटच्या ज्यात त्यात नाक खुपसण्याच्या स्वभावापासून वाचवत होता. फ्रेडच्या बहिणीने शहारून, ते सोडून दिले.

ती गरम रात्र होती. मी सावकाश चालत घरी आले. मी अर्धे अंतर गेल्यावर माझ्या लक्षात आले, की कुणीतरी माझा पाठलाग करते आहे. मी थांबून वळले. ती एक मुलगी होती. तिने मला हाक मारली.

"तुम्ही मिसेस बारिंग आहात का?"

“तू मला मरणांतिक घाबरवलेस.”

“मला माफ करा. मी आज तुम्हाला चौकशीच्या जागी पाहिले.”

एका वार्ताहराने मला तुमचे नाव सांगितले. तुम्ही मिसेस हॅमॉन्डची मैत्रीण होतात का?”

“ती माझी चुलत बहीण होती. का?”

ती मुलगी काही निर्णय घेत होती. “कारण मला वाटते, तिला खिडकीबाहेर ढकलले गेले.”

मी समोरील कार्यालयात काम करते आणि मी बाहेर बघत होते. अर्थात, ती कोण आहे, ते मला माहिती नव्हते.”

“तुला असे म्हणायचे आहे का, की तू ते पडतांना पाहिलेस?”

“नाही. पण मी तिला हे घडण्यापूर्वी एक मिनिट खिडकीशी पाहिले. ती लिपस्टिक लावत होती. नंतर मी परत फिरले, तेव्हा ती फूटपाथवर होती.” ती मुलगी शहारली. मला नाही वाटत कुणी स्त्री, तिने तसे काही करण्यापूर्वी लिपस्टिक लावेल. तुम्हाला काय वाटते?”

“तुझी खात्री आहे का, की ती मिसेस हॅमॉन्ड होती?”

“हो. तिचे कपडे हिरवे होते आणि तिचे केसही माझ्या लक्षात आले. तिच्या डोक्यावर टोपी नव्हती. तर आज रात्री मी फूटपाथवर जाऊन बघितले, की तिथे लिपस्टिक पडलेली आहे का. मला ती शोधता आली नाही. पण माझी खात्री आहे, की ती नक्की तिथे पडलेली असणार.”

"हो, तिचे कपडे हिरवे होते. मी फ्रेडला हे सांगितले नाही, की तिच्या बॅगेतून सोनेरी लिपस्टिक गायब होती."

मी म्हणाले, "आपण परत जाऊन बघू. तुला चालेल ना?"

त्या मुलीला चालणार होते. पण तिने मला तिचे नाव सांगितले नाही. ती म्हणाली, "मला फक्त स्मिथ म्हणा."

मी तिला परत कधीच बघितले नाही आणि तिने हे वाचल्याशिवाय तिला बहुधा हे माहितीदेखील होणार नाही, की तिने या केसचा उलगडा करायच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले. कारण आम्हाला तिथे गटारात लिपस्टिक सापडली. कितीतरी डझन मोटारी त्यावरून गेल्या असतील. ती चपटी झाली होती. पण त्यावरील एलीनॉरच्या नावाची आद्याक्षरे चांगली वाचता येत होती.

मिस स्मिथने ती पाहिली आणि ती अवाक झाली. ती म्हणाली, "म्हणजे माझे बरोबर होते." पुढच्या मिनिटाला तिने बस गाठली व त्यात चढली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी डॉक्टर बर्कलेंच्या दवाखान्यात उशीरा पोचले. बाहेरील हॉल रिकामा होता. त्यामुळे मी खिडकीशी जाऊन डोकावून पाहिले. मी असा विचार करायचा प्रयत्न केला, की मी आता उडी मारणार आहे. आणि मग मी तसे करणार असेन, तर मी लिपस्टिक वापरावी की नाही.

परिचारिका आत आली. मी तिला माझे नाव दिले आणि थोड्या वेळाने ती मला सल्लामसलतीच्या खोलीत घेऊन गेली.

मला पाहिल्यावर डॉक्टर उठले. मी त्यांच्यासमोरील टेबलावर एलीनॉरची लिपस्टिक ठेवली व बसले.

ते म्हणाले, “मला समजत नाही.”

“तुमच्या बाहेरील हॉलमध्ये मिसेस हॅमॉन्ड खिडकीशी उभी होती ती पडण्यापूर्वी एक मिनिट तिने लिपस्टिक लावली होती.”

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे, की तिच्याबरोबर लिपस्टिकही पडली.

“मला असे म्हणायचे आहे, की तिने स्वतःला मारून घेतले नाही.”

आपल्याला तिने जे केले असे वाटते आहे, ते करण्यापूर्वी कोणी स्त्री तिचे ओठ रंगवेल का? तिने काय केले, असा आपण विचार करत आहोत?

फसव्या विनोदाने हसत, ते म्हणाले, “अग मुली, जर तू माझ्याइतके मानवी स्वभावाचे नमुने बघितले असशील, तर त्याचे तुला काही आश्चर्य वाटणार नाही.”

“म्हणजे एलीनॉर हॅमॉन्डने लिपस्टिक हातात घेऊन खिडकीतून उडी मारली. तुम्ही काल रात्री हॅमॉन्ड यांच्या घराचे निरीक्षण केलेत आणि मग मी तिथे आले तेव्हा त्याला कडी लावलीत. जर हे खरे असेल, तर --- “

याने त्यांना धक्का बसला. त्यांनी यापूर्वी मला ओळखले नव्हते. “म्हणजे गाडी आत न्यायच्या वाटेवर तुम्ही उभ्या होतात? ठीक आहे, मला वाटते तुम्ही हे तुमच्याजवळच ठेवलेत, तर बरे होईल. मिस्टर हॅमॉन्ड ज्या तऱ्हेने चौकशीला सामोरे गेले, ते मला आवडले नाही. मला भीती वाटली --- की तो त्याच्या डोक्यात गोळी मारून घेईल.”

मी संशयाने बोलले, "म्हणून तुम्ही गाडी आणायच्या वाटेवर उभे राहिलात का?"

त्यावर, ते हसले व मग शांत होत म्हणाले, "अस्स! मिस बारिंग, मिसेस हॅमॉन्डला जे काही झाले, ते मी केले नसल्याची मी खात्री देतो. त्यांच्या घराबाहेर मी उभा होतो, कारण मी तुम्हाला खरे काय ते सांगितले आहे. तुम्ही आल्यावर घरात कसे काय जायचे, याचा मी विचार करत होतो. त्याच्या बहिणीने मला बोलावले होते. ती काळजीत होती."

"मार्गारेट हॅमॉन्ड काय म्हणते, यावर मी विश्वास ठेवत नाही. ती एलीनॉरचा द्वेष करत असे."

मी उठून लिपस्टिक उचलली. तेही उठले आणि न हसता माझे निरीक्षण केले.

"मिस बारिंग, तुम्ही फार आकर्षक तरुण स्त्री आहात. तुम्ही हे सोडून का देत नाही? शेवटी आपण तिला परत जिवंत तर करू शकत नाही."

मी हट्टीपणे म्हणाले, "तिने आत्महत्या केली नाही, हे मला माहिती आहे." आणि बाहेर पडले.

बाहेरील हॉलमध्ये मार्गारेटला पाहून, मी फार आश्चर्यचकित झाले नाही.

एलीनॉर जिथून पडली, त्या उघड्या खिडकीजवळ ती उभी होती. क्षणभर मला वाटले, की ती तिथून उडी मारणार आहे.

मी कडकपणे म्हणाले, "मार्गारेट!"

मला पाहिल्यावर ती घाबरलेली दिसली. ती म्हणाली, “ओहो, तू आहेस होय, लुईस. तू मला घाबरवलेस. ती घसमुसळेपणे बसली. “लुईस, ती नक्की घसरली असणार. ते सहज होणे शक्य आहे. तू स्वतः बघ.”

पण मी मानेने नाही म्हटले. मला मार्गारिट माझ्यामागे असतांना, खिडकीतून वाकायचे नव्हते. ती म्हणाली, की ती फ्रेडच्या वतीने एलीनॉरची बिले भरायला आलेली आहे आणि ती ते करेल.

तथापि मी लिफ्टकडे गेल्यावर माझ्या अंगावर काटा आला.

माझी गाडी सुरु करायला मला त्रास झाला. त्यामुळे मला इमारतीबाहेर येतांना ती दिसली. तिने फूटपाथ व गटारात पाहिले. त्यामुळे तिला एलीनॉरची लिपस्टिक तिच्याबरोबर पडलेली किंवा ती तिच्या बॅगेत नसलेली माहिती असणार.

तिने मला पाहिले नाही. तिने एका टॅक्सीला हात केला व त्यात बसून, ती निघून गेली. आजपर्यंत मला हे समजले नाही की मी तिचा पाठलाग का केला.

मी तिच्यामागे गेले. तिची टॅक्सी शहराच्या घरे असलेल्या भागात गेली. एक अरुंद गल्लीशी ती थांबली व मार्गारिट त्यातून बाहेर पडली. तिने मला वा माझ्या गाडीला पाहिले नाही. मी तिला पाहिले, तेव्हा ती गाडी जायला अरुंद रस्ता असलेले एक घर शोधत होती. ती त्याच्या आत गेली व घंटी वाजवली. ती जवळजवळ तासभर त्या घरात होती. मला मूर्खासारखे वाटू लागले. ती तिथे असायची कितीतरी कारणे असू शकत होती. त्याचा एलीनॉरशी काही संबंध नसेलही. पण शेवटी ती बाहेर आली तेव्हा मी आश्चर्यचकित झाले.

चौकशीतील मिसेस थॉम्पसन तिला निरोप द्यायला बाहेर आलेली होती.

टॅक्सी माझ्या बाजूने जातांना, मी माझा बूट बांधायला खाली वाकले. मला नाही वाटत, की मार्गारेटने किंवा मिसेस थॉम्पसनने माझी गाडी पाहिली. मी तिच्या घराच्या पायऱ्या चढून गेले, तेव्हा ती अजून गाडी न्यायच्या मार्गात छताखाली बसलेली होती.

ती काळजी करण्यापेक्षा आश्चर्यचकित झालेली दिसली. ती आनंदाने बोलली, "मला आशा आहे, की तू काही विकायला आलेली नसणार."

मी बोलले, "मी काही विकत नाही आहे. मी तुमच्याशी बोलू शकते का?"

आता तिला संशय येऊन, ती म्हणाली, "कशाबद्दल?"

मी बोलले, "एका खुनाबद्दल. मला वाटते, हॅमॉन्ड केसच्या चौकशीच्या वेळी तुम्हाला माहिती असलेले, पण तुम्ही न सांगितलेले असे काही आहे."

तिचा लाजरा लाल रंग नाहीसा झाला. ती म्हणाली, "तो खून नव्हता."

"पुरावा --- मला त्याबद्दल सर्व माहिती आहे. तथापि, मला वाटते, तो खून होता. तो खून नसेल तर मिस हॅमॉन्ड इथे काय करत होती?

मी दिलेल्या साक्षीबद्दल आभार मानण्यासाठी, ती आली होती. कारण त्यामुळे त्या बिचारीने स्वतःला मारून घेतले, हे सिद्ध होणार होते.

"आणि मला वाटते, त्याबद्दल पैसे देण्यासाठी?"

ती रागाने लाजली. मला कुणी काही पैसे दिले नाहीत. आणि आता तुम्ही गेलात, तर बरे होईल. जर तुम्हाला असे वाटत असेल, की मी खोटे

बोलण्यासाठी कोणीही माझी फसवणूक करून माझे मन वळवेल, तर ते खरे नाही. एवढेच.”

तिने आत जाऊन फाडकन दार लावले. मी गाडी चालवत, शहराकडे निघाले. या सगळ्या प्रकरणात माझा गोंधळ उडाला होता. ती खरे बोलत होती.

या प्रकरणात डॉक्टरांना त्यांनी सांगितले त्यापेक्षा अधिक काही माहिती होते.

मला वाटत होते, की तिने चौकशीच्या वेळी न सांगितलेले असे काही होते?

त्या दिवशी मला दुपारच्या जेवणाला उशीर झाला. आई रागावली होती. ती बोलली, “मला कळत नाही तुला करायला काही नसतांना, तुला नेहमी जेवायला उशीर का होतो?

मी म्हणाले, “आई, मला करायला खूप काही असते. मी एलीनॉरच्या खुनासंबंधी तपास करते आहे. ती बायकी पद्धतीने किंचाळली, “खून? असे कोण करेल?”

“कदाचित मार्गारिट. ती एलीनॉरला नेहमी विरोध करत असे.”

आई पोपच्या थाटात म्हणाली, “मार्गारिटच्या वयाची बाई गुन्हा करणार नाही. खरे तर लुईसा, तुला काय झाले आहे, मला माहिती नाही. तुझ्या मैत्रिणीबद्दल संशय घेणे --- “

“ती काही माझी मैत्रीण नव्हती. एलीनॉर होती.”

“म्हणजे तू सर्व प्रकारची प्रकरणे ढवळून काढणार आहेस. खरोखर खून! लुईसा, मी तुला तंबी देते, जर तू या मूर्ख कल्पना उराशी बाळगून बसलीस, तर तुझे नाव वर्तमानपत्रात झळकू लागेल आणि मी तुला पैसे देणे बंद करेन.”

या गंभीर धमकीनंतर, ती गेली आणि मी माझी दुपार नवल करण्यात घालवली, की डॉक्टर बर्कले आणि मिसेस थॉम्पसन यांना एलीनॉरच्या केशरचना करणारीबद्दल खरे तर, संशय येतो आहे.

तिची केशरचना करणारी मुलगी मला काही माहिती नसलेले सांगत होती. "मी इथे तिच्यासाठी थांबले होते. ती वेळेच्या बाबतीत अगदी काटेकोर होती. पण अर्थातच ती आली नाही आणि --- "

"म्हणजे ज्या दिवशी हे सर्व झाले, तेव्हा तू तिची अपेक्षा करत होतीस?"

तिने कबूल केले, "हो, बरोबर. चार वाजताची वेळ ठरली होती. जेव्हा मला परतीच्या रस्त्यावर वर्तमानपत्र मिळाले, तेव्हा माझा विश्वासच बसेना. ती नेहमी इतकी आनंदी असे. गेले काही आठवडे मात्र ती तितकी आनंदी नव्हती, पण --- "

मी विचारले, 'तिच्यातील हा बदल तुझ्या केव्हा लक्षात आला?

"मला वाटते, इस्टरच्या सुमारास. मला आठवते, मला तिची नवीन टोपी आवडली होती. तिने मला ती तिथल्या तिथे देऊन टाकली. ती काही मजेशीरही बोलली. ती म्हणाली, कधीकधी नवीन टोपी धोकादायक असते."

मी दुकानातून निघाले, पण माझे मन अस्वस्थ होते. नवीन टोपी धोकादायक का असते? आणि इस्टरपासून एलीनॉर का बदलली?"

त्या संध्याकाळी फ्रेडने आमच्याबरोबर जेवण घेतले. निदान तो आमच्याबरोबर टेबलाशी बसला आणि काट्याने अन्न चिवडले. मार्गारेट आली नव्हती. तो म्हणाला की तिचे डोके दुखत असल्याने ती झोपून आहे. तो बराच वेळ एलीनॉरबद्दल बोलला.

ते भीती उत्पन्न करणारे होते. आईसुद्धा दुःखी दिसत होती.

ती म्हणाली, “फ्रेड, तू काहीतरी खायला पाहिजेस. जे वाईट झाले, ते विसरून जा. तू तिला खूप सुखी केलेस, हे नेहमी लक्षात ठेव.”

मी त्याला विचारले, “एलीनॉर इस्टरपासून थोडी नाराज असायचे काही कारण होते का?” त्याने माझ्याकडे रोखून पाहिले.

“मला तरी काही आठवत नाही. फक्त तेव्हापासून ती त्या मूर्ख मनोविश्लेषणतज्ज्ञाकडे जाऊ लागली.”

आईने चौकशी केली, “फ्रेड, ती त्याच्याकडे का जाऊ लागली?

“तिला जर काही वर्तनसमस्या असतील, तर मला तरी त्याबद्दल काही माहिती नव्हते.”

यात काही टोचेल असा शेरा असला, तरी त्याबद्दल तो अनभिज्ञ होता. तो बोलला, “तुम्ही त्याला पाहिले आहे का. तो दिसायला खूप चांगला आहे. तिला त्याच्याकडे बघायला कदाचित आवडत असेल. सारखे माझ्याकडे बघण्यापासून तिला थोडा बदल मिळत असेल.”

त्यानंतर लगेच तो घरी गेला. त्याने जरी स्वतःचा बचाव करायचा प्रयत्न केला, तरी डॉक्टरांच्या चांगले दिसण्याबद्दल व एलीनॉरने त्याच्याकडे जाण्याबद्दल खरे तर तो मनात खार खाऊन होता. तो त्याच्या मनात तिच्याबद्दल संरक्षक भिंत तयार करत असल्याचे, मला नवल वाटले. त्याची दुःखमय हानी कमी करण्यासाठी, तो तिला ती पूर्णपणे चांगली समजत नसल्याचे आठवत होता.

मला नीट झोप लागली नाही. त्यामुळे दुसऱ्या दिवशी न्याहारीला मला उशीर झाला. आईने वर्तमानपत्र वाचून संपवल्यावर ते मी घेतले.

मागील पान काढल्यावर तिथे काल रात्री मिसेस थॉम्पसनला मारण्याचा प्रयत्न केला गेल्याची बातमी होती.

मी ती वाचली आणि परत वाचली. ती मेली नव्हती, पण मरणांतिक आजारी होती. पोलिसांना तिच्या कुटुंबाकडून समजले, ते असेः – ती एकटी पुढे गाडी आत आणायच्या छप्पर असलेल्या भागात बसली असतांना हे झाले. कोणीही पिस्तुलातील गोळी मारल्याचा आवाज ऐकला नाही. तिचा नवरा सभेहून अकरा वाजता आला, तेव्हा त्याला ती जखमी अवस्थेत दिसली. ती बेशुद्ध होती आणि दवाखान्यात असे कळले, की तिच्याबद्दल काही विधान करायला ती फारच वाईट अवस्थेत होती.

म्हणजे त्या बिचारीला काहीतरी धोकादायक असे माहिती असणार. चार्ल्स रस्त्यावरील तिच्या घराच्या पायऱ्या चढून आत जातांना मी मार्गारिटला पाहिले असल्याचे मला आठवले. मार्गारिट रस्त्यात एलीनॉरची लिपस्टिक शोधत असल्याचेही मी पाहिले होते. एलीनॉरचा द्वेष करणारी आणि आता म्हाताऱ्या जो हॅमॉन्डचे चित्र व एलीनॉरचे रेशमी कपडे ताब्यात असलेल्या, असलेल्या फ्रेडकडे रहाणारी, मार्गारिट! मला अचानक आठवले --- अनेक वर्षे फ्रेडच्या टेबलाच्या खणात असलेले स्वयंचलीत पिस्तुल --- त्यामुळे मी शेवटी ठरवले. तसेही मी दुपारी आमच्या गावातील स्थानिक पोलीस स्टेशनला गेले आणि तिथे उंच टेबलाशी बसलेल्या माणसाला सांगितले, की मला येथील मुख्य अधिकाऱ्याला

भेटायचे आहे. तो माणूस माझ्याकडे दुर्लक्ष करत म्हणाला, “ते कामात व्यग्र आहेत.”

मी बोलले, “ठीक आहे. जर ते एका खुनाच्या केसकडे बघण्यासाठी फार व्यग्र असतील, तर मी शहरातील, तुमच्या वरील पोलीसस्टेशनला जाते.”

“कुणाचा खून झाला आहे?”

“मी ते त्यांना सांगेन.”

तिथून एक ऑफिसर चालला होता आणि त्या माणसाने त्याला हाक मारली.

“ही तरुण बाई खुनासंबंधी काही बोलते आहे. कॅप्टन कामात आहेत का, जरा बघा.”

कॅप्टन कामात नव्हता, पण त्याला मी सांगणार असलेल्या कशातही रस नव्हता. हे एलीनॉर हॅमॉन्डसंबंधी असल्याचे मी सांगितले. तो म्हणाला की ती केस बंद केली आहे आणि तसेही ती या जिल्ह्यातील नाही. मिसेस थॉम्पसनदेखील या जिल्ह्यातील नाही आणि तो काही विचार करू शकत नाही किंवा मी प्रसिद्धीसाठी हे करते आहे, असा त्याचा ग्रह झाला. शेवटी मी हार मानली.

मी बाहेर पडतांना तो माणूस त्याचे मनोरंजन झाल्यासारखा हसला. त्याने विचारले, “तुम्हाला प्रेते बघायची आहेत का?”

मी त्याला कटूपणे म्हणाले, “मी तुला काही मेलेला कुत्रा दाखवायला सांगितले नाही.”

पण शेवटी निकाल लागला. काय करावे, या विचारात मी दुपारभर गाडीने चक्कर मारत बसले. मी घरी आले, तेव्हा आई हॉलमध्ये होती.

ती किंचाळत बोलली, “तुझ्यासाठी इथे एक पोलीस/ गुप्तहेर आला आहे. तू काय केले आहेस?”

मी म्हणाले, “मी काही केलेले नाही. हे एलीनॉरसंबंधी आहे. आई, मला त्या माणसाला एकटीने भेटायचे आहे.”

ती चिडून म्हणाली, “मला वाटते, तू वेडी झाली आहेस. ते सर्व संपले आहे. एलीनॉर काही त्रासात सापडली आणि तिने आत्महत्या केली. ती नेहमी काही त्रास ओढवून घेणारी होती. तू पहिली ही गोष्ट जाणून घे, की तू पकडली जाशील.”

ती माझ्यामागोमाग उठाबसायच्या खोलीत आली. मी त्या गुप्तहेराशी बोलणार, त्याच्या आधीच ती त्याला म्हणाली, की गेले काही दिवस मी विचित्र वागते आहे आणि ती मला डॉक्टरकडे घेऊन जाणार आहे.

तो गुप्तहेर म्हणाला, “आपण त्याना बोलू दिले तर --- तर मिस बारिंग, खुनाबद्दल तुम्हाला काय सांगायचे आहे?”

मी त्याला म्हणाले, “एलीनॉर आणि लिपस्टिकबद्दल मला बोलायचे आहे. ती फूटपाथवर मरून पडल्यावर काही वेळातच तिची केशरचनाकर्तीशी भेट ठरलेली होती. माझी खात्री आहे की, मिसेस थॉम्पसनला याबद्दल काही माहिती आहे आणि तिने ती तिच्या जबानीत सांगितलेली नाही.”

“माला वाटते तुम्हाला असे म्हणायचे आहे, की मिसेस हॅमॉन्डने स्वतःला मारून घेतले नाही. असेच आहे ना?”

मी विचारले, "तुम्हाला असे काही सापडले आहे का?"

"पण हे कुणी केले?"

"मला वाटते, तिच्या नवऱ्याच्या बहीणीने."

हे ऐकून आई अवाक झाली. ती असे सांगत उठली, की मला काही झटका आला आहे.

पण तो गुप्तहेर हलला नाही. तो आवाज चढवत म्हणाला, "त्यांना बोलू दे. ही कोण बाई आहे?"

मी बोलले, "ती बाई मला काल डॉक्टर बर्कले यांच्या दवाखान्यात भेटली. ती खात्रीने सांगत होती, की एलीनॉर खिडकीतून खाली पडली. तुम्हाला हे कदाचित मूर्खपणाचे वाटेल, पण तिला लिपस्टीकबद्दल माहिती आहे. तिने ती रस्त्यात सापडते का, ते बघितले.

मला वाटते, एलीनॉर पडून मेली, त्या दिवशी ती तिथे डॉक्टर बर्कले यांच्या दवाखान्यात होती. मला वाटते मिसेस थॉम्पसनला याबद्दल काही माहिती आहे. आणि मला वाटते, मार्गारिट हॅमॉन्डने एलीनॉरला मारले."

तो कडकपणे म्हणाला, "मारले? हीच ती चार्ल्स रस्त्यावरील बाई का?"

"हो."

त्याने मला स्थिर नजरेने न्याहाळले. "मिसेस हॅमॉन्डने तिला मारले, असे तुम्हाला का वाटते?"

"कारण काल सकाळी ती मिसेस थॉम्पसनशी बोलायला तिच्या घरी गेली व मी तिच्या मागोमाग गेले."

पुन्हा आईने सुरु केले. तिला मी अशी का वागते आहे, तेच समजेना. “काल रात्री मार्गारेट डोके दुखत असल्याने आजारी होती. याची शहानिशा तुम्हाला सहज करता येईल. नोकर --- “

गुप्तहेर शांतपणे थांबला आणि मग उठला. तो म्हणाला, “मिस बारिंग, मी तुम्हाला असे सांगेन, “तुम्ही हे आमच्यावर सोडा. जर तुमचे बरोबर असेल, आणि खून झाला असेल, तर ते आमचे काम आहे.”

त्या दुपारी आई झोपायला गेली आणि मी फोनपाशी थांबले. जेव्हा शेवटी गुप्तहेराने मला फोन केला, तेव्हा मी पूर्वी जिथे होते, तिथेच ती बातमी मला घेऊन गेली. मिसेस थॉम्पसन शुद्धीवर आली व तिने जबानी दिली. एलीनॉरला कुणी व का मारले, हे तिला माहिती नव्हते, पण तिने आग्रहपूर्वक सांगितले, की मार्गारेट फक्त तिने दिलेल्या साक्षीबद्दल तिचे आभार मानायला आली होती, ज्यावरून असे सिद्ध झाले, की एलीनॉर खिडकीतून पडली किंवा तिने उडी मारली. तिने काही पैसे मागितले नाहीत किंवा तिला दिलेही गेले नाहीत.

पण अजून काही होते. असे दिसत होते, की मिसेस थॉम्पसनला चौकशीपासून काळजी वाटत होती व तिने मार्गारेटला फोन करून विचारले होते, की तिला काळजी वाटत होती ती महत्वाची होती का. खरे तर ती तिथे असतांना, डॉक्टरांच्या बाहेरील हॉलमध्ये कुणी शिरले होते.

गुप्तहेर बोलला, “हे अगदी नैसर्गिक होते. पोस्टमनसारख्या माणसाला आल्यागेल्याचे कुणी मुद्दाम बघत नाही.”

मी कमकुवतपणे म्हणाले, “पोस्टमन?”

“बरोबर. मी त्याच्याशी बोललो. त्याने मिसेस हॅमॉन्डला त्या सकाळी तिथे पाहिले. त्याला ते आठवते. तिच्या डोक्यावर टोपी नव्हती आणि ती एक मासिक वाचत होती.”

“त्याने मिसेस थॉम्पसनला पाहिले का?”

“त्याने तिला पाहिले नाही. पण तिने त्याला पाहिले.”

“म्हणून त्याने तिला काल रात्री गोळी मारली!”

गुप्तहेर हसला. “काल रात्री तो त्याच्या कुटुंबाबरोबर सिनेमा बघायला गेला होता आणि हे लक्षात ठेवा. मिस बारिंग, ती गोळी कदाचित एक अपघात असू शकेल. आता पूर्वीपेक्षा जास्त लोक पिस्तुल बाळगतात.”

हे सर्व निरोप घेणारे ठरले. एलीनॉरने आत्महत्या केली. मिसेस थॉम्पसनला सराव करतांना कुणीतरी अजाणता गोळी मारली. फक्त माझा यावर विश्वास नव्हता. त्या रात्री डॉक्टर बर्कले मला भेटायला आल्यावर, तर माझा विश्वास नाहीच बसला. आई अजून झोपली होती आणि मला भेटायला तयार नव्हती. मी रेडिओ ऐकत होते. तेव्हा एक नोकराणी त्यांना आत घेऊन आली.

ते बोलले, “मी असा अचानक आलो म्हणून मला माफ करा. पण मी तुमचा जास्त वेळ घेणार नाही.”

“म्हणजे हे व्यावसायिक काम दिसत नाही?”

त्यांना आश्चर्य वाटलेले दिसले. “नक्कीच नाही. का?”

मी जरा रागाने म्हणाले, “माझ्या आईला वाटते आहे, की माझे डोके फिरले आहे. एलीनॉर हॅमॉन्ड मेली आहे. तेव्हा तिला खोटे बोलू दे. मिसेस

थॉम्पसनवर गोळी चालवली गेली, पण त्याचे काय मोठे? वर्तमानपत्रे आठवा. कुटुंबाचे आडनाव आठवा. कृपया, असे समजा, की काहीही प्रकरण नाही!"

डॉक्टर म्हणाले, "तुमची तब्येत बरी नाही. तुम्ही झोपलात, तर कसे? मी तुमच्याशी नंतर बोलतो."

मी रागाने/ द्वेषाने बोलले, "म्हणजे मी झोपायला जाऊ? ते चांगले आणि सोपे ठरेल, नाही का? कोणीतरी खून करून लांब पळत आहे. कदाचित दोन खून आणि प्रत्येकजण माझी मुस्कटदाबी करतो आहे. पोलीससुद्धा!"

पोलिसाच्या नावाने त्याला हलवले. "तुम्ही पोलिसांकडे गेला होतात?"

"का नाही? पोलिसांना हे का सांगू नये? कारण तुम्हाला तुमच्या दवाखान्याच्या हॉलच्या खिडकीतून कुणाला बाहेर ढकलले गेले याचा बभ्रा व्हायला नको आहे --- म्हणून?

डॉक्टर चिडले. पण त्यांनी स्वतःला शांत ठेवण्याचा प्रयत्न केला. ते बोलले, "हे बघा, तुम्ही तुम्हाला न समजणाऱ्या गोष्टीत नाक खुपसत आहात. तुम्ही या केसचा विचार सोडून का देत नाही?"

मी रागाने धुमसत म्हणाले, "मी बनवली म्हणून ही केस तयार झाली आहे आणि सगळे मलाच त्यातून घालवायला का टपले आहेत? तुम्ही स्वतःच कशावरून हे केले नाहीत, हे मला कसे कळणार? तुम्ही केलेही असेल. तुम्ही किंवा पोस्टमन. आणि तो म्हणे सिनेमाला गेला होता!" ते माझ्याकडे टक लाऊन बघत उद्गारले, "पोस्टमन! पोस्टमन म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?

त्याचा नवल वाटलेला चेहरा बघून मला हसू आवरेना. मी हसत सुटले. मग मी रडतही होते. तेदेखील मी थोपवू शकत नव्हते. एकाएकी त्यांनी माझ्या थोबाडीत मारली.

त्यामुळे माझे डोके गरकन वळले. मी थांबले. ते म्हणाले, “काय ही मुलगी आहे! पुढच्या मिनिटाला तुझे शेजारी येतील. तू मुकाट्याने झोपायला जा. मी औषधाच्या दुकानातून तुझ्यासाठी काही झोपेचे औषध पाठवतो.”

“तुम्ही काही पाठवलेत, तरी मी ते अजिबात घेणार नाही.”

त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. तो बोलला, “विश्वास ठेव अगर ठेऊ नकोस. मी इथे तुझ्यावर हल्ला करायला आलेलो नाही. मी तुला हे सांगायला आलो होतो, की मी तुला परत सांगेपर्यंत रात्रीची एकटी बाहेर जाऊ नको. मी हे खरेच मनापासून सांगतो आहे. मिस बारिंग, या घरातून रात्री बाहेर जाऊ नका.”

मी अजूनही धुमसत होते. “मला काहीही करायला सांगू नका. मी रात्री का बाहेर जायचे नाही?”

तो थोडक्यात बोलला, ‘कारण ते धोकादायक आहे. मी तुम्हाला विशेष करून असे सांगेन, की हॅमॉन्ड घरापासून लांब रहा.”

त्याने जातांना दार जोराने आपटले. पुढचा अर्धा तास मी त्याच्यावर गरळ ओकत होते. मार्गारिटचा फोन वाजला तेव्हाही मी अजून रागावलेलीच होते.

ती म्हणाली, “आज रात्री आपल्याकडे पोलीस येणार आहेत, त्याबद्दल तुझे आभार. तू आम्हाला एकटे का सोडत नाहीस? आधीच आम्ही त्रासलेलो आहोत. त्यात तू आणखी आमचा त्रास का वाढवते आहेस?”

“ठीक आहे. आता मी तुला एक गोष्ट विचारते. काल सकाळी तू मिसेस थॉम्पसनच्या घरी का गेली होतीस? आणि काल रात्री तिच्यावर गोळी कुणी झाडली?”

तिने अवाक होऊन फोन लटकवत ठेवला.

नंतर अर्ध्या तासाने औषधाच्या दुकानातून मला झोपेचे औषध मिळाले. मी ते स्वयंपाकघरात नेऊन, फेकून दिले आणि ॲनीने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. मला आठवले, ती आईसाठी दूध गरम करत होती. ती मला म्हणाली होती, की हॅमॉन्ड यांची स्वयंपाकीण क्लारा, काम सोडून गेली.

तिने खबर दिली, “तिथे विचित्र गोष्टी घडत आहेत. काल कुणीतरी भट्टी चालू केली आणि घर इतके तापले की त्या घरात बसवेना.”

मी फार लक्ष दिले नाही. पण मला धक्का बसला होता. मग मी पाहिले, फ्रेड स्वयंपाकघराच्या छपराशी उभा होता आणि ॲनी त्याच्याकडे बघत होती.

त्याने विचारले, “मी आत येऊ का? मी फिरत होतो आणि मी इथे उजेड पाहिला.”

मला तो बरा दिसत होता. तो म्हणाला, मार्गारिट अजून झोपून आहे आणि घर एकाकी आहे.”

मग त्याने विचारले, की ॲनी त्याच्यासाठी एक कप कॉफी करू शकेल का. तो म्हणाला, “तसेही, मी फार झोपत नाही. मला अजून सावरायला वेळ लागतो आहे. आणि घर फार गरम आहे. मी बरीच बिनकामाची कागदपत्रे जाळून टाकली.”

मग मला भट्टीचे कारण कळले.

तो गेला, तेव्हा मी त्याच्याबरोबर चालत त्याला पोचवायला गेले व तो घरी जायला लागल्यावर त्याला बघत राहिले. मग मी गाडी आत आणायच्या रस्त्यावर परत वळले. मी घराजवळ आल्यावर ते झाले. मला झुडुपे सळसळल्याचा आवाज आला पण मला पिस्तुलातील गोळीचा आवाज आला नाही. माझ्या डोक्याला मार लागला. मी पडले आणि नंतरचे आईचा आवाज ऐकेपर्यंतचे मला काही आठवत नाही. मी डोक्याला पट्टी बांधलेल्या अवस्थेत माझ्या पलंगावर पडले होते. डोके दुखून, मला गुंगी येत होती.

आई म्हणत होती, ‘‘त्याने तुला सांगितले होते, की रात्रीची बाहेर जाऊ नकोस, तरी --- ‘‘

एक पुरुषी आवाज बोलला, ‘‘मी माझ्याकडून शर्थ केली पण तुमची मुलगी फार हट्टी आहे.’’

ते डॉक्टर बर्कले होते. ते पलंगाशेजारी उभे होते. मला बोललेले आठवले, ‘‘तुम्ही माझ्या थोबाडीत मारली आहे.’’

ते बोलले, ‘‘त्याने बरेच चांगले झाले. आता बघा मी काय सांगत होतो, ते तुम्हाला पटेल.’’

आता मला ते स्पष्टपणे विचित्र दिसत होते. त्यांचा एक डोळा जवळजवळ बंद होता आणि कॉलर चुरगळून तिचा बोळा झाला होता. मी त्यांच्याकडे निरखून बघत राहिले. मी विचारले, ‘‘मला काय झाले?’’

‘‘तू हवेत उडत होतीस.’’

“जवळपास. आणि माझ्या कपाळावर हे काय आहे?”

“माझे न ऐकल्यामुळे, हे झाले आहे.”

मग मला आठवू लागले --- झुडुपांमधील सळसळ आणि मला खाली पाडणारे काही.

ते पुढे आले व माझी नाडी बघितली. “तुमच्या डोक्याच्या कडेला गोळी चाटून गेली आहे. त्यामुळे मला तुमचे त्या बाजूचे केस कापावे लागले आहेत.” मला वाटते मी यावर दुःख प्रकट केले असावे. कारण नाडी बघतांना, त्यांनी माझा हात हातात घेतला. “त्याची काही काळजी करू नका. ते छान केस होते. पण ते परत उगवतील. तुम्ही जगलात, हेच देवाचे विशेष आभार म्हणावे लागतील.”

“मला गोळी कोणी मारली?”

ते म्हणाले, “अर्थात पोस्टमनने.” मला भयंकर राग आला.

त्यानंतर मी झोपले. मला वाटते त्यांनी मला काही औषध दिले असावे. सकाळी मी बाकीची गोष्ट ऐकली. आईने डॉक्टर बर्कलेंना बोलावले होते आणि तिने माझा सर्वात चांगला रेशमी रग माझ्या अंथरुणावर घालेपर्यंत त्यांना मला तपासून दिले नव्हते. त्यानंतरही हातातील आरशात डोक्याला पट्टी बांधलेली व कातडी पिवळसर करडी पडलेली मी, भयंकर दिसत होते. डॉक्टरांना त्याचे काही पडले नव्हते. ते हसत हसत आत आले. त्यांचा उजवा डोळा पूर्णपणे बंद होता. ते मला म्हणाले, मी कमालीची रागीट दिसते आहे.

मी म्हणाले, “तुम्ही पण काही नेहमीसारखे चांगले दिसत नाही.”

त्यांनी निरीक्षण केले व काळजीपूर्वक स्वतःच्या डोळ्याला स्पर्श करत बोलले, “ओहो, अस्स! काल रात्री तुमच्या आईने लोणी लावलेली चांदीची सुरी माझ्या डोळ्यावर ठेवली होती. [गावठी उपाय] तुमच्या आईची कमाल आहे!”

ते म्हणाले, ते रात्रभर पोलीसांबरोबर व्यग्र होते, त्यामुळे तिने त्यांना त्यांच्या अवताराबद्दल माफ केले पाहिजे. ते गेले व तोंड धुतले.

मी आक्रमक होत बोलले, “मला काय चालले आहे, हे सांगितल्याशिवाय तुम्ही या खोलीबाहेर जात नाही आहात. मला निव्वळ त्रास झाल्याने, आता ताप आला आहे.”

त्यांनी त्यांचा मोठा हात माझ्या कपाळावर ठेवला. ते म्हणाले, “ताप नाही. तुमचे गुप्तहेराचे मन भरकटत आहे. ठीक आहे. मी कुठून सुरवात करू?”

“पोस्टमनपासून.”

त्यामुळे नंतर त्यांनी मला सांगितले. वसंत ऋतुत एलीनॉर त्यांच्याकडे एक विचित्र गोष्ट सांगत आली. ती म्हणाली, तिचा पाठलाग केला जातो आहे. त्यामुळे ती उदास होऊन, खरे तर घाबरली होती. असे दिसत होते, की तिचा पाठलाग करणारा मनुष्य पोस्टमनचा गणवेष घालत होता. कदाचित ती एखाद्या ठिकाणी तिच्या मित्राबरोबर जेवत असेल, तर तो खिडकीबाहेर थांबलेला असे. कुठल्याही जागी तो एकदम अवतीर्ण होई. हे काही वेगळेच वाटे. पण ती शपथेवर हे खरे असल्याचे सांगे.

मला पुसट असे काही समजू लागले. मिसेस थॉम्पसनला तुमच्या दवाखान्याच्या हॉलमध्ये दिसलेला तोच तो मनुष्य का?”

तिने आधीच त्याला ओळखले आहे. खरा पत्र आणणारा तिथे आधीच हजर होता. त्याने मिसेस हॅमॉन्डला मासिक वाचतांना पाहिले होते. तो तिथे मिसेस थॉम्पसन येण्यापूर्वीच पोचला होता.

तिने ज्याला पाहिले, त्याने एलीनॉरला मारले.”

त्यांनी हे सांगण्यापूर्वीच मला माहिती होते. मला आजारी असल्यासारखे वाटू लागले. “तो फ्रेड होता, नाही का?”

“तो फ्रेड हॅमॉन्ड होता. हो.” डॉक्टर बर्कलेंनी जवळ येऊन माझा हात हातात घेतला. “प्रिय मुली, नशीब खडतर आहे. मला याबद्दल काळजी होती. मी एलीनॉरला तिथून घालवायचा प्रयत्न केला. पण ती जाईना. मग तिने त्यावर शेंदरी A असलेला मेजवानीच्या वेळचा ड्रेस घातला. मला वाटते, त्याने तो खलास झाला.”

मी जोराने श्वास घेत म्हणाले, “हे विचित्र आहे. तो तिचे कौतुक करत असे.”

“त्याला तिचे वेड होते. तो तिच्यावर प्रेम करे, हो. पण त्याला भीती वाटे, की ती त्याला कदाचित दुरावेल. तो फार रानटीपणे तिचा हेवा करे.”

“पण तो तिच्यावर खरे प्रेम करत असता --- “

प्रेम आणि हेवा यातील सीमारेषा अगदी पुसट असते. त्याला असे वाटले असण्याची शक्यता आहे, की ती कधीच खरे तर त्याची --- जोपर्यंत ती --- इतर कुणी तिला पटकावत नाही.”

“म्हणून त्याने तिला मारले?

डॉक्टर बर्कले सावकाश बोलले, “त्याने तिला मारले. त्याला माहिती होते, की पोस्टमनची कुणी दखल घेणार नाही. त्यामुळे तो माझ्या दवाखान्यात आला आणि --- “

मी म्हणाले, “पण तो मानसिक रुग्ण होता. तुम्ही त्याला मारू शकत नाही.”

डॉक्टर अडखळत म्हणाले, “कुणीही त्याला मारू शकत नव्हते. काल रात्री मला फार उशीर झाला. त्याने तुझ्यावर गोळी झाडतांना मी त्याला पकडले.

पण त्याने खरेच लढाई सुरु केली. तो कसा काय माहिती नाही, पण एकदम डोके फिरल्यासारखा झाला व त्याने स्वतःला गोळी झाडून, मारून घेतले.”

ते सावकाश गेले. ते म्हणाले, फ्रेडने हा गुन्हा केला, हे नक्की होते. मिसेस थॉम्पसनने पोस्टमन म्हणून त्याला तुमच्या दवाखान्याच्या हॉलमध्ये येतांना व परिचारिकेची किंकाळी ऐकण्यापूर्वी थोडा वेळ बाहेर पडतांना पाहिल्यामुळे, त्याचा फोटो ओळखला आहे. ज्या पिस्तुलातून गोळी झाडली गेली, ते फ्रेडचे होते. आणि मार्गारिट --- बिचारी मार्गारिट --- तिला त्याच्या वाईट मानसिक अवस्थेबद्दल बराच काळ शंका होती.

मिसेस थॉम्पसनवर गोळी झाडली गेल्याचे समजल्यावर, ती काल मला भेटायला आली होती. तिला तिच्या भावाला कुठल्यातरी संस्थेत दाखल करायचे होते. पण मी पोलिसांचा उल्लेख करताच, ती उद्दीपित झाली. मला वाटते, या केसमध्ये आता तसेही मिसेस थॉम्पसन जवळजवळ मरायला टेकल्यावर व गणवेष नाहीसा झाल्यावर, काही गूढ उरले नाही --- “

“गणवेष नाहीसा झाला? कसा काय?”

“त्याने तो भट्टीत जाळला. आम्हाला अर्धवट जळलेली काही बटणे काल मिळाली.”

मी विचारले, “त्याने मिसेस थॉम्पसनला मारायचा प्रयत्न का केला? तिला काय माहिती होते?”

“तिला पोस्टमनला माझ्या दवाखान्यात आलेले व गेलेले पाहिलेले आठवत होते. तिने त्याचे वर्णनही केले होते. मार्गारिटने पोस्टमनचा गणवेष माळ्यावर पाहिला होता. तिला ते माहिती होते.”

ती कोलमडली. ती फ्रेडला तोंड देऊ शकत नव्हती. तिने काय करावे, असा विचार करत, स्वतःला खोलीत कोंडून घेतले. पण ती त्या दिवशी मिसेस थॉम्पसनला भेटायला जात असल्याचे फ्रेडला सांगितले होते आणि कदाचित त्याला पोस्टमनचा गणवेष तिला सापडला असल्याची कुणकुण लागली असावी. खरे तर तिला व मलाही ते माहिती नव्हते. आम्हाला एवढेच माहिती होते, की त्या रात्री त्याने घर सोडले होते, गाडी काढली होती.

आणि त्याच्याविरुद्ध असलेल्या एकमेव साक्षीदाराला मारायचा प्रयत्न केला होता, अर्थात तुम्ही सोडून.”

मी बोलले, “मी सोडून!”

डॉक्टर कोरडेपणे परत बोलले, “तुम्ही सोडून. तुम्हाला आठवत असेल, मी तुम्हाला ताकीद दिली होती.”

"पण मला का? त्याला मी नेहमीच आवडत होते. त्याने मला ठार मारण्याचा प्रयत्न का करावा?"

कारण तू त्या प्रकरणात नको इतके लक्ष घातलेस. एलीनॉरचा खून झाला, असे तू म्हणायला लागल्या मिनिटापासून, तू मार्गारेटला फोन करून, ती मिसेस थॉम्पसनला भेटायला का गेली व तिला कुणी मारले, असे विचारल्यापासून, तू त्याच्या दृष्टीने धोकादायक झालीस."

"तुम्हाला असे वाटते का, की तो ते ऐकत होता?"

"मला माहिती आहे, तो ऐकत होता. तो त्याच्या बहिणीला घाबरत नव्हता. त्याला वाचवण्यासाठी तिने मरणही पत्करले असते, हे त्याला माहिती होते. पण इथे तू होतीस --- हातात बॉम्ब घेतलेली मुलगी. तुझे वागणे तसेच होते. तेव्हाच मार्गारेटने मला तुला ताकीद देण्यास सांगितले."

"मला माफ करा. मी कायम मूर्खपणा करत होते."

डॉक्टरांचे चांगले डोळे चकाकले. ते म्हणाले, "मी इतक्या टोकाला जाणार नाही. तुझा हट्टीपणामुळे खरे तर केसचा निकाल लागला. पण म्हणजे मला हट्टी मुली आवडतात, असे नाही."

मागील रात्री त्याला परत आणायला डॉक्टरला कठीण गेले. पण त्याने कबूल केले, की तो संध्याकाळपासून हॅमॉन्ड घरावर लक्ष ठेऊन होता.

"पण फ्रेड कॉफी पितांना शांत दिसत होता. तो जेव्हा आमच्या स्वयंपाकघराच्या बाहेर दाराशी आला, तेव्हा मी त्याला पोचवायला, त्याच्याबरोबर रस्त्यापर्यंत गेले."

हे सर्व पहिल्यांदा ठीक दिसत होते. फ्रेड त्याच्या घराकडे चालू लागला पण कुंपणामागून तो परत आला व रस्ता चुकला. पण त्याला घरी परत जायचे आहे, हे त्याला माहिती होते. त्याने त्याचे पिस्तुल काढून माझ्यावर रोखले. तेव्हाच तुम्ही त्याला अडवले.

अचानक मी रडू लागले. हे सर्व भयंकर होते. खिडकीत, तिच्यामागे फ्रेड, मिसेस थॉम्पसन दिवसभराच्या कामानंतर तिथे विश्रांती घेत असणे आणि फ्रेडने एलीनॉरला गोळी मारणे आणि मी ---

डॉक्टर बर्कलेंनी एक मळकट रुमाल काढला आणि माझे डोळे पुसले. ते म्हणाले. आता रडायचे थांबवा. तुम्ही एक शूर तरूणी आहात. लुईसा बारिंग.

तुमची कीर्ती तुम्ही घालवू नका. ते एकदम उठले. मी तुमची केस सोडून देतो. तुमचा डोक्याला मलमपट्टी करायला कोणीतरी येईल."

"तुम्ही का करत नाही?"

"मी त्या प्रकारचा डॉक्टर नाही."

मी त्यांच्याकडे पाहिले. ते ताणाने थकून गेले होते. ते मळले होते आणि मिनिटामिनिटाला त्यांचा डोळा काळा पडत होता. पण ते बळकट व मोठे होते. मी विचार केला, जरी ती तिची स्वप्ने त्याना उघड करून सांगू शकत नसली, तरी त्यांच्याबरोबरील स्त्री सुरक्षित असे.

मी म्हणाले, "तुम्ही माझ्याकडे का बघू शकत नाही, हे मला समजत नाही. जर मला टक्कल असते, तरी मी तुम्हाला माझ्याकडे बघायला लावले असते. शेवटी, हे तुम्हीच तर केले आहे."

ते तोंडभरून हसले. नंतर मला नवल वाटेल अशा तऱ्हेने ते खाली वाकले व माझ्या गालाचे ओझरते चुंबन घेतले. ते म्हणाले, “तुम्ही माझ्यासमोर ती लिपस्टिक फेकल्यापासून, मला हे करायचे होते. आणि आता तुम्ही हा गुप्तहेराचा आव सोडून, तुमच्या डोक्यावरील गेलेले कडेचे केस कसे उगवतील, याचा विचार करा. कारण मी इथे आसपास खूप वेळ असणार आहे.”

जेव्हा मी वर पाहिले, तेव्हा आई दारात चमकत उभी होती.

Rear window

by

Cornell Woolrich

# मागील खिडकी

मला त्यांची नावे माहिती नव्हती . मी कधी त्यांचे आवाज ऐकले नव्हते. कारण एवढ्या दूरवरून, त्यांचे चेहरे ओळखणे अवघडच होते. तरी मी त्यांच्या येण्याजाण्याचे वेळापत्रक, बनवू शकत होतो. त्यांच्या दिवसभरातील सवयी काय होत्या व ते काय काय करत, हे मी सांगू शकत होतो. ते माझ्या मागील खिडकीजवळ रहातात.

हे थोडेसे त्यांच्या खासगीपणावर आक्रमण करण्यासारखे होते. कदाचित हे लोकांच्या लैंगिक क्रिया वा कपडे बदलणे चोरून बघण्यासारखे वाईट होते. पण ती माझी चूक नव्हती. ती माझी कल्पना नव्हती. माझी कल्पना अशी होती, की

यावेळी माझ्या हालचाली फारच मर्यादित झाल्या आहेत. त्यामुळे मी फक्त खिडकीतून अंथरुणाकडे व अंथरुणाकडून खिडकीकडे जाऊ शकत असे, एवढेच.

माझ्या मागील झोपायच्या खोलीच्या खिडकीतील बसायच्या जागेतून उबदार हवा येत असे. त्यात काही अडथळा नव्हता. मला तिथे कीटक आत येऊन नयेत म्हणून, दिवा न लावता बसावे लागे. खूप व्यायाम करायच्या सवयीमुळे, मी झोपू शकत नसे. कंटाळा येऊ नये, म्हणून पुस्तके वाचायची सवय मला कधीच नव्हती. त्यामुळे मी तिकडे वळू शकत नव्हतो. तेव्हा मग मी काय करावे? तिथे बसून डोळे मिटून घ्यावेत का?"

काही करायचे म्हणून, खिडकीच्या चौकटीतून सरळ बघत बसे. मला एक नुकतेच लग्न झालेले तरुण, उदास जोडपे व तेरा ते एकोणीस अशी वये असलेली मुले दिसत. घरी राहून, ती एकदा मारली जाणार होती. ते कुठे जात असतील, तिथे जाण्यासाठी नेहमी इतक्या घाईत असत, की ते घरातील दिवे बंद करायला विसरत. मी पहात असल्यापासून, एकदाही दिवे मालवलेले मी पाहिले नाहीत.

पण ते नेहमीच विसरत, असे नाही. मी त्याला 'उशीराचे कृत्य', असे म्हणायला शिकलो होतो. तो रस्त्यातून नेहमी पाच मिनिटात वेड्यासारखा घाईघाईने परते व सर्व बटणे बंद करे. मग अंधारामुळे बाहेर येतांना कशावर तरी अडखळून पडे. त्यामुळे ते दोघे मला आतून हसू फुटायला लावत. त्यापुढील घरे खिडकीतून दिसायला थोडी आडबाजूला होती. त्यातील एका घरात विशिष्ट उजेड होता व तो रात्री बंद होत असे. त्याबद्दल सांगायचे म्हणजे, तो मला थोडासा दुःखी करत असे. मला वाटते, तिथे एक मूल असलेली तरुण विधवा रहात असे. मी

तिला मुलाला झोपवताना बघत असे. मग ती वाकून, पश्चात्तापदग्धतेने बाळाचा पापा घेत असे.

मग ती तिचा दिवा बंद करून, तिचे तोंड व डोळे रंगवत बसे. मग ती बाहेर जाई. जवळजवळ सर्व रात्र गेल्याशिवाय, ती परतून येत नसे. एकदा मी अजून जागा होतो आणि तिला तिच्या हातात डोके खुपसून स्तब्ध बसलेले पाहिले. त्या दृष्याने मला थोडे उदास केले.

तिसरी खिडकी काही दृष्य दाखवत नसे. ती मध्ययुगीन युद्धभूमीसारखी फक्त झरोक्यांसारखी उघडी असे व खरी जवळ नसून तशी असल्यासारखी दिसे. नंतर माझी नजर एका शेवटच्या घराकडे जात असे. ते घर इतरांच्या, माझ्यासुद्धा, काटकोनात असल्याने, तेथील दृष्य स्पष्ट दिसत असे. माझ्या मनातील पोकळी भरून काढायला ही घरे मदत करत. मी त्या घरात बघू शके. शेजारी बसायची सोय असलेल्या माझ्या खिडकीच्या बाहेर आलेल्या गोल भागातून मला मागील भिंत खरवडली गेलेले खेळघर साधारण त्याच आकाराचे दिसू शके.

ती एक चपटी इमारत होती. सगळ्यांपासून वेगळी अशी ती प्रथम बांधली गेली होती. तिथे सुसज्ज खोल्या पाडल्या गेल्या नव्हत्या. फरक दाखवायचा तर, तिथे नंतर दोन मजले वाढवले गेले व आग लागल्यास मागील बाजूला पळून जायची वाट केली गेली. पण ती खूप जुनी असल्याने विशेष फायद्यात नव्हती. ती आधुनिक करणे चालू होते.

काम चालू असतांना सगळी इमारत रिकामी करण्याऐवजी, ती एकेक सदनिका रिकामी करून आधुनिक करत होते, जेणेकरून मिळणाऱ्या भाड्याचे कमीत कमी नुकसान होईल. मागील वरच्या बाजूच्या सहा सदनिकांचे काम पूर्ण

झाल्याने, त्या भाड्याने घेण्यात रुची असलेल्या मंडळींना बघण्यासाठी त्यांच्या खिडक्या खुल्या होत्या. त्या सदनिका भाड्याने द्यायच्या होत्या. हातोडे मारणे व वाळूकाम यामुळे, सर्वांची शांती ढळवून, आता पाचव्या मजल्याचे काम चालू होते.

मला खालील सदनिकेत रहाणाऱ्यांची दया येई. ते त्यांच्या डोक्यावरील, तो गडबडगोंधळ कसा काय सहन करतात, याचे मला नवल वाटे. त्यातच भर म्हणजे त्या सदनिकेतील बाई फारच वाईट तब्येतीची होती. ती इकडून तिकडे जेमतेम हिंडे आणि कायम गाऊनमध्ये अवतारात असे. कधीकधी मी तिला खिडकीशी मान उंचावून, बसलेले पहात असे. ती डॉक्टरकडे का जात नसे, याचे मला नवल वाटे. पण कदाचित त्यांची तेवढी ऐपत नसेल.

त्याला काही काम नसे. नेहमी त्यांच्या झोपायच्या खोलीतील शेडवाला दिवा चालू असे आणि तो तिला बरे नसल्यासारखा, तिच्याशेजारी बसून असे. एका रात्री तर त्याला रात्रभर, पहाटेपर्यंत, बसावे लागले होते. मी सर्व वेळ काही बघत बसलो नव्हतो. जेव्हा शेवटी मी खुर्चीतून उठून अंथरुणाकडे गेलो, तेव्हा पहाटेचे तीन वाजले तरी, तेथील दिवा जळत होता. मी पहाटे परत खिडकीकडे आलो, तेव्हादेखील तो शेडवाला दिवा मंदपणे जळत होता.

काही वेळाने फटफटले, तेव्हा तो शेडच्या कडेने अचानक मंद झाला आणि जरा वेळाने, तो नव्हे तर दुसऱ्या एका खोलीतील बंद असलेला दिवा लागला. तिथे मी त्याला उभे राहून बाहेर बघतांना पाहिले.

त्याच्या हातात सिगरेट होती. मला दिसत नसले तरी, तो उदासीनतेने झटपट हाताला लहानसा धक्का देऊन, ती तोंडाजवळ नेत होता. मला वाटते,

तिच्या काळजीने, त्याच्या डोक्यात मानसिक गोंधळ चालू असल्याचे मी पाहिले. मी त्याबद्दल त्याला दोष दिला नाही. कुठलाही नवरा असाच झाला असता. रात्रभर त्रास सहन करून, तिचा नुकताच डोळा लागला असावा. नंतर फारतर तासभर तरी ती झोपली असावी. मग लाकूड तासण्याचे व बादल्यांचे आवाज सुरु झाले. माझा त्याच्याशी काही संबंध नव्हता, मी स्वतःशीच बोललो, 'त्याने खरे तर तिला तेथून बाहेर काढले पाहिजे. जर माझी बायको अशी आजारी असती - "

कदाचित खिडकीच्या तावदानापासून इंचभर अंतरावर, तो थोडा बाहेरच्या बाजूस वाकला होता व काळजीपूर्वक सगळ्या घरांच्या मागील बाजूची सीमारेषा असलेल्या त्याच्यासमोरील चौरसावर लक्ष केंद्रित करून, त्याच्यासमोरील घरांची मागील बाजू न्याहाळत होता. तुम्ही दुरूनदेखील सांगू शकला असता, की ती व्यक्ती केव्हा एकटक बघते आहे. तेव्हा डोके एका विशिष्ट कोनात ठेवलेले असे. पण बघताना असे आढळले, की तो एकाच जागी एकटक बघत नव्हता. त्याचे निरीक्षण हळूहळू होत होते व एकाच जागेचे होत नव्हते. माझ्या विरुद्ध बाजूंची घरे माझ्यापासून सुरवात करून तो नजरेखाली घालत होता. जेव्हा ती शेवटपर्यंत बघितली गेली, तेव्हा मला माहिती होते, की ती माझ्या अंगावरून पलीकडे जाणार व परत येणार. ती पहाणी व्यवस्थित व्हावी, म्हणून असे होण्यापूर्वी मी मनातल्या मनात अनेक यार्ड माझ्या खोलीत चाललो. मी तिथे बसून त्याच्या कामात अडथळा आणतो आहे, असे मला त्याला वाटून द्यायचे नव्हते. त्याच्या दृष्टीपासून निसटण्यासाठी माझ्या खोलीत पुरेसा निळा रात्रदिवा होता. एकदोन क्षणानंतर मी जेव्हा माझ्या नेहमीच्या स्थितीत खिडकीत बसलो, तेव्हा तो गेला. त्याच्याकडे दिव्यांच्या अजून दोन शेड होत्या. झोपायची खोली अजून काळोखीच होती. मला नवल वाटत होते, की त्याने त्याच्या सर्व

खिडक्यांना ठळकपणे विशिष्ट असा अर्धवर्तुळाकार का दिला होता. या वेळी तिथे त्यांच्यापैकी कुणी नव्हते. अर्थात, ते एवढे महत्वाचे नव्हते. ते थोडेसे विचित्र होते, एवढेच. त्याच्या बायकोसाठी तो काळजीत होता, यात ते मिसळले गेले नव्हते.

जेव्हा तुम्ही दुःखी असता किंवा काळजीत असता, तेव्हा ती मनाची विशिष्ट अवस्था असते. जेव्हा तुम्ही तुमच्या खिडकीच्या वक्राकार भागातून सतत आसपास कशाकडेच टक लाऊन बघत नसता, तेव्हा बाहेरील बाबी फसव्या असतात, तेव्हा तुम्हाला त्यात रुची वाटत नाही --- पण जेव्हा एखादा कमानीदार खिडकीतून आसपास निरखून बघत असतो, तेव्हा ती बाह्यरुची झाली. असा विरोधाभास कसा काय? असा महत्वाचा फरक लक्षात येणे हे माझ्यासारख्या रिकामटेकड्या माणसाच्या बाबतीत शक्य होते. पण असे समजणे, म्हणजे त्याचे महत्व वाढवणे आहे.

ती सदनिका त्यानंतर तिच्या खिडक्यांवरून निर्जीव राहील्यासारखी वाटत होती. तो बाहेर तरी गेला असेल किंवा झोपला असेल. तीन शेड सामान्य उंचीच्या होत्या आणि झोपायच्या खोलीतील, थोडी खाली होती. माझा दिवसाचा नोकर, सॅम अंडी आणि वर्तमानपत्र घेऊन लगेचच आला. मग माझा थोडा वेळ इकडेतिकडे गेला. मी दुसऱ्या लोकांच्या खिडक्यांकडे बघून निरखत बसणे थांबवले.

सकाळभर सूर्य पोकळ लंबवर्तुळाकारात तिरपा चमकत होता. मग तो दुसऱ्या बाजूला सरकला व मावळू लागला.

संध्याकाळ होऊ लागली. अजून एक दिवस संपला. आसपासचे दिवे लागू लागले. इकडेतिकडे भिंतीतून आवाज येऊ लागले. रेडिओचे कार्यक्रम फार

जोरात वाजू लागले. जर तुम्ही काळजीपूर्वक ऐकलेत, तर तुम्हाला लांबवर ताटल्यांचा एकमेकांवर घासल्याचा प्रासंगिक आवाज आला असता. लोकांच्या आयुष्याची सवयींची साखळी हळूहळू उलगडू लागली. ते त्यांच्यात्यांच्यात घट्ट बांधले गेले.

मानसिक रुग्णाला वा कैद्याला हाताला घट्ट बांधले जाणारे बळकट जाकीट कुठल्याही जेलरने शोधून काढले, तरी तो स्वतःला कायम मोकळाच समजत असतो. मोकळ्या जागी जाझ नाच सुरु झाला. तो बाहेर आला. त्यांना हाकलून, जोराने ओरडून काम करा, असे म्हणाला आणि ती जागा चांगले उजाडेपर्यंत व सकाळी अंधारमयच राहिली. त्या बाईने तिच्या मुलाला झोपवले, शोक करत, त्याला अंथरुणावर ठेवले आणि मोठ्या दुःखाने चेहऱ्याला रंगरंगोटी करायला बसली.

रस्त्याच्या आतील बाजूला काटकोनात असलेल्या चौथ्या मजल्यावरील सदनिकेत, तीन शेड तशाच होत्या आणि चौथी शेड दिवसभर पूर्ण प्रखरपणे जळत राहिली. मला ते जाणवले नाही कारण मी आतापर्यंत त्याकडे लक्ष देऊन बघत नव्हतो व त्याबद्दल विचारही करत नव्हतो. दिवसभरात कधीकधी त्या खिडक्यांवर माझी नजर पडलीही असेल, पण माझे विचार दुसरीकडे लागले होते. मागील शेवटच्या खोलीतील शेड जेव्हा अचानक उचलली गेली, तेव्हा उजेड वरही पडला. ते त्यांचे स्वयंपाकघर होते. मग दिवसभर तिथे कोणी गेले नाही. ते बघून माझ्या मनात दुसरेच काही घर करून राहिले. मी त्या बाईला दिवसाभरात पाहिले नाही. त्या खिडकीत जिवंतपणाची काही लक्षणे मी पाहिली नाहीत.

तो बाहेरून आला. स्वयंपाकघराच्या विरुद्ध बाजूने, खिडकीपासून

लांबून त्याने प्रवेश केला होता. त्याच्या डोक्यावर टोपी होती. त्यामुळे मला तो आताच बाहेरून आल्याचे समजले.

त्याने टोपी काढली नाही. जसे काही तिथे कुणी नसल्याने टोपी काढायची काही गरज नव्हती. उलट त्याने ती ढकलून, केसांच्या मुळातून हात फिरवत, डोक्याच्या मागे पाठीवर नेली. ती घाम पुसणारी हालचाल नव्हती. यामुळे काय होणार हे निश्चित नसल्याने, होणारा त्रास दर्शवला जात होता. शिवाय जर त्याला जास्त उकडत असते, तर त्याने सर्वप्रथम काय केले असते, तर त्याची टोपी पूर्णपणे काढली असती.

ती इतकी आजारी असणार, की तिला खालील शेडच्या मागील खोलीतील अंथरूण सोडता येत नव्हते. मी बघत होतो.

ती त्याची दखल घ्यायला बाहेर आली नाही. आपल्या सगळ्यांना जखडून ठेवणारा सवयीच्या साखळीचा पहिला दुवा मोडून गेला होता.

ती इतकी आजारी असणार, की तिला खालील शेडच्या खोलीत झोपवून, तो दोन खोल्या पलीकडे, होता व तिथेच बसून होता. तो आत जाऊन तिची चौकशी करेल, ही अपेक्षा नवलपूर्ण ठरली. नवल काही न समजणे ठरले. तो तिच्याकडे जात नव्हता किंवा निदान ती कशी आहे बघायलाही दारापर्यंत जात नव्हता, हे मला मजेशीर वाटले.

कदाचित ती झोपली असेल आणि त्याला तिला झोपून द्यायचे असेल. पण तिच्याकडे न बघताच त्याला कसे कळले, की ती झोपली आहे. नंतर लगेच, तो स्वतः आत आला. तो पुढे येऊन पहाटेसारखा खिडकीशी उभा राहिला. सॅमने माझा चहाचा पसारा थोड्या वेळापूर्वीच आवरला होता आणि दिवे मालवले होते.

मी जमिनीवर उभा राहिलो. खिडकीच्या अंधारात तो मला पाहू शकणार नाही, हे मला माहिती होते. तो तिथे स्तब्धपणे खूप वेळ उभा होता. आणि आता त्याचा दृष्टीकोन आतील कामासाठी सुयोग्य झाला. तो विचारात हरवून, तिथे खाली कशाकडेच न बघत उभा राहिला.

मी स्वतःशीच बोललो, ‘कुणाही माणसाला वाटेल, अशी त्याला तिची काळजी वाटली. हे जगात सहज घडणारे आहे. पण तिला तसे अंधारात ठेवणे व तिच्याजवळ न जाणे, जरा विचित्र वाटत होते. जर त्याला तिची काळजी वाटत होती, तर परतल्यापासून, तो तिच्याकडे निदान दृष्टीक्षेप तरी का टाकत नव्हता? हे आंतरिक भावनांची उद्युक्तता आणि बाह्यदिखावा यातील विरोधाभास होता. आणि मी जसा पहाटे मूळापासून विचार करत होतो, तसा मी परत करू लागलो. नवीन हुशारीने, त्याने डोके वर केले. मागील बाजूच्या खिडकीतून, प्रश्नार्थक नजरेने तो परत बाहेरील दृष्य पाहू लागला. हे खरे होते, की यावेळेस उजेड त्याच्या मागे होता व तो त्याच्यावर पुरेसा पडत होता. त्यामुळे मला सतत हलणारी त्याच्या डोक्याची बारीकसारीक दिशाही कळत होती. मी काळजीपूर्वक स्थिर राहिलो त्यामुळे माझी नजर दूरवर व्यवस्थित पोचू शकली. हालचाल आकर्षित करते.

तो इतर लोकांच्या खिडक्यांमध्ये एवढा रस का घेतो, मी दूरस्थपणे विचार करत होतो. अर्थात त्याच विचारावर फार घोटाळत रहाण्यावर अचानक परिणामकारक घाव बसला. बघ, कोण बोलते आहे. तुझे स्वतःचे काय?

एक महत्वाचा फरक माझ्याकडून निसटला. मला कशाचीच काळजी नव्हती. पण त्याला बहुधा होती.

परत शेड्स खाली आल्या. दिवे जळत राहिले व त्याच्या मागे वाळूच्या रंगाची अपारदर्शकता राहिली. पण त्या खाली राहीलेल्या एकामागे, खोली अंधारी राहिली. वेळ गेला. किती ते सांगणे कठीण आहे, पण --- पाऊण तास, वीस मिनिटे असेल. मागील अंगणात एक रातकिडा गुणगुणला. रात्रीसाठी घरी जाण्यापूर्वी सॅम मला काही हवे आहे का, हे बघायला आला. मी त्याला काही नको, असे सांगितले. सर्व काही ठीक चालले होते. तो मिनिटभर मान खाली घालून उभा राहिला.

जसे काही त्याला आवडले नसावे, अशा रितीने मी त्याला थोडेसे थरथरताना पाहिले. मी विचारले, “काय झाले?

“तुम्हाला माहिती आहे, त्याचा अर्थ काय? माझ्या म्हाताऱ्या ममीने मला सांगितले आणि ती माझ्याशी आयुष्यात कधीच खोटे बोलली नाही. असे घडण्यापासून कधीच चुकलेले नाही."

“काय, रातकिडा?”

कधीही तुम्ही जेव्हा रातकिड्याला गुणगुणतांना ऐकता, तेव्हा ती जवळपास कुठेतरी मरणाची खूण असते.”

मी हाताच्या मागील बाजूने त्याला गोंजारले. “ठीक आहे, पण आता ते तसे नाही. त्यामुळे काळजी करू नकोस.”

तो हट्टीपणे पुटपुटत राहिला, “ते कुठेतरी जवळच आहे. नक्कीच, फार लांब नाही.”

त्याने त्याच्या मागे दार लावले व मी काळोखात एकटाच उरलो.

ती पूर्वीपेक्षा फार उकाड्याची रात्र होती. मी बसत असे, त्या उघड्या खिडकीतूनही अगदी क्वचित हवा येत होती. मला नवल वाटत होते, ते माहिती नसलेले तेथील काही --- त्या ओढलेल्या शेडच्या मागे कसे काय उभे राहू शकत होते.

मग अचानक, माझ्या मनातील या बाबतीतील सर्व सुस्त विचार एका ठिकाणी स्थिर झाले. काही संशय तयार झाला. पुन्हा शेड्स वर आल्या आणि नेहमी सारख्या आकारहीनपणे फिरू लागल्या. कशावरही स्थिर होण्याचे त्या नाव घेईनात. तो मधल्या खिडकीत होता, उठाबसायच्या खोलीत. त्याने कोट व शर्ट काढून ठेवला होता. त्याच्या गंजीफ्रॉकमध्ये त्याचे हात उघडे होते. उकाडा त्याला सहन होत नव्हता, असे दिसत होते.

पहिल्यांदा तो काय करतो आहे, हे मला कळत नव्हते. तो लांबीपेक्षा, काटकोनात व वरखाली व्यग्र होता. तो एका जागी उभा होता, पण तो कितीही वेळाने, खाली जाऊन दिसेनासा होई व सरळ होऊन, परत दिसू लागे. हा एक प्रकारचा चांगल्या तब्येतीसाठीचा व्यायाम होता. फक्त उठणे व बसणे तो सारख्या अंतराने करत नव्हता. कधीकधी तो खाली जास्त वेळ बसे किंवा ओळीने दोन तीन वेळा भरभर बसे आणि अचानक उठे. खिडकीपासून दूर मोठ्या रुंदीचा व्ही आकाराचा दांडा होता. ते काही असले तरी माझ्या नजरेला त्या दांड्याच्या वरील बाजूला व खिडकीच्या तळाशी, चंदेरी असे काही दिसत होते. कदाचित त्याच्या गंजीफ्रॉकच्या इंचाच्या सोळावा भागावर पडून ते चमकत होते. पण दुसऱ्या कुठल्या वेळी मी ते पाहिले नव्हते आणि ते काय होते, ते मी सांगू शकत नव्हतो.

शेड्स वर गेल्यापासून पहिल्यांदाच, तो अचानक तिथून निघाला. बाहेर

आला. खोलीच्या दुसऱ्या भागात जाऊन वाकला. परत सरळ झाला. विविध रंगांची लांब टोकेरी बरीचशी निशाणे मी ज्या अंतरावर होतो, त्या अंतरावर धरली गेली होती. परत तो व्ही आकाराच्या दांड्यामागे गेला. क्षणभर त्याने ती त्यांच्या टोकांवर पडू दिली आणि ती तशीच राहून दिली. तो खाली जाऊन, दिसेनासा झाला आणि बराच वेळ त्याच अवस्थेत राहिला.

माझ्या नजरेसमोर, निशाणे रंग बदलत व्ही आकारावर फडकत राहिली. माझी दृष्टी चांगली आहे. एका क्षणी ते पांढरे असायचे, तर दुसऱ्या क्षणी लाल व्हायचे व तिसऱ्या क्षणी निळे व्हायचे.

मग मला समजले. ते एका बाईचे कपडे होते आणि तो एकेक करून, ते खाली ओढत होता. सर्वात वरचा कपडा तो पहिल्यांदा ओढे. अचानक ते सगळे गेले. व्हीचा दांडा पुन्हा काळा आणि उजाड झाला आणि त्याचे शरीर पुन्हा दिसू लागले. ते काय होते आणि तो काय करत होता, ते आता मला माहिती होते. कपड्यांनी मला ते सांगितले. त्याने माझ्यासाठी त्याची खात्री केली. त्याने व्हीच्या शेवटापर्यंत त्याचे हात पसरले. जणू अंगातील रग जिरवत असल्याप्रमाणे, मी त्याला उठतांना, पडतांना व धक्का बसून हलतांना पाहिले. अचानक व्ही दुमडला जाऊन, त्याचा घनाकृती ठोकळा झाला. मग त्याने त्याच्या वरच्या पूर्ण अंगाने घसरायची हालचाल सुरु केली. मग एका बाजूची घनाकृती मोडली.

तो उभ्या ट्रंकमध्ये त्याच्या बायकोचे सामान भरत होता. तो परत स्वयंपाकघराच्या खिडकीत आला. क्षणभर स्तब्ध उभा राहिला. मी त्याला त्याचा हात खूप वेळा कपाळावर फिरवतांना व मग हवेत उडवताना पाहिले. मग तो भिंतीशी गेला आणि काहीतरी खाली काढले. एक कपाट व बाटली दिसल्याने,

माझ्या कल्पनाशक्तीला तो स्वयंपाकघरात असल्याचे, समजले.

मग मी त्याला दोनतीन वेळा त्याचा हात त्याच्या तोंडावरून फिरवतांना पाहिले. मी सहनशीलतेने म्हटले, "दहापैकी नऊ लोक ट्रंक भरल्यावर हेच करतात --- व एखादे कडक पेय घेतात आणि जर दहाव्याने असे केले नाही, तर ते फक्त त्याच्याकडे एखादे कडक पेय नसल्याने झाले असेल."

तो परत खिडकीशी आला आणि तिच्या कडांशी असा उभा राहिला, की त्याच्या डोक्याचा थोडासा भाग व खांदे दिसत होते. तो खिडकीतून काळजीपूर्वक बाहेरील अंधारी चौकोनात बघत होता. पुन्हा एकदा आता बाहेरील बऱ्याचशा खिडक्यामध्ये उजेड नव्हता. तो नेहमी डाव्या हाताने --- माझ्या उलट्या बाजूने सुरवात करे आणि त्याचे आजूबाजूच्या तपासणीचे चक्र पूर्ण करे.

एका संध्याकाळी मी त्याला दुसऱ्यांदा तसे करतांना पाहिले. आणि एकदा पहाटे. त्यामुळे ते एकंदर तीनदा झाले. मी मनात हसलो. त्याला कशाबद्दल तरी अपराधी वाटत असल्याचे, तुम्हाला जाणवते. पण ती फक्त काही विचित्र सवय असावी. तो असे काही करतो आहे, हेदेखील त्याला कळले नसावे.

मीसुद्धा असे करत असेन. प्रत्येकजण करतो.

तो परत खोलीत आला. आणि ती अंधारी झाली. पुढील उजेडाच्या, उठाबसायच्या खोलीत त्याची आकृती दिसू लागली. मग तीही अंधारी झाली. तो तिसऱ्या, शेड खालती असलेल्या, झोपायच्या खोलीत शिरल्यावर, उजेड झाला नाही, याचे मला नवल वाटले नाही. त्याच्या ट्रंक भरण्यावरून असे वाटत होते, की विशेषतः ती उद्या तब्येतीच्या कारणाने दूर जाणार असेल, तर अर्थात तिला

त्रास होईल, असे काही त्याला करायचे नव्हते. दूर जाण्यापूर्वी, तिला जेवढी विश्रांती मिळेल, तेवढे बरे होते.

अंथरुणावर अंधारात पडणे त्याच्यासाठी साधे होते. पण जरा वेळाने अंधाऱ्या उठाबसायच्या खोलीतून एक काडी ओढली गेली, त्याचे मला काही आश्चर्य वाटले नाही. तिथे तो बहुधा सोफ्यावर झोपायचा प्रयत्न करत असावा. तो झोपायच्या खोलीजवळ अजिबात गेला नाही. त्यापासून तो लांबच रहात होता. खरे तर त्याने मी गोंधळलो होतो. तो एकाकीपणा फार ताणत होता.

सुमारे दहा मिनिटांनी दुसरी काडी ओढली गेली. हे त्याच उठाबसायच्या खोलीच्या खिडकीतून मला दिसले. तो झोपू शकत नव्हता.

झोप न येणारी रात्र आमच्या दोघांच्या दृष्टीने सारखीच होती.

माझ्या खिडकीत उत्सुकता दाटली होती. चौथ्या मजल्यावरील सतत सिगरेट ओढणारा, काही उत्तर देत नव्हता. फक्त त्रासिक रातकिडे किरकिरत होते.

पहाटेच्या सूर्योदयाबरोबर मी परत खिडकीशी आलो. त्याच्यामुळे नव्हे. माझे अंथरूण म्हणजे जणू काही तापलेल्या कोळशाची भट्टी झाली होती. सॅम मला काय हवे नको बघायला आला, तेव्हा त्याने मला खिडकीशी पाहिले. तो एवढेच म्हणाला, “मिस्टर जेफ, तुम्ही मोडून पडणार आहात.”

पहिल्यांदा तिथे जीवनाची काही चिन्हे नव्हती. मग अचानक मला उठाबसायच्या खोलीत त्याचे डोके दिसले. म्हणजे रात्रभर तो सोफ्यावर किंवा आरामखुर्चीत झोपला असल्याचा, माझा अंदाज खरा होता. अर्थात, आता तो ती कशी आहे, हे बघणार होता. तिला जरा बरे वाटते आहे का, हे बघणार होता. हे सर्वसामान्य मानवतेला धरून होते. गेल्या दोन रात्रीपासून तो तिच्याजवळ नव्हता.

तो नव्हताच.

त्याने कपडे केले. मग तो विरुद्ध बाजूला, स्वयंपाकघरात गेला आणि अधाशीपणे उभे राहून दोन्ही हातांनी काही खाल्ले. मग अचानक वळून, त्याला कोणी बोलावल्यासारखा किंवा जणू दाराची घंटी वाजल्यासारखा, तो कडेला जाऊन, सदनिकेच्या दाराच्या दिशेने दिशेने गेला.

नक्कीच मिनिटाभरात तो परत आला. त्याच्या बरोबर चामड्याच्या ॲप्रनमधील दोन माणसे होती. झटपट काम करणारी माणसे. ते आले ती दिशा व ते उभे असलेली दिशा, यातील काळा घनाकृती ठोकळा ते कष्टाळूपणे हलवत होते. तो नुसता उभा होता. पण ते तो नीट हलवत आहेत ना, यावर लक्ष ठेऊन होता. मग तो एकटाच मागे आला. मी त्याला त्याच्या डोक्यावरून हात फिरवतांना पाहिले, जसे काही त्यालाच फार श्रम झाले होते.

ती कुठे चालली होती, तिथे नेण्यासाठी, तिची ट्रंक तो पुढे करत होता. एवढेच.

तो परत भिंतीपाशी आला आणि काहीतरी खाली ठेवले. त्याने परत पेय घेतले. दुसऱ्यांदा. तिसऱ्यांदा. मी स्वतःशीच बोललो, की तो फार दमला आहे. पण आता तर त्याने काही ट्रंक भरली नव्हती. काल रात्रीपासून ट्रंक तर भरलेलीच होती. त्यामुळे कष्ट केल्याने दमल्याचा संबंध येतोच कुठे? घाम आणि उत्तेजक पेयाचादेखील काय संबंध?

आता इतक्या तासांनंतर शेवटी तो तिच्याकडे गेला. त्या खोलीतील खाली असलेली शेड मी वर गेलेली पाहिली. मग त्याने डोके वळवून सभोवताली पाहिले. पण हे नक्की, की त्याने विशिष्ट दिशेकडे वा व्यक्तीकडे पाहिले नाही. जसे

एखाद्या रिकाम्या खोलीकडे पहावे तसे त्याने या कडेपासून त्या कडेपर्यंत व वरपासून खालपर्यंत पाहिले.

तो मागे झाला. थोडा वाकला. जोराने हात हलवले व रिकाम्या पलंगावरून गादी व पांघरुणे ओढून खाली टाकली. ती तिथे कशीही वेडीवाकडी पडलेली राहिली.

ती तिथे नव्हती.

ते त्याला 'उशीरा केलेली हालचाल' म्हणतात. मग त्याचा अर्थ काय होता, ते मी शोधून काढले. दोन दिवस आकारहीन अर्थशून्यता व सर्वत्र भरून राहिलेला संशय! त्याला काय म्हणावे, ते मला समजत नव्हते. एखाद्या किड्याने घरासाठी जागा शोधावी तसे ते माझ्या मनात सावकाशीने तरंगत घोळत होते. स्थिर होऊ बघणारे माझे मन कृत्रिमतेने कशाही वरखाली होणाऱ्या तेथील शेडमुळे, हळूवारपणे कुठेही निर्हेतुक भटकण्याचा अनुभव घेत होते. कुठेही स्वस्थ होत नव्हते. काही कारणाने त्याने वर उडवलेल्या गाद्या जमिनीवर धाडदिशी आपटल्या. पसरल्या आणि तुम्ही त्याला काहीही म्हणा पण त्या ठामपणे खुनाची शक्यता अधोरेखित करत होत्या.

मनाच्या जाणीवेचा, विचारक्षमतेचा भाग नेणीवेच्या अर्धजागृत अवस्थेच्या खूपच मागे पडला होता.

'उशीरा केलेली हालचाल'

आता एकाने दुसऱ्याला पकडले. विचारांच्या साखळीचा दुवा अशा निष्कर्षापर्यंत येऊन पोचला, की त्याने तिला काहीतरी केले.

मी खाली पाहीले. माझा हात गुडघ्याच्या पट्टीवर सामान रचत होता. ती

खूप घट्ट बसली होती. मी ती जोर करून काढायचा प्रयत्न करू लागलो. मी स्वतःशीच बोललो, “सावकाश, एक मिनिट थांब.”

तो परत खोलीत आला. तिथे अंधार झाला. पुढील उजेडाच्या उठाबसायच्या खोलीत त्याची आकृती हलली. दिवा खाली असलेल्या झोपायच्या खोलीत तो शिरला, त्यामुळे त्याने झोपायच्या खोलीत अंधारात शिरावे, हे अगदी साहजिक होते.

काही वेळाने अंधाऱ्या उठाबसायच्या खोलीत काडी ओढलेली दिसल्यावर मात्र मला आश्चर्य वाटले. रात्रीसाठी तो झोपायचा प्रयत्न करत, तिथेच सोफ्यावर किंवा इतरत्र पहुडला असणार. तो झोपायच्या खोलीकडे फिरकलाच नाही. त्यापासून तो लांबलांबच रहात होता.

त्यामुळे मी, खरे तर गोंधळात पडलो. तो एकाकीपणा फार ताणत होता. दहा मिनिटाने त्या उठाबसायच्या खोलीच्या खिडकीतूनच परत काडी ओढलेली दिसली. त्याला झोप येत नसावी. रात्र आमच्या दोघांच्याही अंगावर येत होती. उत्सुकता शमवण्यासाठी खिडकीतून बाहेर बघणारे दोघे! काही उत्तर न देता, चौथ्या मजल्यावरील सदनिकेतील सतत सिगरेट ओढणारा तो! फक्त गुणगुणाऱ्या रातकिड्यांचा आवाज येत होता.

सॅम माझी कामे करण्यासाठी आला, तेव्हा त्याने मला तिथे पाहिले. तो एवढेच बोलला, “मिस्टर जेफ, तुम्ही लवकरच मोडून पडणार आहात.”

पहिल्यांदा तिथे जिवंतपणाचे काही लक्षण नव्हते. मग अचानक मी त्याचे डोके उठाबसायच्या खोलीतून खाली गेलेले व वर आलेले पाहिले. त्यामुळे त्याने सबंध रात्र उठाबसायच्या खोलीत सोफ्यावर किंवा आरामखुर्चीत काढली

असावी, हे मला समजले.

आता, शेवटी इतक्या तासानंतर तो आत तिच्याकडे गेला. गेल्या दोन रात्री तो तिच्याजवळ गेलेला नव्हता.

मी त्याची आकृती उठाबसायच्या खोलीतून झोपायच्या खोलीत जातांना पाहिली. तिला थोडे बरे वाटते आहे का, हे बघणे ही साधी माणुसकी होती.

त्याने कपडे केले व विरुद्ध दिशेला स्वयंपाकघरात गेला. तिथे उभे राहून, दोन्ही हातांनी काहीतरी बकाबका खाल्ले. नंतर अचानक दाराच्या घंटीचा आवाज ऐकल्यासारखा, तो सदनिकेच्या प्रवेशदाराशी गेला. क्षणार्धात, तो परत फिरला.

मग तो एकटाच आत आला. म्हणजे ती जिथे गेली होती, तिथे तो तिच्या कपड्यांची ट्रंक पाठवत होता.

आता अनेक तासानंतर शेवटी तो तिच्याकडे गेला. मी त्याला झोपायच्या खोलीत गेलेले पाहीले. खाली असलेली दिव्याची शेड वर उचलली गेली. मग त्याने डोके वळवून मागे बघितले. एकाच माणसाकडे बघावे, तसे नाही. पण आजूबाजूला, वरखाली त्या रिकाम्या खोलीत सर्वत्र पाहीले.

मग तो मागे झाला, जरासा वाकला, त्याने त्याचे हात जोराने झटकले आणि पलंगाच्या पायावर वाकत, तसाच वाकलेला राहिला. रिकामा गालीचा व गादी पलंगाच्या पायाशी पडली होती. ती त्याने तशीच ठेवली.

त्यावर ती नव्हती.

मी शब्द वापरले, ‘उशीरा केलेली हालचाल’ मग मला कळले, त्याचा

अर्थ काय. दोन दिवस तो काहीसा अस्वस्थ होता. काही ठामपणा नसलेला संशय होता. मला माहिती नाही, त्याला काय म्हणावे.

एखाद्या उडणाऱ्या किड्याने जमिनीवर बसायला जागा शोधावी, तसे माझे मन वरखाली उड्या मारत होते. एकापेक्षा जास्त वेळा ते स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करत होते. काही छोटीशी बाब, दिलासा देणारी बाब, जसे की कृत्रिमपणे खूप वेळ खाली असलेल्या शेड्स उचलल्या गेल्या, एवढेसे कारण त्याचे मन निरुद्देशपणे भटकायला पुरेसे होते. त्याला ओळखण्यासाठी, ते बराच वेळ स्थिरच होत नव्हते. संबंधाचा धागा तिथे सतत होता. मी तो समजून घेण्यासाठी, खूप वेळ धडपडत होतो.

आता काही कारणाने, अर्ध्या सेकंदात, त्याने गाद्या वर उडवल्यापासून धाडदिशी पडेपर्यंत --- संबंधाचा धागा वाढला --- किंवा त्याचा खुनाच्या शक्यतेत स्फोट झाला.

दुसऱ्या शब्दात, माझ्या मनाचा विचार करणारा भाग हा अर्धजागृत सहजप्रवृत्तीच्या फारच मागे होता. 'उशीरा केलेली हालचाल.' आता एका विचाराने दुसऱ्याला धरले. एकत्र आलेल्या विचारांचा मतितार्थ असा होता: त्याने तिला काहीतरी केले!

मी खाली पाहिले आणि माझ्या गुडघ्याच्या पट्टीवर माझा हात सामान रचत होता. ती फार घट्ट बसली होती. मी जोर लावून, ती काढायला लागलो. मी स्वत:शी बोललो, हळू, आता एक मिनिट थांब. काळजीपूर्वक, हळू कर. तू काही पाहिले नाहीस. तुला काही माहिती नाही. तुझ्याकडे फक्त नकारात्मक पुरावा आहे, की ती नंतर तुला कधीच दिसली नाही.

लहानशा स्वयंपाकघरातून सॅम माझ्याकडे बघत होता. तो त्याच्यावर आरोप केल्यासारखा बोलला, “तुम्ही कशाला हात लाऊ नका. तुमचा चेहरा ताणलेल्या कापडासारखा दिसतो आहे.”

मलाही तसेच वाटत होते. त्यात रक्त आपोआप उतरल्यासारखी टोचणारी भावना होती. त्याला माझ्या वाटेतून दूर करून, मला निवांत विचार करण्यासाठी, दुसऱ्या कशाहीपेक्षा, एखाद्या पुरेशी जागा असलेल्या खोलीत जायची गरज होती. मी म्हणालो, “सॅम, त्या इमारतीचा पत्ता काय आहे? तुझे डोके त्यात फारसे घालू नको आणि डोळे मात्र उघडे ठेव"

तो मान खाजवत बोलला, “बेनेडिक्ट रस्ता. असेच काहीतरी.”

“ते मला माहिती आहे. तिथे जरा रेंगाळ आणि मला बरोबर पत्ता आणून दे, एवढे काम करशील का?”

तो जाण्यासाठी वळल्यावर, त्याने विचारले, तुम्हाला तो कशासाठी हवा आहे?”

मी भलेपणे ठाम राहून म्हणालो, “त्याच्याशी तुझे काही देणेघेणे नाही.” कारण त्या भानगडीची काळजी घेणे क्रमप्राप्त होते. तो दार लावत असतांना, मी त्याला हाक मारली. “आणि तू तिथे असतांना, प्रवेश द्वाराशी जाऊन, पत्रपेट्या बघून, चौथ्या मजल्यावरील मागची सदनिका कोणाची आहे, ते बघ. ती बघतांना चुकू नको आणि कोणी तुला असे करतांना बघत नाही ना, यावर लक्ष ठेव.”

तो काहीतरी असे पुटपुटत गेला, “जेव्हा माणसाला करायला काहीच नसते व दिवसभर नुसते बसून रहावे लागते, तेव्हा त्याला काही नको ते उद्योग सुचतात.”

दार लागले आणि मी काही विधायक विचार करू लागलो. मी स्वतःशीच बोललो, “तू हे सैतानी विचार कशाच्या आधारावर बांधतो आहेस? आपण बघू तुला कायकाय माहिती आहे. फक्त तिथे बऱ्याचशा चुकीच्या गोष्टींची मालिका होती. काही चुकीच्या घडलेल्या गोष्टीः

१ पहिल्या रात्री सर्व वेळ दिवे चालू असणे.

२ दुसऱ्या रात्री तो नेहमीपेक्षा उशीरा आला.

३ त्याने टोपी काढून ठेवली.

४ ती त्याची विचारपूस करायला बाहेर आली नाही --- रात्रभर दिवे चालू असणाऱ्या रात्रीच्या संध्याकाळ पासून, ती दिसली नाही.

५ त्याने तिची ट्रंक भरणे संपवल्यावर पेय घेतले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी तिची ट्रंक बाहेर गेल्यावर, तीन वेळा कडक पेय घेतले.

६ तो आतल्या आत हादरलेला व दुःखी होता. तर तो अनैसर्गिकपणे बाजूच्या बेसूर वाजणाऱ्या खिडकीतून आजूबाजूला बघत होता.

७ तो उठाबसायच्या खोलीत झोपला. झोपायच्या खोलीकडे ट्रंक जाण्यापूर्वी फिरकला नाही.

ठीक आहे. जर ती पहिल्या रात्री आजारी होती आणि त्याने तिला हवाबदलासाठी --- तब्येत चांगली होण्यासाठी दूर पाठवले, तर आपोआप मुद्दे १,२, ३ व ४ खोडले जातात. उरलेले मुद्दे ५ व ६ फारसे महत्वाचे नाहीत व गुन्हा सिद्ध करणारे नाहीत. पण जेव्हा मुद्दा ७ पुढे येतो, तेव्हा तो चांगलाच संशय व्यक्त करतो.

जर ती आजारी पडल्याबरोबर, पहील्या रात्री दूर गेली असती, तर मग शेवटच्या रात्री तो झोपायच्या खोलीत का झोपला नाही? भावनामय झाल्याने? असे क्वचितच होईल. दोन चांगले पलंग एका खोलीत आहेत व दुसरीकडे फक्त सोफा किंवा आरामदायी नसलेली आरामखुर्ची. जर ती आधीच गेलेली होती, तर तो तिथे झोपला का नाही? कारण तो तिचा विरह सहन करत होता? एकाकी होता? मोठा माणूस असे करणार नाही. ठीक आहे. मग ती अजून तिथे होती का? सॅम असे अर्धवट सांगत परत आला की, "त्या घराचा क्रमांक ५२५, बेनेडिक्ट रस्ता आहे आणि चौथ्या मजल्यावरील मागील सदनिका मिस्टर आणि मिसेस लार्स थोर्वाल्ड यांच्या नावावर आहे."

"शू --- " मी शांतता पसरवली आणि त्याला दृष्टीच्या टप्प्यातून पलीकडे नेले. तो तात्त्विक दृष्ट्या गुरगुरला, "पहिल्यांदा त्याला ते हवे होते आणि नंतर नको होते." आणि कामाला लागला.

मी त्या गोष्टीवर विचार करू लागलो. पण अजून काल रात्री जर ती तिथे झोपायच्या खोलीत असेल, तर ती दूर गावाला गेली नसणार. कारण आज तिला निघताना मी बघितले नाही. ती माझ्या बघण्यात न येता, काल सकाळी लवकर गेली असेल तर! मी झोपल्यामुळे तिला बघू शकलो नसेन.

पण आज सकाळी मी लवकर उठलो होतो. मी खिडकीशी आलो, तेव्हा फक्त त्याचे डोके सोफ्यावरून वर आलेले पाहिले.

ती गेलीच असेल, तर काल सकाळी गेली असेल. मग त्याने आजपर्यंत झोपायच्या खोलीत अंधार का केला व गादी कशी विस्कटली नव्हती?

शिवाय काल रात्री तो त्या खोलीपासून लांब का राहिला? तो ती गेली

नसल्याचा पुरावा होता. ती अजून तिथेच होती. पण मग ट्रंक आज पाठवल्याबरोबर, तो आत गेला. शेड वर केली. गादी हवेत उडवली आणि दाखवले, की ती तिथे नाही. हे सगळे गोलगोल घोटाळयासारखे होते.

*नाही, यापैकी काहीच नाही.* ट्रंक पाठवल्यावर लगेच --- *ट्रंक! त्या ट्रंकेमुळे ते झाले.* सॅम व मी यामधील दार नीट लागले असल्याची खात्री केली. मिनिटभर माझा हात अनिश्चिततेने टेलिफोनच्या डायलवर राहिला. बॉयन याबद्दल सांगू शकेल. मला माझ्यामध्ये कोणी लुडबुड करण्यासाठी यायला नको होते. मी आता त्यात जितका बुडालो होतो, त्याहून जास्त मला बुडायचे नव्हते. किंवा अजिबातच बुडायचे नव्हते.

बरेच वेळा चुकीचा फोन लागल्यावर, शेवटी एकदाचा बरोबर क्रमांक लागला.

“बॉयन, हे बघ? मी हाल जेफ्रीज आहे --- “

त्याने उत्सुकतेने विचारले, “तू गेली बासष्ठ वर्षे कुठे होतास?”

“ते आपण नंतर बोलू. मला आता तुला एक नाव आणि पत्ता द्यायचा आहे, तो लिहून घे. तयार आहेस? लार्स थोर्वाल्ड, ५२५, बेनेडिक्ट रस्ता. चौथा मजला, मागील बाजू. लिहिलास का?”

“चौथा मजला, मागील बाजू. हे कशासाठी?”

“तपास करण्यासाठी. माझा पक्का विश्वास आहे, की तू खणत गेलास, तर एका खुनाचे रहस्य उलगडशील.”

“मला फक्त --- खात्रीपूर्वक निर्णय पाहिजे.”

“आतापर्यंत तिथे एक नवराबायको रहात होते. आता फक्त नवरा रहातो. आज सकाळी लवकर तिची ट्रंक बाहेर गेली. ती घराबाहेर पडल्याचे कुणी पाहिले का, याचा शोध घे -- “

त्याने मोठ्याने तशी आज्ञा दिली आणि दुसऱ्या कुणाला तरी गुप्तहेरांच्या प्रमुखाला सांगितले. त्याला ते अतिरंजित वाटले.

मलाही वाटले. तो गुळमुळीतपणे बोलला, “ठीक आहे.” मग त्याने ते होते तसे स्वीकारले.

“ट्रंक आज सकाळी लवकर गेली. तिला जातांना कुणी पाहिले का, याचा शोध घे.” मी हे प्रकरण शोधून काढले होते. मी माझी खिडकी पूर्णपणे सोडली. मी त्याच्यासाठी ते केले, कारण तो मला खूप वर्षे ओळखत होता. त्याने माझ्या विश्वासार्हतेला प्रश्न केला नसता. या उकाड्यात मला माझी खोली पसारा पडलेली, व चिंध्या, कागदाचे कपटे खिडकीतून बाहेर पडणारी, दिसायला नको होती. त्याना त्या सदनिकेत जाऊन, माझ्याशी समोरासमोर काय ते करू दे.

तो बोलला, “ठीक आहे, काय करायचे, ते आम्ही करतो. मी तुला काय प्रगती होते आहे, ते कळवत रहातो.”

मी थांबून राहिलो. मी मागे टेकून बसलो आणि कायकाय घडते आहे, त्याची वाट बघत बसलो. माझी जागा समोरील सर्व काही दिसण्यासाठी उत्तम होती. चाकाची खुर्ची वळवून मी मागील देखील काही बघू शकत होतो. पण मी बॉयनला कामाला जातांना बघू शकत नव्हतो. कधी आणि कुठे काही घडले, तर मला फक्त परिणाम दिसत.

पुढचे काही तास काहीच झाले नाही. मला माहीत असलेले काम

पोलीस करत होते. ते गुप्त काम होते. चौथ्या मजल्याच्या खिडकीतील आकृती एकटी माझ्या नजरेच्या टप्प्यात होती. तो बाहेर जात नसे. तो अस्वस्थ असे व खोल्याखोल्यातून फिरत असे. एका जागी जास्त वेळ थांबत नसे, पण आता थांबला. मी त्याला परत खातांना पाहीले. यावेळेस तो बसला होता. एकदा तो दाढी करत होता. एकदा त्याने वर्तमानपत्र वाचायचा देखील प्रयत्न केला. पण तो फार काळ वाचू शकला नाही.

छोटी न दिसणारी चाके त्याच्याभोवती फिरत होती. अजून तरी ती सुरवात असल्याने, ती त्रासिक नव्हती.

जर मला माहिती असते, तर मी मनाशी आश्चर्य केले असते, की तो तीन वेळा काही न करता राहू शकेल का? की दाराला कुलूप लाऊन पळून जाईल? हे त्याच्या गुन्ह्यावर, निगरगट्टपणावर आणि त्याच्या फसवेपणावर अवलंबून राहील.

त्याच्या गुन्ह्याबद्दल माझी स्वतःची खात्री होती. नाहीतर मी ही पायरी चढलोच नसतो. तीन वाजता माझा फोन खणखणला. बॉयन बोलत होता. “जेफ्रीज, ठीक आहे, मला ठाऊक नाही. तू मला थोडी अधिक माहिती देऊ शकशील का?”

मी उद्गारलो, ”का? मी असे का करू?”

“तिथे एक मनुष्य आहे. तो चौकशी करतो आहे. मला आताच त्याचा अहवाल मिळाला आहे. इमारतीचा मुख्य आणि त्याचे खूप शेजारी म्हणाले, की ती काल सकाळी लवकर, तब्येतीसाठी हवापालट म्हणून गावाला गेली आहे.”

“एक मिनिट थांब. तुमच्यापैकी कुणी तिला जाताना पाहिले का?”

“नाही.”

“मग तुमचे सगळ्यांचे म्हणणे हे त्याच्या म्हणण्याची फक्त पुनरावृत्ती करणे ठरावे. तो ‘आँखोदेखा हाल’, म्हणजेच खरा पुरावा नाही.”

“तिचे तिकीट होते व तो गाडीवर तिला निरोप द्यायला गेला होता.”

“हे देखील खरे म्हणता येणार नाही. हे ग्राह्य धरता येणार नाही.”

“मी एका माणसाला तिकीटाची सत्यता तपासायला स्टेशनवर पाठवले आहे. शेवटी आता त्याने लवकर स्पष्टपणे सर्व काही कबूल केले पाहिजे. अर्थात मधल्या काळात, आम्ही त्याच्यावर पाळत ठेऊन आहोत. त्याच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेऊन आहोत. पहिली संधी मिळाल्याबरोबर आम्ही त्याच्या जागेची तपासणी करणार आहोत.”

मला असे वाटत होते, की त्याना काही सापडणार नाही, जरी सापडले तरी --

“माझ्याकडून अजून काही अपेक्षा करू नका. हे काम मी तुमच्यावर सोपवले आहे. मला जे काही तुम्हाला द्यायचे होते, ते सर्व मी दिले आहे. नाव, पत्ता आणि माझे मत.”

“हो, आजपर्यंत मी तुझ्या मताला किंमत देत आलो आहे, जेफ --- “

“पण आता देत नाहीस, असे तुला म्हणायचे आहे का?”

“मुळीच नाही. असे आहे की, तू म्हणतोस, तसे आम्हाला अजून काहीच सापडलेले नाही.”

“पण अजून तर तुम्ही फारसे काही शोधलेच नाही.”

तो परत त्याच्या आधीच्या म्हणण्याकडे गेला. “ठीक आहे. आम्हाला

काय काय सापडते, ते बघू. तुला आम्ही कळवत रहातो.”

अजून एखादा तास गेला असेल. सूर्यास्त होण्याची वेळ झाली. मी त्याला तिथे बाहेर जाण्यासाठी तयार होतांना पाहिले. त्याने डोक्यावर टोपी चढवली. हात पँटच्या खिशात ठेवला. आणि थोडा वेळ त्याकडे पहात उभा राहिला.

मला वाटते, तो सुटे पैसे मोजत होता. मला तो थोडा उद्दीपित झालेला पण दबलेला वाटला. तो गेल्याबरोबर मिनिटाभरात ते येतील, हे मला माहिती होते. त्याने शेवटचे एकदा सभोवताली पाहिले व मी गंभीरपणे विचार केला, ‘अरे बाबा, तुला जर काही लपवायचे असेल, तर आताच ती वेळ आहे.’

तो गेला. त्या सदनिकेवर, श्वास रोखून धरणारा भरकटणारा रिकामपणा भरून राहिला. तीन वेळा गजर झाला, तरी माझे डोळे खिडकीवरुन ढळले नाहीत. अचानक तो ज्या दारातून गेला, ते दार किंचित किलकिले होऊन, दोन माणसे, एकामागोमाग एक आत घुसली. आता ते तिथे होते. त्यांनी त्यांच्यामागे दार लावले. दोघे वेगळे होऊन कामाला लागले. एकाने झोपायच्या खोलीचा ताबा घेतला व एकाने स्वयंपाकघराचा आणि त्यांच्या पद्धतीने खोल्यांचा कोपरा न कोपरा धुंडाळून काढला. त्यांचे काम झाले. मी त्याना अगदी वरपासून खालपर्यंत सगळे तपासता ना पाहिले. उठाबसायची खोली दोघांनी मिळून तपासली. एकाने एक बाजू व दुसऱ्याने दुसरी बाजू! दोघांना पूर्वसूचना मिळण्याआधीच, त्यांचे काम झाले होते. मी सांगू शकतो, की ते ताठ उभे राहून एकमेकांकडे निराश होऊन, मिनिटभर बघत उभे राहिले. मग दोघांनी झटकन डोकी वळवली कारण तो येत असल्याची घंटी वाजत होती. ते घाईने भरभर बाहेर पडले.

मी उगीचच उदास झालो नाही. मला असेच होणे, अपेक्षित होते. मला स्वतःला असेच वाटत होते, की त्याना त्याच्या गुन्ह्याचे काहीही पुरावे सापडणार नाहीत. ट्रंक गेलेली होती.

तो एक मोठी खाकी कागदात गुंडाळलेली बॅग घेऊन आला. कोपऱ्यात बसला. कोणीतरी घरात येऊन गेल्याचा त्याला संशय येतो आहे का, हे बघण्यासाठी मी त्याचे जवळून निरीक्षण करत होतो. पण मला तसे काही जाणवले नाही. त्या बाबतीत ते हुशार होते.

उरलेली रात्र तो घरीच होता. तो सुरक्षितपणे व ठामपणे बसलेला होता. त्याने मरगळलेल्या अवस्थेत पेय घेतले. मी त्याला खिडकीशी बसलेले पाहिले. त्याचा हात मधूनमधून थोडाफार वर होत होता. वरवर पाहता, सर्व काही ठीक दिसत होते. आता ट्रंक --- बाहेर गेल्याने, ताण कमी झाला होता.

रात्रभर त्याच्यावर पाळत ठेऊन, मी विचार केला, ‘तो इथे चिकटून का राहिला आहे? तो कशाच्या मागे आहे? मग मला उत्तर मिळाले, की त्याला अजून तर कोणी त्याच्या मागावर असल्याचे माहिती नाही. त्यामुळे त्याला काही घाई नाही. ती गेल्यावर लगेच जाणे, जरा धोकादायक होते. त्यापेक्षा थोडा काळ इथे व्यतीत करणे बरे, असे त्याला वाटले असणार.

रात्र गेली. मी बॉयनच्या फोनची वाट बघत बसलो होतो. माझ्या अपेक्षेपेक्षा, तो उशीरा आला. मी अंधारात फोन उचलला. तो आता झोपायच्या तयारीत असल्याचे दिसले. तो स्वयंपाकघरात पित बसला होता, तिथून उठला व दिवा लावला. तो उठाबसायच्या खोलीत गेला व दिवा लावला. त्याने पट्ट्यातून शर्ट बाहेर काढला. माझ्या कानात बॉयनचा आवाज होता आणि डोळे तिथे

त्याच्यावर रोखलेले होते. तिहेरी व्यवस्था!

“हॅलो, जेफ, ऐक. काहीही सापडले नाही. तो बाहेर असतांना आम्ही त्याचे घर तपासले.”

मी जवळजवळ ओरडलो, “मला तर माहिती आहे. मी ते पाहिले.” पण मी स्वतःला सावरले.

“आणि काहीच सापडले नाही. पण --- “ तो थांबणे महत्वाचे असल्यासारखा थांबला. मी तो पुढे काय बोलतो, यासाठी थांबलो होतो.

“पण खाली पत्रपेटीत आम्हाला एक पोस्टकार्ड सापडले. आम्ही ते कसेबसे तिथून बाहेर काढले.”

“आणि?”

“ते त्याच्या बायकोकडून आलेले होते. गावाकडील कुठल्या तरी शेतावरून कालच लिहिलेले होते. त्यात असे लिहिले होते, ‘मी पोचले. मी ठीक आहे. मला जरा बरे वाटते आहे. बरय, ॲना’

मी हट्टीपणे, पण हळू आवाजात म्हणालो, “तुम्ही म्हणता, कालच लिहिलेले आहे. याचा काही पुरावा आहे का? पत्रावर पोस्टाच्या शिक्क्यात काय तारीख होती?” त्याने घशातून मला उद्देशून, काही खर्जातील आवाज काढला.

“पोस्टाची खूण पुसट होती. त्याचा कोपरा ओला होता आणि खाडाखोड करून, शाई पसरलेली होती.”

“सर्व मजकूर पुसट होता का?”

“वर्ष आणि तारीख नीट दिसत नव्हती. ऑगस्ट व संध्याकाळचे

साडेसात हे नीट दिसत होते.”

यावेळी मी स्वरयंत्रातून काही खर्जातील आवाज काढला.

“ऑगस्ट व संध्याकाळचे साडेसात --- १९३७ किंवा १९३९ किंवा १९४२, असू शकते. ते पत्रपेटीत कसे पडले, याचे तुमच्याकडे काही उत्तर नाही. ते पोस्टमनकडून आले की कुणाच्या खणातून आले!”

तो म्हणाला, “जेफ, सोडून दे. हे वाढवावे तितके वाढेल.”

म्हणजे जर माझे डोळे थॉर्वाल्डच्या सदनिकेवर लागलेले नसते, तर मला माहिती नाही, मी काय उत्तरलो. काहीसे संक्षिप्त. मी कबूल केले किंवा नाही, तरी पोस्टकार्डाने मला हादरवून सोडले होते. मी तिकडे पहात होतो. त्याने शर्ट काढल्याबरोबर दिवा मालवला होता. पण झोपायची खोली उजळलेली नव्हती. उठाबसायच्या खोलीतून, सोफ्यावरून किंवा आराम खुर्चीतून, एक काडी ओढली गेली. झोपायच्या खोलीत दोन न वापरलेले पलंग होते.

*तो अजूनही त्यापासून लांबच होता.*

मी भकास आवाजात म्हणालो, बॉयन, तुम्ही कुठल्या दुसऱ्या जगातून आणलेल्या पोस्टकार्डाची मी काही पर्वा करत नाही. मी सांगतो, त्या माणसाने त्याच्या बायकोला मारले आहे. त्याने बाहेर नेलेल्या ट्रंकेचा शोध घ्या. सापडल्यावर, ती उघडा आणि मला वाटते, तुम्हाला ती बाई सापडेल.”

आणि तो काय करणार म्हणतो आहे, हे ऐकायला न थांबता, मी फोन थांबवला. त्याने परत फोन केला नाही, त्यामुळे मला वाटले, की तो मी सांगितलेले काही ऐकणार नाही. तो त्याचा संशयच खरा धरून बसणार.

मी खिडकीजवळ रात्रभर बसून राहिलो. मी मरणावर डोळा ठेऊन होतो. त्यानंतर दोन वेळा अर्ध्या तासाच्या अंतराने काडी ओढली गेली. त्यापेक्षा अधिक काही नाही. त्यामुळे, बहुधा तो झोपलेला असावा. कदाचित नसावाही.

काही वेळ मलाही झोपावे लागले आणि शेवटी मी सूर्योदयाबरोबर जागा झालो. तो जे काही करणार असेल, ते तो नक्की अंधारातच करणार आणि दिवसाउजेडी करणार नाही.

आता तिथे फार काही बघण्यासारखे नव्हते. आणि आता त्याला करण्यासारखे काय उरले होते? काहीच नाही. नुसते पित बसायचे व वेळ घालवायचा.

बहुधा सॅम पाच मिनिटे उशीरा आला व मला स्पर्श केला. आधीच टळटळीत दुपार झाली होती. मी चिडून म्हणालो, "मला झोपता यावे म्हणून मी ठेवलेली चिठ्ठी तू वाचली नाहीस का?"

तो बोलला, "हो, पण तुमचा जुना मित्र इन्स्पेक्टर बॉयन आला आहे. मला वाटते, तुम्हाला नक्की त्याना भेटायचे --- "

ही खासगी भेट होती. बॉयन न थांबता व फारशी पर्वा न करता, त्याच्या मागे खोलीत आला.

मी सॅमला जायला सांगितले. "आत जा आणि काही अंडी एकत्र फोड."

बॉयनेने कडक खरमरीत आवाजात, सुरवात केली, "जेफ, तू मला असे करतो आहेस, याचा अर्थ काय? मी मला मूर्ख बनवून घेतले आहे, त्याबद्दल आभार. माझ्या माणसांना त्या माणसाच्या मागावर मी इकडे तिकडे पाठवले, ही

चूक केली. देवाचे आभार! मी याहून जास्त कशात लक्ष घातले नाही. या माणसाला पकडून चौकशी चालली आहे. पण  का?"

मी कोरडेपणे विचारले, "तुला काय वाटते, त्याची गरज नाही का?

त्याच्या नजरेने उत्तर देत तो बोलला, "मी एकटाच आमच्या विभागात नाही आहे."

"मला जाब विचारू शकतील अशी, माझ्या वरदेखील माणसे आहेत. हे चांगले चालले आहे, नाही का? माझ्या विभागाच्या खर्चाने, मी एका माणसाला अर्धा दिवसाच्या गाडीने शिट्टीच्या भकास थांब्यावर पाठवले आहे --- "

"म्हणजे तुम्हाला ट्रंक मिळाली?

तो दुष्टपणे बोलला, "एका जलद काम करणाऱ्या संस्थेतर्फे आम्ही ती शोधून काढली.

"आणि तुम्ही ती उघडली?"

"आम्ही त्यापेक्षा चांगले केले. आम्ही जवळपासच्या शेतकी टापूत चौकशी केली. आणि असे समजले, की मिस्टर थोर्वाल्ड एका ट्रंक बनवणाऱ्या ठिकाणी गेले होते आणि ती त्यांनी स्वतः तिच्या किल्लीने उघडली

खूप कमी लोकांना मला त्या जुन्या मित्राकडून मिळाली, तशी नजर मिळाली असेल. दारात तो बंदुकीच्या दट्ट्याच्या कडकपणे म्हणाला, "जे झाले, ते सर्व आपण विसरून जाऊ, चालेल का? ती आपल्यापैकी एकाने दुसऱ्यासाठी केलेली सर्वात दयाळू गोष्ट असेल. तू तू राहिलेला नाहीस आणि मी थोडा पैशांच्या, वेळाच्या आणि माझ्या स्वभावाच्या अडचणीत आहे. आपण ते सोडून

देऊ. जर भविष्यात तुला मला फोन करायचा असेल, तर मी तुला आनंदाने माझा फोन क्रमांक देईन.”

त्याच्यामागे त्याने दार घट्ट लावले.

तो माझ्यावर गुरगुरून, बाहेर पडल्यावर दहा मिनिटे माझे सुन्न मन दुग्ध्यात पडले होते. मग ते मुक्तपणे नाचू लागले. पोलिसांची ऐशी की तैशी! मी त्याना हे सिद्ध करून दाखवू शकत नाही. पण कदाचित मी माझ्याजवळ ते सिद्ध करू शकतो. असे किंवा तसे, एकदा आणि कायमचे. मी चूक असेन किंवा बरोबर.

त्याने त्यांच्याविरुद्ध छातीवर भक्कम चिलखत घातले होते. पण त्याची पाठ उघडी होती व माझ्यापासून बचाव केलेली नव्हती.

मी सॅमला आत बोलावले. “मागे आपण बोटीने फिरत होतो, तेव्हा आपल्याकडे असलेल्या लहान दुर्बिणीचे काय झाले?”

तो खाली गेला आणि त्याने ती शर्टाच्या बाहीने पुसत आणली. पहिल्यांदा मी ती माझ्या मांडीवर नुसतीच ठेऊन दिली. एक कागद व पेन्सिल घेऊन, त्याच्यावर मी चार शब्द लिहिले, ‘तू तिला काय केलेस?’

ते मी एका पाकिटात घातले आणि पाकिटावर नाव वगैरे काही लिहिले नाही. मी सॅमला म्हणालो, “हे बघ, तुला असे करायचे आहे, की मी आता सांगेन, ते काम अगदी काळजीपूर्वक करायचे आहे. हे घे आणि त्या इमारतीत, जिने चढून चौथ्या मजल्यावर जा आणि ५२५ क्रमांकाच्या सदनिकेच्या दाराच्या खालून ते आत सरकव. तू हे काम झटपट कर. हे करताना त्याने तुला पहायला नको. मग

जेव्हा तू परत सुरक्षितपणे खाली येशील, तेव्हा त्याचे लक्ष वेधण्यासाठी, त्याच्या बाहेरील दाराची घंटी हळूच वाजव.” त्याने तोंडाचा आ वासला.

“आणि मला काही प्रश्न विचारू नकोस, समजले? मी काही तुला मूर्ख बनवत नाही आहे.”

तो गेला आणि मी माझी दुर्बिण तयार ठेवली.

मी एक दोन मिनिटात तो नीट दिसेल, अशी ती दुर्बिण तयार केली. त्याचा चेहरा ठळक दिसत होता. मी तो प्रथमच पहात होतो. काळेभोर केस, खात्रीने स्कँडेव्हीयन वारसा. तो भरदार स्नायुंचा वाटत होता, तरी त्याचे वजन फार नव्हते.

साधारण पाच मिनिटे गेली असतील. त्याचे डोके गरकन वळले व तो कडेने दिसू लागला. ते जोराने, लांबलेले रडणे होते. पत्र आधीच आलेले दिसत होते.

तो परत सदनिकेच्या दाराशी गेला, आणि त्याचे डोके मागून दृष्यायमान झाले. तो मागे जाईपर्यंत मी त्याला दुर्बिणीतून पाहू शकलो. पण नंतर ते शक्य झाले नाही.

त्याने प्रथम दार उघडले, ते मला दिसले नाही. त्याने सपाटीवर नजर फिरवली. मग ते बंद केले. मग तो खाली वाकला. सरळ झाला. परत परत तसे करत राहिला. त्याला आजूबाजूला वळताना मी बघितले.

तो दारापासून लांब, खिडकीच्या जवळ आत आला. दाराजवळ उभे रहायला त्याला धोका वाटत होता आणि ते नेमके उलटे असल्याचे त्याच्या

लक्षात आले नव्हते. दारापासून लांब त्याला सुरक्षित वाटत होते. खोलीमध्ये आत त्याला जास्त धोका होता.

त्याने खिडकी सताड उघडली. तो त्यातून नीट बघत होता. देवा रे, मी त्याचे हावभाव कसे पाहिले! माझे डोळे त्याच्यावर खिळलेले राहीले. चेहऱ्याची सर्व कातडी ओढून घेऊन, ते एकदम मोठे झाले. त्याचा चेहरा कानांमागे ताणला गेला. मग डोळे मंगोलाईडसारखे, धक्का बसल्यासारखे, दुःखी झाल्यासारखे बारीक झाले. त्याचा हात बाहेर येऊन भिंतीचा आधार घेऊ लागला व तिथे तो चिकटला. मग तो परत मागे दाराकडे चालत गेला. काहीतरी जिवंत तिथे असल्यासारखे, मी त्याला रांगताना बघत होतो. त्याने ते दार इतक्या हळूवारपणे उघडले, की ते कळलेही नाही व घाबरत, फटीतून डोकावून पाहिले. मग त्याने ते बंद केले व लडखडत, तोल जात, दुःखाने कसाबसा परत आला. कसातरी खुर्चीत धपकन पडला. पेय हिसकावून घेतले व बाटलीतून ओतले. ते ओठांशी नेतानाही खांद्यांवरून त्याचे डोके वळवून तो त्याची गुप्त गोष्ट चेहऱ्यावर आणत होता.

मी पेला खाली ठेवला.

गुन्हेगार! गुन्हेगार! खड्ड्यात गेला तो नरक आणि पोलीसही! माझा हात फोनकडे गेला व परत आला. याचा काय उपयोग होता? त्यांनी पूर्वी ऐकून घेतले, तसे आता ते ऐकून घेणार नाहीत. “तुम्ही त्याचा चेहरा बघायला हवा होता, इत्यादी.” आणि मी बॉयनचे उत्तर ऐकू शकलो. “कुणालाही खऱ्या किंवा खोट्या निनावी पत्राने धक्का बसतो. तुलाही बसला असता.”

मी एक दोन मिनिटात तो नीट दिसेल, अशी ती दुर्बीणीची जागा तयार केली.

त्यांनी मला त्यांना खऱ्या वाटणाऱ्या मिसेस थोर्वाल्डला दाखवले --- किंवा त्याना असे वाटले, की त्यांनी दाखवले. मी ती मेलेली त्याना दाखवायला पाहिजे होती, म्हणजे हे सिद्ध झाले असते, की त्या दोन्ही एकच नव्हत्या. [त्याची काही भानगड असावी.] मी माझ्या खिडकीतून, त्यांना प्रेत दाखवायला हवे होते.

पण पहिल्यांदा त्याने मला ते दाखवायला हवे होते.

मला हे समजण्यापूर्वी अनेक तास गेले. सबंध दुपार गेली तरी मी, नजर खिळवून बसलो होतो. नजर खिळवून बसलो होतो. मध्यंतरीच्या काळात, तो पिंजऱ्यातील चित्यासारखा येरझऱ्या घालत होता. दोन मने पण विचार एकच, माझ्या बाबतीत उलटे होते. हे कसे लपवावे, कसे लपवू नये.

मला भीती होती, की तो दिवाच लावणार नाही. पण त्यासाठी अजून वेळ होता. त्यामुळे अजून उजेड असेपर्यंत थोडा वेळ तरी, मी त्याच्यावर नजर ठेऊ शकत होतो. त्याला सुद्धा तसे करावे लागल्याशिवाय तो करणार नव्हता --- अजूनही त्याला ते तिथे रहाण्यापेक्षा जास्त धोक्याचे वाटत होते.

माझ्याभोवतालचे नेहमीचे आवाज व दृष्ये मला समजतच नव्हती. माझ्या विचारांचा सगळा ओघ इतर कशाच्याही विरुद्ध त्याच्याकडेच लागला होता, की त्याला माझ्यापासून दूर अशा जागी कसे पाठवता येईल, जेणेकरून, मी त्याला पोलिसांच्या ताब्यात देऊ शकेन.

मी थोडासा सजग होतो, मला आठवत होते, सहाव्या मजल्यावरील तयार सदनिकेचा मालक कुणा भाडेकरूच्या शोधात होता. ही सदनिका थोर्वाल्डच्या दोन मजले वर होती. मधल्या सदनिकांचे काम अजून चालू होते. एका वेळी जरासे विचित्र पण अर्थात पूर्ण अपघातीपणे दोन गोष्टी एकाच वेळेस

झाल्या. मालक आणि भाडेकरू सहाव्या मजल्याच्या उठाबसायच्या खोलीच्या खिडकीशी आले आणि त्याखाली चौथ्या मजल्यावर थोर्वाल्ड खिडकीशी उभा होता. दोन्ही पक्ष एकमेकांना न दिसता, एकाच भिंतीशी उभे होते., तिथून एकाच वेळी स्वयंपाकघरातील खिडकीशी गेले. हे विचित्र होते. जणू काही ते दोऱ्यावरील बाहुल्या असल्यासारखे, एकाच दोरीने हवे तसे हलवले जात होते. नंतरच्या पन्नास वर्षातही हे असे घडले नसते. नंतर लगेच ते तसे परत न होण्यासाठी वेगळे झाले. या गोष्टीने मी अस्वस्थ झालो. यात काही त्रुटी/फसगत होती. हे आपोआप झाले नसावे. हे काय आहे, हे समजण्यासाठी मी क्षण दोन क्षण प्रयत्न केला पण मला काही उमगेना.

आता मालक व भाडेकरू गेले होते. फक्त थोर्वाल्ड दिसत होता. माझी अर्धकच्ची स्मरणशक्ती ते सर्व आठवण्यासाठी पुरी पडेना. माझ्या डोळ्यांचा नंबर कदाचित बदलला असेल. मी परत चष्मा लावला. पण नंबर बदललेला नव्हता.

या गोष्टी माझ्या नेणीवेत जाऊन बसल्या. मी समस्येवर विचार करू लागल्यावर, तिथे त्या यीस्टसारख्या फुगू लागल्या.

शेवटी माझे डोके चालले, तेव्हा अंधार होऊन काही वेळ झाला होता. पण शेवटी मी समस्येवर उत्तर शोधले. ती मोठी व गुंतागुंतीची होती. पण मी जो विचार केला, फक्त तोच करणे शक्य होते. एका विशिष्ट दिशेने झटपट प्राथमिक कृती करण्याची, मला गरज होती आणि यासाठी, गुळमुळीतपण व तात्पुरता आनंद सोडायची गरज होती. त्याच्या गैरहजेरीत मला अर्ध्या तासाच्या अंतराने दोन फोन करायचे होते. मला हवे होते, ते सापडेपर्यंत मी काडी ओढून फोनची डीरेक्टरी पाहिली. मला काय हवे होते, तर थोर्वाल्ड, ५२५, बेनेडिक्ट, स्वानसी,

५-२११४.

मी काडी विझवली. अंधारात फोन उचलला. तो दूरदर्शनसारखा होता. मी फोनवरील पलीकडच्या बाजूचे दृष्य बघू शकत होतो, वायरमधून नव्हे, तर खिडकीतून खिडकीतले.

तो घोगऱ्या आवाजात म्हणाला, “हॅलो”

मला वाटले, “हे किती विचित्र आहे. मी गेले तीन दिवस त्याच्यावर खुनाचा आरोप करतो आहे आणि फक्त आता मी त्याचा आवाज पहिल्यांदा ऐकतो आहे.

मी माझा आवाज लपवायचा प्रयत्न केला नाही. शेवटी त्याने मला कधीच पाहिले नव्हते आणि मी त्याला कधीच समोरासमोर पाहिले नव्हते. “माझे पत्र मिळाले का?”

त्याने काळजीपूर्वक विचारले, “कोण बोलते आहे?”

“असा कोणीतरी ज्याला हे माहिती आहे.”

तो छद्मीपणे बोलला, “काय माहिती आहे?”

“तेच, जे तुला माहिती आहे. तू आणि मी दोघांनाच माहिती आहे.”

त्याने स्वतःला चांगले सावरले. मला काही आवाज आला नाही. पण त्याला माहिती नव्हते, की तो दुसऱ्या बाजूनेही उघडा पडला आहे. मी खिडकीच्या कडांवर दोन मोठी पुस्तके ठेऊन, दुर्बिणीची काच मला बरोबर दिसेल अशी करून ठेवली होती. खिडकीतून मी पाहिले, की त्याने शर्टाची कॉलर काही

असह्य दबाव आल्यासारखी उभी करून ठेवली होती. जेव्हा डोळ्यांवर फार प्रकाश येतो, तेव्हा आपण जसा डोळ्यांवर हात धरतो, तसा त्याने धरला होता.

नंतर त्याचा आवाज ठामपणे आला. “तुम्ही काय म्हणता आहात, ते मला समजत नाही.”

“मी एक प्रकारच्या कामाबद्दल बोलतो आहे. ते अजून फार पुढे जाऊ नये, म्हणून ते माझ्यासाठी खूप महत्वाचे आहे, नाही का?”

हे खिडकीतून बघून चालले आहे, हे त्याला कळू नये, असे मला वाटत होते. मला अजून तिची एरवीपेक्षा जास्त गरज होती.

“आधीच्या रात्री तू दाराबद्दल काळजी घेतली नाहीस. किंवा पत्र हलवून थोडे उघडलेस."

हा टोला त्याला बरोबर बसला. त्याचे वरखाली होणारे पोट मला चांगले समजले. “तुला काहीच दिसले नाही. तिथे बघण्यासारखे काही नव्हतेच.”

“ते तुझ्यावर अवलंबून आहे. मी पोलिसांकडे जाऊ का?” मी थोडा खाखरलो. “मला पैसे मिळणार असतील, तर --- “जर मला न बोलण्याबद्दल पैसे मिळणार असतील, तर --- "

तो सुटका झाल्यासारखे म्हणाला, “ओहो, तुला मला भेटायचे आहे का? --- ते असे आहे का?”

“ते बरे ठरेल, नाही का? तू आता तुझ्याबरोबर किती आणू शकतोस?”

“माझ्याकडे आता फक्त सत्तर डॉलर आहेत.”

“ठीक आहे. मग आपण आपली भेट परत कधीतरी ठरवू. तुला

तळ्याशेजारील बाग माहिती आहे का? मी आता तिथे आहे. जर आपण तिथे भेटलो, तर?”

“ती अर्ध्या तासावर आहे. पंधरा मिनिटे जायला व पंधरा मिनिटे यायला.”

“आत गेल्यावर तिथे एक लहानसा निवारा आहे.”

त्याने काळजी घेत विचारले, “तुम्ही तिथे कितीजण आहात?”

“फक्त मी. त्यामुळे गोष्ट आपल्यातच राहील. म्हणजे तुला आणखी कुणाला पैसे वाटायला लागणार नाहीत.”

त्याला ते आवडले, असे दिसले. तो म्हणाला, “मी बाहेर एक चक्कर मारतो. फक्त बघण्यासाठी, की हे काय चालले आहे.”

आता मी त्याला अधिक जवळून पाहिले. तो खोलीच्या शेवटापर्यंत गेला. तो अलीकडे जात नसलेल्या झोपायच्या खोलीतही गेला. तेथील कपड्यांच्या कपाटासारख्या खोलीत नाहीसा झाला. मिनिटभर तिथे राहिला व बाहेर आला. त्याने तेथील लहानशा जागेतून वा भिंतीतील कोनाड्यातून काहीतरी घेतले. त्याच्या हाताच्या हालचालीवरून, त्याने ते कोटाच्या आत लपवण्यापूर्वी मी जाणले, की ते पिस्तुल होते.

मी विचार केला की हे चांगले झाले. मी तिथे तळ्याजवळील बागेत सत्तर डॉलरसाठी जाणार नाही आहे, म्हणून बरे आहे. त्याच्या खोलीत अंधार झाला आणि तो बाहेर पडला.

मी सॅमला आत बोलावले. “मी तुला माझ्यासाठी एक जोखमीचे काम करायला सांगणार आहे. खरे तर खूपच धोकादायक! तुझा पाय कदाचित तुटेल किंवा तुला गोळी लागेल किंवा तुला चिमटा बसेल. आपण गेली दहा वर्षे एकत्र आहोत आणि मी जर करू शकत असतो, तर तुला असे काही करायला सांगितले नसते. पण मी करू शकत नाही आणि करणे तर अत्यावश्यक आहे.” मग मी त्याला सांगितले, “मागील रस्त्याने जा. मागील कुंपणांखालून जाऊन अंगण ओलांड आणि तुला त्या चौथ्या मजल्यावरील सदनिकेत आगीच्या पाईपसाठी बनवलेल्या लिफ्टसारख्या मोकळ्या जागेतून जाता येते का, बघ. त्याने एक खिडकी वरून थोडी उघडी ठेवली आहे.”

“तिथे काय करू?”

“काही नाही. तिथे आधीच पोलीस असतील. त्यामुळे अजून काय करणार? तिथे तीन खोल्या आहेत. तिथे कुणीतरी येऊन गेले, असे दाखवण्यासाठी, तू तिथे वस्तू थोड्याफार विस्कटून ठेव. प्रत्येक रगाची कडा दुमडून ठेव. टेबल व खुर्च्या सरकवून ठेव. कपाटांची दारे उघडी टाक. लक्ष ठेव आणि कुठलीच गोष्ट सोडू नको.” मी माझ्या मनगटावरील घड्याळ काढून, त्याच्या हातावर बांधले. “आतापासून तुझ्याकडे पंचवीस मिनिटे आहेत. या पंचवीस मिनिटात तुला काही होणार नाही. पण जेव्हा ती संपतील, तेव्हा थांबू नकोस. जलद गतीने बाहेर पड.”

“आलो त्याच मार्गाने बाहेर पडू का?”

“नको. त्याच्या मनाच्या उद्दीपित अवस्थेत, त्याला आपण खिडकी थोडीशी उघडी ठेवल्याचे आठवत नसेल आणि मला त्याच्या जागेच्या मागील भागात काही धोका ठेवायचा नाही. पुढील भागात चालेल. यातून माझी खिडकी मी वगळणार आहे. खिडकी खाली करून कुलुपबंद कर. तू दारातून बाहेर जा आणि तुझा जीव वाचवण्यासाठी, इमारतीच्या पुढील भागातून बाहेर पड.!"

कटूपणे खंत करत तो म्हणाला, “मला तुम्ही काहीही कामे सांगता!” पण तो गेला. तो आमच्या इमारतीतून बाहेर पडलेला मला दिसला. त्याने मागील कुंपणांखालून जाऊन अंगण ओलांडले. जर त्याला आसपासच्या खिडकीतून कुणी हटकले असते, तर मी त्याला हाका मारून थांबवणार होतो. मी त्याला खाली पडलेले काही शोधायला पाठवले असल्याची थाप मारली असती. पण कोणी हटकले नाही. त्याच्या वयाच्या कोणाहीपेक्षा त्याने हे काम चांगले केले. तो काही आता फार तरुण नव्हता. आगीच्या पाईपसाठी बनवलेल्या मोकळ्या जागेतून वर जाणे, त्याने कशावर तरी उभे राहून जमवले. तो सदनिकेत शिरला. दिवा लावला. माझ्याकडे पाहिले. मी त्याला खचून न जाता, काम चालू ठेवायची खूण केली. मी त्याला बघत होतो. तो आता सदनिकेत असल्यावर, मी त्याचे रक्षण करू शकलो नसतो. त्याच्यावर गोळी मारून, त्याला खाली पाडायचा थोर्वाल्डचा हक्कच होता --- मी नेहमीप्रमाणे, या नाट्याच्या मागे सुरक्षित होतो. मी सॅमच्या समोर जाऊन त्याचे संरक्षण करू शकत नव्हतो.

त्याला हे करतांना ताण आला असणार. त्याला नुसते बघतानाही मला दुप्पट ताण आला होता. ती पंचवीस मिनिटे मला पन्नास मिनिटे भासली. शेवटी तो खिडकीशी आला. ती लाऊन कुलुपबंद केली. दिवा मालवला व तो बाहेर

पडला. त्याने काम चोख केले. मी पंचवीस मिनिटे रोखून धरलेला श्वास एकदाचा सोडला.

मी त्याला आमच्या इमारतीचे खालील दार लावतांना पाहिले. तो वर आला तेव्हा मी कडकपणे बोललो, “येथील दिवा मालव. तुला मोठी व्हिस्कीची बाटली घे. तू फारच छान काम केलेस.” एकोणतीस मिनिटांनी तळ्याशेजारील बागेवरून थोर्वाल्ड आला. एका माणसाच्या जीवासाठी फारच कमी अंतराचा फरक होता. तर मग आता लांबलेले काम आणि त्यात यश मिळण्याची मला आशा होती.

त्याला घरातील काही पसारा दिसण्यापूर्वी मी दुसरा फोन केला. ही युक्तीची वेळ होती. मी हातात फोन घेऊनच बसलो होतो. पुन्हापुन्हा क्रमांक फिरवत होतो व बंद करत होतो. मी क्रमांक ५२११४ फिरवत असतांना, २ आकडा फिरवल्याबरोबर तो आत आला. तेवढाच वेळ वाचला. त्याने दिवा लावण्यापूर्वी फोनची घंटी वाजू लागली. दिव्याच्या बटणावर त्याचा हात जाण्यापूर्वी फोनची घंटी खणखणली.

ही घटिका आता गोष्ट सांगणार होती.

“तू पैसे आणणे अपेक्षित होते. पिस्तुल नव्हे. त्यामुळे मी आलो नाही. त्याला बसलेला धक्का मला दिसला. खिडकीला मला अजून बरेच काही दाखवायचे होते. माझी खिडकी मला अजून लपूनछपून वापरायची होती. “तू रस्त्यावर आल्यावर, जिथे तू पिस्तुल ठेवले होतेस, तिथे मी तुला कोटाच्या आतील खिसा चाचपताना पाहिले.” कदाचित त्याच्याकडे ते नसेलही. पण

आतापर्यंत तो विसरून गेला असणार की त्याच्याकडे ते आहे की नाही. जेव्हा तुम्ही पिस्तुल घेता, तेव्हा ते नेहमी घेत नसल्याने, तसे होणे साहजिक असते.

तुझी बाहेरची फेरी फुकट गेली, हे फार वाईट झाले. तरी तू बाहेर असतांना मी माझा वेळ फुकट घालवला नाही. आता मला पूर्वीपेक्षा जास्त माहिती झाले आहे.” हा महत्वाचा भाग होता. मी जिंकलो होतो आणि मी त्याला त्याच्या नकळत अंतर्बाह्य बघत होतो. ते कुठे होते, ते --- मी शोधून काढले. “मला काय म्हणायचे आहे, तुला समजले असेल. आता मला समजले की तुला ते कुठे --- मिळाले. तू बाहेर असतांना, मी तिथे होतो.”

एकही शब्द नाही. फक्त ऊर धपापणे. “तुझा माझ्यावर विश्वास नाही? सभोवताली बघ. फोन खाली ठेव आणि तू स्वतःच इकडेतिकडे बघ. मला ते सापडले.”

त्याने फोन खाली ठेवला. उठाबसायच्या खोलीच्या दाराशी गेला आणि दिवा बंद केला. त्याने एकदा लाज वाटून अवती भवती पाहिले. त्याचे डोके एका विशिष्ट बाबीवर एकत्रित झाले नाही. विचारांचे संश्लेषण, केंद्रीकरण मुळीच झाले नाही.

तो पुन्हा फोनजवळ आला, तेव्हा तो उदासीनतेने हसत होता. तो नरमाईने व वाईट समाधानाने म्हणाला, “तू खोटारडा आहेस.”

मग त्याने फोन काढून ठेवला. त्यापासून हात बाजूला घेतला.

मी उडालोच..

कसोटी नापास झाली, पण खरे तर नव्हे. माझ्या अपेक्षेप्रमाणे त्याने जागा सोडली नाही. आणि तरीही, तो म्हणाला, “तू खोटारडा आहेस.” कुठेतरी

त्याच्याभोवती, कुठेतरी त्याच्या जागी, त्याला बघितले जात आहे, हे त्याला न सांगता समजले की काय! --- नाही. नाही. तो इतक्या चांगल्या जागी होता , की त्याला काळजीचे काही कारण नव्हते. त्याला बघितले जात असण्याचा काही संबंध आहे, हे त्याच्या गावीच नव्हते.

त्यामुळे माझ्या पराभवात, न सांगताच विजय होता. पण त्याचे मला काही पडलेले नव्हते.

तो माझ्याकडे पाठ करून उभा होता. मला तो काय करत आहे, हे दिसत नव्हते. मला माहिती होते, की फोन कुठेतरी त्याच्यासमोर आहे. पण तो तिथे नुसता डोके खाली घालून, उभा होता. मी इकडे अस्वस्थ होतो. मला त्याचे कोपरसुद्धा हललेले दिसले नाही आणि मघले बोट हलले असेल, तरी ते मला दिसत नव्हते.

तो तसा क्षण दोन क्षण उभा होता. मग शेवटी बाजूला वळला. त्याने दिवा बंद केला. मला तो दिसेनासा झाला.

तो काडीसुद्धा न ओढण्याची काळजी घेत होता. माझे मन त्याला बघण्यावरून उडाले. मी दुसरे काही आठवण्याचा प्रयत्न करू लागलो --- त्या दुपारी जे काही घडले, त्याच्याशी सुसंगत, असा तो त्रासदायक धक्का! तो आणि भाड्याने जागा देणारा दलाल दोघे एकदम एका खिडकीकडून दुसऱ्या खिडकीकडे वळले.

मी जास्तीत जास्त जवळ जाऊ शकलो: जेव्हा तुम्ही कुणाकडे तरी कमी दर्जाच्या काचेतून बघत असता आणि त्यातून दिसणाऱ्या आकृतीचा सारखेपणा सेकंदभर हलतो, आणि नंतर दिसेनासा होतो. पण असे होऊन चालणार नाही.

मला तो काय करतो आहे, हे कळलेच पाहीजे. खिडकी उघडी असते आणि तिला काचा नसतात. तेव्हा मी भिंग वापरत नव्हतो.

माझा फोन वाजला. मला वाटते, तो बॉयन होता. या अशा वेळी दुसरा कुणी असू शकत नव्हता. मला वाटते, विचार केल्यावर, त्याने मला फोन केला असावा. मी माझ्या नेहमीच्या आवाजात हॅलो म्हणालो.

काही उत्तर मिळाले नाही.

मी “हॅलो? हॅलो? हॅलो?” म्हणालो. मी वेगवेगळे आवाज काढून हॅलो म्हणत राहिलो. पण काही उत्तर मिळाले नाही. शेवटी मी फोन ठेऊन दिला. मला जाणवले, तिथे अजून काळोख होता.

काय चालले आहे, असे वाटून सॅमने बघितले. त्याने घेतलेल्या पेयामुळे त्याची जीभ थोडी जड झाली होती. तो विचारत होता, की मी आता जाऊ का? मी त्याला अर्धवट ऐकले. मी वेगळ्या प्रकारे समोरच्या खिडकीतील माणसाची कोंडी करायचा विचार करत होतो. त्याला योग्य संधी देत होतो. मी नकळत त्याला जायला परवानगी दिली. तो जिन्यातून थोडा डगमगत तळमजल्याला गेला. उशीरा एक दोन क्षणांने मी रस्त्यावर उघडणारे दार बंद झालेले ऐकले. बिचारा सॅम! त्याला कडक पेय घ्यायची फारशी सवय नव्हती. घरी मी एकटाच उरलो. माझी माझ्या हालचालीची मजल पलंगापासून खुर्चीपर्यंत जाणे एवढीच होती.

अचानक मागील खिडकीत क्षणभर उजेड पडला व परत अंधार झाला. त्याला काही बघण्यासाठी, त्याची गरज भासली असेल. त्याने काही शोधून त्याला ते सापडले नसणार. पण आता दिवा लावल्याशिवाय, त्याला ते हातात घेता येत नव्हते. दिवा लावल्यावर, त्याला ते लगेच सापडले. मग तो दिवा बंद

करू लागला. असे करतांना मी त्याला खिडकीबाहेर एक नजर टाकतांना बघितले. ते करण्यासाठी, तो खिडकीजवळ आला नाही. त्याने फक्त खिडकीतून बाहेर पाहिले. मला काहीतरी खटकले. बहुतेक मी त्याला बघत असल्याचे त्याला समजले असावे. पकडायला अवघड अशी नजर म्हणजे मी त्याला उद्देश ठेऊन बघणे म्हणेन. ती नक्कीच रिकामी किंवा अशीतशी असेल. त्यात नजर एकटक ठेवायची झगमगती ठिणगी असेल. त्याची नजर काही काळजीपूर्वक टाकलेली नजर मला वाटली नाही.

ती त्याच्या बाजूने सुरु होत नसे, पण ती माझ्या उजव्या बाजूवर पडायची. तो बिंदू माझ्या खिडकीच्या मध्यावर होता. तो क्षणभर टिकला. मग दिवे गेले व तो पण गेला.

कधीकधी त्यात मन न गुंतता, काही न समजता, फक्त भावनांनी काही गोष्टी केल्या जातात. माझ्या डोळयांनी ते दृष्य बघितले. पण मनाने त्याचा नीट अर्थ लावण्यास, नकार दिला. मी विचार केला, ‘तो बाहेर जातांना दिव्याच्या बटणाजवळ गेला पण ते अर्थहीन होते. काही उद्देश नसलेला नेम साधणे होते.’

‘उशीरा केलेली हालचाल.’ काही बोलणे नसलेली फक्त फोनची घंटी! माझ्या आवाजाची परीक्षा? नंतर गडद अंधार, दोघांचे तोच खेळ खेळणे --- एकमेकांच्या खिडक्यांचे न दिसणारे चौकोन बघणे. शेवटच्या क्षणी दिवा फडफडला. हा फारसा चांगला बेत नव्हता, पण टाळताही येत नव्हता. निर्हेतुक असा शेवटचा कटाक्ष! या सर्व गोष्टी एकत्र न येता, बुडाल्या. माझ्या डोळयांनी त्यांचे काम केले. मनाने करायचे नाकारले. किंवा निदान फार वेळ घेतला.

साठ सेकंदाचा एक गठ्ठा, असे खूप गठ्ठे गेले. घराच्या मागील बाजूच्या चौकोनात, खूप शांतता होती. श्वासाचा आवाजही येणार नाही, इतकी शांतता! नंतर कुठूनही न येणारा आवाज आला. रात्रीच्या शांततेत न चुकता, ठराविक अंतराने येणारा रातकिड्यांचा आवाज. मला त्यांच्याबद्दलच्या सॅमच्या अंधश्रद्धेचा विचार मनात आला, जो तो नेहमी बोलून दाखवी, पण कधीच तसे झालेले पाहिले नाही. जर असे होते, तर ते येथील झोपलेल्या घरांमधील एक फार वाईट घर ठरणार होते.

सॅमला जाऊन दहा मिनिटे झाली असतील. आता तो परत आला. तो नक्कीच काहीतरी विसरला असावा. ते पेय त्याला कारणीभूत होते. त्याची टोपी किंवा त्याच्या घराची किल्ली. त्याला माहिती होते, की मी खाली जाऊ शकत नाही. त्याबद्दल तो शांत होता. तो विचार करत होता, की मला कदाचित झोप लागली असेल. मी फक्त पुढील दरवाजा उघडल्याचा बारीक आवाज ऐकू शकत होतो. हे एक जुन्या प्रकारचे, वाकलेले घर होते. त्याला बाहेर रात्रभर हवेवर डुलणारी वादळी दारे होती. आणि त्यानंतर एक छोटीशी खोली होती. मग साध्या लोखंडी किल्लीने उघडणारे आतले दार. कडक पेयाने त्याचे हात जरा थरथरत होते. जरी पूर्वी एकदोन वेळा असे, दारू न पिताही झाले होते. काडेपेटीच्या एक काडीने त्याला किल्लीचे भोक पटकन नीट दाखवले असते. सॅम सिगरेट ओढत नसल्याने, त्याच्याजवळ काडेपेटी असायची शक्यता नव्हती, हे मला माहिती होते.

आता आवाज थांबला .त्याने किल्लीचे भोक दिसण्यासाठीचे प्रयत्न सोडून दिले असले पाहिजेत. तो पुन्हा लांब गेला. काय विसरले, ते तसेच

उद्यापर्यंत राहून देण्याचा विचार केला. त्याला ते मिळाले नाही, कारण मला त्याची दार आपले आपण जोराने लावले जाण्याची पद्धत, चांगली माहिती होती. आणि तसा थप्पड मारल्यासारखा आवाज काही आला नव्हता. मग अचानक दार जोरात वाजले. आता यावेळी कसे काय, ते मला कळले नाही. तो माझ्या अंतर्मनाचा काही खेळ होता. तो ठिणगी पडून हळू चालणाऱ्या गाडीने वेग घ्यावा तसा बंदुकीच्या दारूसारखा, ठो असा आवाज झाला. सॅमविषयी आणि पुढील दाराविषयी सर्व विचार करून झाला. मग ते सर्व डोक्यातून गेले. आज दुपारपासून ते डोक्यात चालले होते. आणि आता --- अजून फक्त ‘उशीराची हालचाल’. ती खड्ड्यात जावो.

जागा भाड्याने देणारा दलाल व थोर्वाल्ड दोघे उठाबसायच्या खोलीच्या खिडकीतून निघाले. मधली रिकामी भिंत, ओलांडून, दोघे स्वयंपाकघराच्या खिडकीशी आले. एकापुढे एक असे ते उभे होते. पण आता ते त्यांच्या उंचीतील फरक होता तसाच ठेऊन, पायाखाली काही असल्याप्रमाणे उंच दिसू लागले. ही काही स्वरूपाची धक्का बसणारी हालचाल झाली. त्याने मला त्रास झाला.

डोळा हे विश्वसनीय साधन आहे. वेळाचे काही नाही, पण एकापुढे एक असे ते उभे होते. मधली रिकामी जागा, मधली फट, आडवी नसून, उभी होती. उभा फरक दिसत होता. आता मला ते समजले. लक्षात आले. आता मी थांबू शकत नव्हतो. ते फार चांगले होते. त्याना प्रेत हवे होते. आता त्यांच्यासाठी ते माझ्याकडे होते.

त्याला दुःख होऊ दे वा नको, पण आता बॉयनला माझे ऐकावेच लागणार. मी आता अजिबात वेळ फुकट घालवला नाही. मी अंधारात माझ्या

स्मरणशक्तीला जागून, त्याच्या कार्यालयात फोन केला. आसपास फार आवाज झाला नाही, थोडीशी ट्रिंग ट्रिंग झाली एवढेच. बाहेरील रातकिड्यांच्या गुणगुणण्याइतकीही नाही.

सार्जंट म्हणाला, ''तो कधीच घरी गेला.''

आता थांबणे शक्य नव्हते. "ठीक आहे. मला त्याचा घरचा फोन क्रमांक द्या."

त्याने थोडा वेळ घेतला व परत येऊन म्हणाला, "ट्रॅफलगार" पुढे काहीच नाही.

"ठीक आहे, ट्रॅफलगार. पुढे? हॅलो? हॅलो? ऑपरेटर, माझा संपर्क तुटला आहे. मला तो परत जोडून द्या." माझा फोन काही लागेना. माझा फोन लागत नव्हता, कारण वायर कापली गेली होती.

हे फार अचानक --- फोनच्या मध्येच झाले आणि हे नक्की माझ्या घराच्या आतच कुणीतरी केले. कारण बाहेर वायर जमिनीखाली होती.

'उशीरा केलेली हालचाल.' यावेळी शेवटची, मरणांतिक. फारच उशीर. मी वाजवलेली फोनची घंटी. तो माझा आवाज ऐकून, माझ्याबद्दलची खात्री करत होता. पण त्याचे काही उत्तर नाही. एक दिशा --- तिकडून बघणारा कोणी! आम्ही दोघेही एकच खेळ खेळत होतो. एकमेकांच्या खिडक्यांकडे बघून न बघितल्यासारखे करणे. दिवा लाऊन बंद करणे --- अटळ अशी त्याची शेवटची हालचाल. बाहेर पडतांना, दुष्ट हेतूने टाकलेला एक कटाक्ष! या त्याच्या नजरेचा व कृत्यांचा अर्थ मला समजत नव्हता. माझे डोळे बघण्याचे काम करत होते.

रातकिडे किरकिरत होते मला सॅमची त्या बाबतीतील अंधश्रद्धा आठवत होती. घरांच्या मागील बाजूला असलेल्या चौकोनी अंगणात चिडीचूप शांतता होती.

थोड्या वेळापूर्वी सॅम गेला होता. पण नक्कीच परत इथे यायचा प्रयत्न करत होता. पण आता मला समजले, की तो सॅम नसून, नक्कीच घरात माझ्यावर मृत्यु दबा धरून बसला होता. मी हलू शकत नव्हतो. मी खुर्चीतून बाहेरही पडू शकत नव्हतो. आता माझा फोन बॉयनला लागला असता तर --- तरी फार उशीर झाला असता.. मी माझ्या खिडकीतून तिथे मागील खिडकीच्या बाल्कनीत झोपलेल्या शेजाऱ्यांना ओरडून, हाका मारू शकलो असतो. त्यामुळे ते खिडकीशी आले असते व इथे वेळेवर पोचले असते. तो कुठल्या घरातून आला आहे, हे त्यांनी शोधून काढले असते. परत ते थांबले असते. पण सर्व काही संपले, कारण मी तोंडच उघडले नाही. मी शूर होतो, म्हणून नव्हे, तर त्याचा अर्थातच काही उपयोग नव्हता, म्हणून.

तो एका मिनिटात इथे येईल. आता तो जिन्यात असेल. मला त्याचा पदरव येतो आहे. थोडा अधिक आवाज आला असता, तर सुटका झाल्यासारखे वाटले असते. हे अंधारात तुमच्या आसपास सरपटणाऱ्या वेटोळे घातलेल्या नागासमोर तोंड आवळून बसल्यासारखे झाले.

माझ्या हाताशी काही शस्त्र नव्हते. कधी न वाचणाऱ्या माझ्याजवळ भिंतीवर पुस्तके होती. ती इथे आधी रहाणाऱ्या माणसाची होती. रुसो किंवा मॉन्टेस्क्यूचा अर्धपुतळा होता. नक्की कोणाचा, ते मला माहिती नव्हते. वरती तिथे पुरुष मृतात्मे वावरत होते. ती बिस्केच्या उपसागरातील, राक्षसी माती होती. तो पुतळा तिथे मी रहायला यायच्या आधीपासून होता.

मी माझी कंबर खुर्चीतून वाकवत, वर उचलली आणि कसाबसा बोटांचा आधार घेत, थोडे वर होण्याचा प्रयत्न केला. दोनदा माझ्या बोटांची टोके घसरली. मग तिसऱ्या वेळी मी जेमतेम तोल सावरू शकलो आणि चौथ्या वेळी, मी मांडीवर आपटून खुर्चीत खाली आदळलो. माझ्या खाली जाड रग होता. या हवेत मला तो अंगाभोवती लपेटायची गरज नव्हती. मी तो फक्त माझे आसन मऊ करण्यासाठी वापरत होतो. तो मी माझ्याखालून ओढून काढला. आणि भारतीय शूरवीरासारखा लपेटून घेतला. मग मी एखाद्या सरपटणाऱ्या किड्यासारखा खुर्चीतून बराच खाली आलो. माझे डोके आणि एक खांदा भिंतीच्या बाजूने पुढे माझ्या हाताबाहेर आले. माझ्या वरील खांद्याने मी पुतळा उचलल्यासारखे केले. तिथे तो पडता पडता कानाभोवती लपेटायच्या डोक्याच्या दुसऱ्या रगाने तोलून धरला. मागून, काळोखात, मला आशा होती --- ते दिसेल --- एखाद्या उभ्या अवस्थेतील गाढ झोपेतील माणसासारखा, श्वास घेण्याचा प्रयत्न मी करू लागलो. ताणामुळे, माझा स्वतःचा श्वास मोठ्या मुश्किलीने मी घेत होतो.

त्याच्याकडे गोल हँडल, बिजागरी व इतर वस्तू होत्या. मी दार उघडलेले कधीच ऐकले नाही आणि हे, खालच्यापेक्षा वेगळे, माझ्या बरोबर मागेच होते. अंधारातून लहानसा, हवेचा झोत आलेला मला जाणवत होता. कारण माझे खरेखुरे टक्कल केसांच्या मुळापासून ओले झाले होते.

मला माहिती होते, की मी जास्तीत जास्त कसली अपेक्षा ठेऊ शकतो की, जर तो चाकूचा किंवा डोक्याचा धक्का असता, तर त्याने मला दुसरी संधी दिली असती. माझा खांदा आणि दंड जड झाले. मी त्याला अंगावर घेऊन, पहिल्यांदा जोरात आवळून जखम करू शकत होतो. त्याची मान किंवा कॉलरचे

हाड मोडू शकत होतो. जर त्याच्याकडे पिस्तुल असेल, तर तो मला ठार करू शकत होता. अजून फक्त काही सेकंदांचा अवधी होता. त्याच्याकडे पिस्तुल असलेले मला माहिती होते. तो ते माझ्यावर मोकळयावर, तळयाशेजारील बागेत चालवू शकत होता. इथे आतमध्ये त्याला पळून जाण्यासाठी त्याने ते माझ्यावर चालवले असते ---

वेळ भरली होती. निदान खोलीच्या कोपऱ्यात तरी, इतका अंधार होता, की पिस्तुलाच्या बारने सेकंदभर खोली उजळली. पुतळा माझ्या खांद्यावर उडून त्याचे तुकडे झाले. सुदैवाने त्याचा नेम मला लागला नव्हता. मिनिटभर मला वाटले, तो निराश होऊन, रागाने जमिनीवर वरखाली नाचतो आहे. मग मी त्याला माझ्याशेजारी खिडकीतून बाहेर वाकताना पाहिले. मागील बाजूने व खालून आवाज आला.

तो रस्त्यावर उघडणाऱ्या दारावर लाथा, बुक्क्या व ठोसे मारत होता.. पण अजूनही तो मला पाच वेळा मारू शकला असता.

मी माझे शरीर खुर्चीचा हात आणि भिंत यामध्ये भिरकावले. पण माझे पाय, डोके आणि एक खांदा अजून वरती होते.

तो गरकन वळला. माझ्यावर जवळून पिस्तुल चालवले. हे चेहऱ्यावर सूर्योदय झाल्यासारखे दिसले. पण मला काही जाणवले नाही, त्याअर्थी मला मार लागला नव्हता. हे मनाचे खेळ असावेत.

“ए, भडव्या” मी त्याला त्याच्याशीच गुरगुरतांना ऐकले. मला वाटले, तो ते शेवटचेच बोलला. त्याचे बाकीचे आयुष्य म्हणजे फक्त काळे कृत्य होते, बोलणे

नाही.  तो खिडकीवर एका हाताने जोर देऊन, अंगणात गेला. दोन मजल्यांवरून त्याने उडी मारली किंवा मध्ये लावलेल्या सिमेंटला न धरल्यामुळे, किंवा तेथून हात निसटल्याने, तो खालील हिरवळीवर पडला. मी मला खुर्चीच्या हातावर खेचले आणि खिडकीच्या पुढील बाजूला माझे शरीर आले. पहिल्यांदा माझ्या हनुवटीला मार लागला.

तो ठीक होता. जेव्हा आयुष्य त्यावर अवलंबून असते, तेव्हा तुम्ही त्यातून तरून जाता. तो पहिल्या कुंपणाशी गेला. त्याखालून पोट सरपटवत गेला. दुसऱ्या कुंपणाखालून मांजरासारखा गेला. त्याने हात व पाय पोटाशी आखडून घेतले होते. नंतर तो त्याच्या इमारतीच्या मागील अंगणाशी आला. तो सॅमसारखा कशावर तरी चढला --- आता बाकीचे पायी चालायचे काम होते. जिन्याच्या प्रत्येक लँडींगवर तो वेड्यावाकड्या उड्या मारत गेला.

तो तिथे पोचला, तेव्हा सॅमने त्याची खिडकी कुलुपबंद केली होती. पण त्याने त्यापैकी एक हवेसाठी परत उघडली. त्याचे अवघे आयुष्य आता त्या किरकोळ, अविचारी कृत्यावर अवलंबून होते --- दुसऱ्या, तिसऱ्या जिन्याने चढत, तो त्याच्या खिडकीशी आला. त्याने ते जमवले. पण काहीतरी नको ते झाले. तिथे पोलिसांना बघून, अजून एक गिरकी घेऊन, तो त्यांच्या हातातून निसटला. वरच्या, पाचव्या मजल्यावर जाऊन धडकला.

जिथे तो क्षणापूर्वी होता, ती त्याची एक खिडकी अंधारात चमकली आणि मागील चौकोनात पोलिसांनी काढलेल्या पिस्तुलाचा जोराने, खर्जातील एक ठो असा आवाज उमटला. तो पाचव्या, सहाव्या मजल्यावरून, छतावर गेला. अरेरे, तो आयुष्यावर प्रेम करत होता. त्याच्या खिडकीतील लोकांना तो सापडला

नाही. तो त्यांच्या अंगावरून सरळ चालत गेला. वाटेत आग विझवण्यासाठी जाता येण्यासाठी बांधलेले लिफ्टसारखे खबदाड होते.

माझ्याभोवती काय चालले आहे, हे बघण्यात मी व्यग्र होतो.

अचानक निरीक्षण करणारा बॉयन माझ्याशेजारी होता. मी त्याला पुटपुटतांना ऐकले, “मला हे करायला अजिबात आवडत नाही. आतापर्यंत तो शरण यायला हवा होता.”

तो छतावरील पुढे आलेल्या भागावर लटपटत उभा होता. त्याच्या बरोबर डोक्यावर एक तारा होता. कमनशीबी तारा! तो मिनिटभर तसाच उभा राहिला. तो मारला जाण्यापूर्वी स्वतःच मरायचा त्याचा विचार दिसत होता. किंवा आता कदाचित त्याला माहिती होते की, आता मरणातून त्याची सुटका नाही.

आकाशात एक ठो असा आवाज आला. आम्हा दोघांमध्ये खिडकीच्या काचा विखरून पडल्या आणि एक पुस्तक माझ्या मागे पडले.

बॉयन ते करायला आवडत नसल्याबद्दल, अजून काही बोलला नाही. त्याच्या दंडामागून माझा चेहरा बाहेर डोकावत होता. त्याच्या भुवईची वक्रता बघून माझी दातखीळ बसली. मी धूर हाताने बाजूला केल्यावर मला बॉयन जातांना दिसला.

हे फार भयंकर होते. पुढे आलेल्या छतावर काही दाखवण्यासाठी, त्याने एक मिनिट घेतले. मग त्याने जणू असे म्हणण्यासाठी, पिस्तुल फेकून दिले. “मला याची काही गरज नाही.” मग तो गेला. आग विझवण्याचा मार्ग त्याने पूर्णपणे टाळला. खाली उतरून इतका बाहेर आला, की त्याला इमारतीच्या लाकडाचा न दिसणारा तुकडा लागला. त्याने त्याचे शरीर सीसॉसारखे वर उचलले. ते त्याने परत खाली आणले --- एवढेच.

मी बॉयनला म्हणालो, “मला समजले. शेवटी मला समजले. त्याच्या डोक्यावरील, अजून काम चालू असलेली पाचव्या मजल्यावरील सदनिका! इतर खोल्यांमधील फरशीपेक्षा थोडी उंचावर असलेली, स्वयंपाकघरातील सिमेंटची फरशी! त्यांना आगीच्या बाबतीतले नियम पाळायची इच्छा होती आणि त्याना उठाबसायच्या खोलीचा नक्षा शक्य तेवढा स्वस्ताईचा ठेवायचा होता. ते खोदा- “

तो वेळ वाचवण्यासाठी, कुंपण ओलांडून, तिथल्या तिथे जमिनीखालील बांधीव जागेत गेला. तिथे अजून विजेचे दिवे आले नव्हते. त्याना त्यांच्या विजेऱ्या वापराव्या लागत. त्या खूप वेळ चालत नसत. साधारण अर्ध्या तासात तो खिडकीशी आला आणि माझ्या फायद्यासाठी मागे पुढे हलू लागला. याचा अर्थ हो.

स्वयंपाकघराची फरशी फोडून, पोलीस निघून जाईपर्यंत, सकाळी आठपर्यंत, तो आला नाही. दोघेही दूर गेले, उष्णतेने मरायला टेकलेला तो आणि थंड मेलेली ती. बॉयन म्हणाला, “जेफ, मी हे सगळे घेऊन जातो. फुकटच ट्रंकेचा शोध घेणारा मूर्ख मी –-- “ठीक आहे. एक प्रकारे, ती त्याची चूक नव्हती. मी दोषी होतो. त्याला फक्त ट्रंक तपासायची परवानगी होती. बाईच्या वर्णनानुसार, [बायको की भानगड?] त्याला ट्रंक तपासायची परवानगी नव्हती. तो परत आला आणि सहज रीत्या ट्रंकेला हात लावला. मी घरी अंथरुणावर पडलो आणि अचानक माझ्या डोक्यात प्रकाश पडला. एका भाडेकरूने दोन दिवसांपूर्वी, काही प्रश्न विचारले होते व काही माहिती सांगितली होती. अनेक महत्वाच्या बाबींवर ती त्याच्याशी जुळत नव्हती. पकडण्यासाठी बॉयन हळूबाई असल्याचे आम्ही बोललो.”

मी कटूपणे खंत करत, कबूल केले, ‘मी माझे काम केले पण या लोकांच्या थंडपणापुढे काय करणार? मी त्याला ‘उशीरा केलेली हालचाल’ म्हणतो.’ त्याने मी जवळजवळ मेलो.

“मी पोलीस ऑफिसर आहे. तू नव्हे.”

“म्हणून तुम्ही योग्य वेळी अवतीर्ण झाला आहात का?”

“नक्कीच. आम्ही त्याला प्रश्न विचारण्यासाठी ताब्यात घायला आलो आहोत. जेव्हा तो इथे नसल्याचे मला समजले, तेव्हा मी इतरांना बाहेरच थांबवले आहे आणि इथे मी तुमच्या बरोबर बोलण्यासाठी, एकटाच आलो आहे. स्वयंपाकघरातील सिमेंटच्या उंचवट्यावर तुमचा विचार कसा काय स्थिर झाला?”

मी त्याला वेगळ्याच असामान्य परिस्थितीतील सारखेपणाबद्दल सांगितले. जागा दाखवणारा दलाल उठाबसायच्या खोलीच्या खिडकीशी उंचीने थोर्वाल्ड एवढाच दिसत होता, पण तो स्वयंपाकघरातील खिडकीत थोर्वाल्डपेक्षा उंच दिसत होता. यात काही गुप्त नव्हते, की ते सिमेंटच्या जमिनी करत होते व वरील भाग कॉर्कने बनवत होते. ते त्या चांगल्या उंच करत असत. पण आता त्याला नवा अर्थ आला होता. पाचवा मजला पूर्ण होऊन काही दिवस झाले होते, मी अशी उपपत्ती तयार केली होती, की ती अनेक वर्षे आजारी होती आणि त्याला काही काम नव्हते. तो बेकार होता. त्याला या परिस्थितीचा आणि तिचा, दोन्हीचा कंटाळा आला. त्याला नवीन बेत सुचला”

“ती [पोलिसांच्या मते बायको पण माझ्या मते भानगड] आज उशीरा इथे येईल. ते तिला अटक करून घेऊन येत आहेत.”

“त्याने त्याला मिळतील, तेवढ्या पैशात बहुधा बायकोला स्वस्थचित्त केले. मग काही मागमूस न ठेवता, तिला रोज थोडेथोडे विष देण्यास सुरवात केली.

पण याचा काही पुरावा ठेवला नाही. मी कल्पना करतो --- आणि मला आठवते, हे फक्त मत मी मांडतो आहे. ज्या रात्री पूर्ण वेळ दिवा चालू होता, त्या रात्री तिने त्याला असे करतांना पकडले. त्याचे डोके फिरले आणि जे करायचे तो टाळत होता, ते त्याने केले. आक्रमकपणे तिला मारले --- गळा दाबून किंवा बुक्के मारून. बाकीचे मग घाईने उरकले गेले. त्याच्या लायकीपेक्षा त्याला चांगली वागणूक मिळाली. त्याने वरच्या मजल्यावरील सदनिकेचा विचार केला, वर गेला आणि भोवताली पाहिले. त्यांनी फरशी घालणे नुकतेच संपवले होते. पण अजून सिमेंट घट्ट झाले नव्हते आणि सामानही इकडे तिकडे पडले होते. त्याने तिचे प्रेत ठेवता येईल, इतपत रुंद फळी घेतली. त्यावर तिला ठेवले. नव्याने सिमेंट कालवले व त्या प्रेतावर ओतले. बहुधा फरशीची उंची एखाददोन इंचांनी वाढवली, जेणेकरून ती पूर्णपणे झाकली जावी. कायमचे, वास न येणारे कफन. दुसऱ्या दिवशी कामगार आले. त्यांनी वरून कॉर्क लाऊन सपाटीकरण केले. त्याना काही वेगळे जाणवले नाही.

मला वाटते त्याने प्रेतापुरत्या जागेचे सपाटीकरण करण्यासाठी त्यांचीच थापी वापरली. नंतर त्याने त्याची साधनसामग्री जलद गतीने उत्तरेकडे, जिथे त्याची बायको पूर्वी बरेच उन्हाळे राहिली होती, तिथे नव्हे, तर जिथे तिला कोणी ओळखत नव्हते अशा वेगळया शेतावरील घरी ट्रंकेच्या किल्लीसकट पाठवली. आणि आधीच स्वतः लिहिलेले पोस्टकार्ड पत्रपेटीत टाकले. त्यावरील तारीख अगदी पुसट अक्षरात लिहिली. एखाददोन आठवड्यात तिने बहुधा *आत्महत्या* केली असावी, असे त्याने उठवले.

वर असे लिहिले होते, खराब तब्येतीमुळे निराश झालेली मिसेस ॲना थोर्वाल्ड. त्याचा निरोप घेण्याबद्दल तिने लिहिले होते. त्याने तिच्या आत्महत्येचा

भरपूर गवगवा केला आणि तिचे कपडे खोल पाण्याखाली एका वजनदार वस्तूला बांधून ठेवले. हे धोकादायक होते, पण त्यांना तिचा विमा सापडला असेल.”

नऊ वाजता बॉयन व इतरजण गेले. मी अजून तिथे खुर्चीत खिळल्यासारखा बसून होतो. मला झोप येत नव्हती.

सॅम आत आला व म्हणाला, “डॉ प्रेस्टन आले आहेत. ते त्यांच्या पद्धतीने हात चोळत आले व म्हणाले, “आता आपण तुमच्या पायाचे प्लॅस्टर काढू शकतो. तुम्ही तिथे दिवसभर काही न करता बसून, दमून गेला असाल.”

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पंचेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


वृषाली जोशी यांची पंचेचाळीस पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)

*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन इव्हाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी



वृषाली जोशी
मार्क ट्वेन


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The
SOUND OF MUSIC
संगीताचा नाद



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे सेहेचाळीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज

नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद

बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।